म. ग्रं. सं. ठाणे
विषय निबंध
सं. क्र. ५१०४
REFBK-0006376

पा.सं.
~~६२२८~~
६७६

१०५०७

५६४

चटकदार लेख-संग्रह

# चोरपावलें

REFBK-0006376

लेखक

दत्तु बांदेकर

जुलै १९४३ ] ★ [ किंमत १॥ रुपये

प्रकाशक
**शेठ हिरजी मोहनजी**
केशवनायकाची चाळ नं. १, खोली नं. २
कांदेवाडी, मुंबई ४

सर्व हक्क लेखकाचे स्वाधीन

मुद्रक
**आर. आर. बखले,**
मुंबई वैभव प्रेस, सँढर्स्ट रोड,
गिरगांव, मुंबई ४

# अर्पण

चन्द्रकान्त वि. बावडेकर यांस

लेखक

मराठी ग्रंथ संग्रहालय
दा. क्र. ६३०६
१०८०७

# पार्वती, जरा जवळ ये !

कोण ग तू ? उभी कां अशी अंधारांत ? भिकारीण वाटतं ? तें टिनपॉट कां लपवितेस पदराखालीं ? आणि काय काम आहे तुझं इथं एवढ्या रात्रीं ? काय म्हणतेस, झोंपायला आलीस ? वा ! वाः ! मी ब्रह्मचारी इथें फूटपाथवर झोंपलों आहें आणि तूंहि शेजारी झोंपायला आलीस ? तुला दुसरीकडे कुठं जागा मिळाली नाहीं का ? चल, चालती हो ! त्या पलीकडच्या फूटपाथवर जाऊन झोंप. काय म्हणतेस, इथेंच झोंपणार ! जुलूम झाला हा ! अग, हात जोडतो तुझ्या ! केवढी रात्र झाली आहे माहीत आहे ? दीड दोन वाजले असतील ! मी ब्रह्मचारी इथें झोंपलों आहें, आणि तूंहि इथें जवळ झोंपलीस म्हणजे तें बरें दिसेल का ? काय म्हणतेस, हालणार नाहीं इथून ! चालायला ताकद नाहीं ? बरं झोंप. फूटपाथ तुझ्या बापाचा नाहीं कीं माझ्या बापाचा नाहीं. वाटेल त्या बेवारशी माणसानें इथें खुशाल पडावं. बरं झोंप !

* * * *

**भिकारणी, जरा लांब झोंप** ! अशी जवळ पडलीस तर लोक काय म्हणतील ? तुझ्या मनांत पाप नसेल ! पण मी पांढरपेशा सभ्य माणूस ना ! आम्हा सभ्य माणसांच्या मनांत हलकट विचार येणार नाहींत, तर ते काय तुझ्यासारख्या भिकाऱ्यांच्या मनांत येतील ? राग आला तुला माझा ? रागावूं नकोस. मी आपला सरळ माणूस ! खरं तें बोललों. अरेरे ! तुला उशी नाहीं ! मान मुरगळणार नाहीं का तुझी ? माझा कोट देऊं उशीला ? काय म्हणतेस नको ! संवय आहे अशी झोंपण्याची ! अरेरे ! तुझा हा कोमल देह कठीण अशा पत्थरावर पहुडावा ना ! हें

नाजूक स्त्रिये, तुला फूटपाथवर झोंप येते तरी कशी? मला तर मुळींच झोंप येत नाहीं! डोळे मिटून मी जागाच पडलेला असतों. हे दगड माझ्या अंगाला सारखे बोंचत असतात. या कुशीवरून त्या कुशीवर मी सारखा तळमळत असतों. आणि भिकारणी, तूं मात्र कशी इथें शांत झोंपतेस? तुला कशी मोहनिद्रा लागते? सांग, सांग, अशी कोणती जादू तुझ्याजवळ आहे?

*　　*　　*　　*

**भिकारणी, जरा जवळ ये!** फार थकलेली दिसतेस तूं! कांहीं खाल्लं पिलं कीं नाहीं आज? छे! छे! खोटं बोलूं नकोस! तुझा चेहरा तर उपाशी दिसत आहे. हें पोट पाठीला लागलं आहे. आणि ही छाती! नुसता हाडांचा सांपळा! हूं! पदर सांवरूं नकोस! त्या दृष्टीनं पाहिलं नाहीं मीं तुला! तुझा भुकेकंगाल देह कसा रोड दिसत आहे तेंच मी सांगत आहें! काय करूं भिकारणी माझ्या खिशांत यावेळीं एक पाव सुद्धां नाहीं! मीहि लाचार होऊन फूटपाथवर पडलों आहें. पण मी कांहीं तुझ्याप्रमाणें पीढीजाद भिकारी नाहीं. मी आहें टेंपररी भिकारी! आयुष्यांत कधीं कधीं असे प्रसंग येतात, तेव्हां मी हा असा फूटपाथवर पडलेला असतों. हं, झोंप आतां! तो पहा पोलीस आला. तो आपली 'ड्यूटी' बजावण्यासाठीं विनाकारण ह्या फुटपाथवरून त्या फूटपाथवर आम्हांला घालवून देईल. काल तर ह्या पोलिसांच्या 'ड्यूटी' मुळें मला वेगवेगळ्या तीन फूटपाथांवर रात्र काढावी लागली! अग, त्यांना आपला मत्सर वाटतो. ते रात्रीं जागरण करतात, तेव्हां आम्हीं झोंपलेलं त्यांना कसं बघवणार?

*　　*　　*　　*

**भिकारणी, जरा जवळ ये!** झोंप लागली का तुला? हे मेले उंदीर आणि घुशी तुझ्या आणि माझ्या अंगावरून स्वैर धांवपळ करीत आहेत. तूं भीत नाहींस, पण मला भीति वाटते! फूटपाथवर झोंपायचं म्हणजे हा उंदरांचा त्रास सहन करावा लागतो! अग, पहा, केवढे मोठे उंदीर! छे छे! मला आतां झोंप येणारच नाहीं! आतां रात्रीं तीन वाजले, तरीहि हे उंदीर आपले पोलीसांप्रमाणें गस्त घालीत आहेत! एवढ्यानेंच आपलं दुर्दैव थांबलं नाहीं. एखादा दारुडा झिंगत झिंगत आपल्याला बुटानें तुडवून सुद्धां जाईल. आणि एवढ्यानेंहि आपलं दुर्दैव संपत नाहीं. दुसऱ्या माळ्यावरून किंवा तिसऱ्या माळ्यावरून, पानाची पिचकारी किंवा रद्दी पिशवी

आपल्या अंगावर पडण्याचा हटकून संभव! होय भिकारणी! ही मुंबई आहे! मध्यरात्रीचा समय आहे! अंगावर काय पडेल आणि काय नाहीं याचा नेम नाहीं! नांव काय तुझं भिकारणी? काय म्हटलंस, पारू! पार्वती असेल! बस्स! बस्स! तुझं पार्वती नांव मला पसंत आहे!

**पार्वती, जरा जवळ ये!** तुला झोंप आली नाहीं माझ्याप्रमाणेंच! काय मेला वारा सुटला पाहा! धूळ उडाली तुझ्या डोळ्यांत? जरा जवळ ये. मी फुंकर मारतों. या फूटपाथवर मेला हाच त्रास! रस्त्यावरची धूळ झोंपणाऱ्यांच्या डोळ्यांत, तोंडांत आणि नाकांत! आणि ही बघ, तुझ्या गालाला किती माती चिकटली आहे! जवळ ये. पुसून काढतों मी माझ्या सदऱ्यानें. तुझा हा अंबाडा असा कसा ग? हे केंस आहेत कीं सुंभाची दोरी आहे? डोकींत तेल कधीं घालतेस का जन्मांत? हंसतेस काय अशी वेड्यासारखी! छे छे! या अंधारांत तूं हंसतेस कीं रुसतेस हें सुद्धां नीट दिसत नाहीं. अरेरे! तुझे ओंठ किती सुकले आहेत! घशाला कोरड पडली आहे तुझ्या! थांब! आतां हॉटेलं उघडतील. रात्र संपत आली. ती पहा, सहा नंबरची ट्राम चालली सुद्धां! थांब जरा! तुला एक सिंगल चहा आणि दोन पैशाची बटर बिस्कीटें घेऊन देतों. गरमागरम चहा तुझ्या घशाखालीं गेला म्हणजे तुझ्या जीवाला हुशारी वाटेल आणि तुझा मलीन चेहरा किंचित् फुलून दिसेल! चल, पार्वती, माझ्याबरोबर ये. माझ्याजवळ पांच पैसे आहेत. तुझ्या माझ्या मीलनाचा हा पहिला प्रसंग आपण एक सिंगल चहा आणि दोन पैशांची बटर यांची मेजवानी झोडून साजरा करूं या!

# चोरा, जरा हळूं !

चोरा, जरा हळूं ! गटाराच्या पाईपवर मोठ्या कौशल्यानें चढून खिडकींतून उडी मारून तूं माझ्या घरांत प्रवेश केलास ! मध्यरात्रीची सामसूम पाहून, तूं या अंधारांत दबकत दबकत माझ्या खोलींत शिरलास ! इंग्रज लोक हिंदुस्थानांत ज्या हिकमतीनें घुसले, त्यापेक्षां जास्त अक्कल हुषारी लढवून तूं माझ्या खोलींत घुसलास ! तुला वाटत असेल, मी केवढ्या सफाईनें आलों ! पण मूर्खा, तुझी चाहूल लागून मी जागा झालों आहें ना ! तुझ्या चोरट्या पावलानें आवाज न होऊं देण्याची कितीहि सावधगिरी घेतली असली तरी, गुन्हेगार माणसाच्या धडधडणाऱ्या हृदयाचे ठोके मला ऐकूं आल्याशिवाय कसे राहतील ? आणि वेड्या, तूं कशाला आलास या निष्कांचन माणसाच्या घरीं ! तुला इथें काय मिळणार आहे ? ज्या घरांत उंदरांना सुद्धां दाणा मिळणें मुष्कील, त्या घरांत माझ्या मित्रा, तुला धनदौलत कोठून मिळणार ? उगीच इथं येण्याचें श्रम घेतलेस ! तुझी या ठिकाणीं निराशा होणारच, पण माझी मात्र विनाकारण झोंपमोड झाली ना !

* * * * *

चोरा, जरा हळूं ! गडबड करूं नकोस. तुला जे कांहीं करायचं आहे तें सफाईनें कर. अंधारांत आवाज न करतां हालचाल करायची, कठीण काम आहे हें खरें असलें तरी तूं चोर आहेस हें लक्षांत ठेव. चोराला ही विद्या आली पाहिजे. हं, असा दचकूं नकोस. माझा खोकल्याचा आवाज तुला ऐकूं आला म्हणून घाबरलास होय ? अरे, भिऊं नकोस. मला गाढ झोंप लागली आहे असेंच तूं समज ! उगीच घाबरटपणानें सुरा बिरा घेऊन माझ्या छातींत खुपसूं नकोस ! छे ! तूं तसं करणार नाहींस ! तूं चोर असलास तरी माणूस आहेस ! अंधारांत माझ्यावर वार करायला तूं हिंदुत्वनिष्ठ गुंड नाहींस ! छान ! किती कौशल्यानें तूं आतां माझ्या

सामानांची तपासणी करण्यास सुरवात केली आहेस! अरे वा! माझ्या कोटाचा खिसा चांचपण्यास लागलास कीं! अरे मूर्खा, काय आहे त्या खिशांत? तुला वाटतं तें नोटांचं पुडकं असेल! नाहीं रे! आजच टपालनें आलेल्या एक डझन कवितांचं तें बंडल आहे! हं, आंतल्या खिशांत हात घालूं नकोस! पैशाचं पाकीट नाहीं तें! सावकाराची नोटीस आणि कोर्टांच्या डिक्र्या आहेत त्या! वरच्या खिशांतहि धुंडाळूं नकोस! एका कुरूप मैत्रिणीनें सक्रांती निमित्त दिलेले तिळगुळ मी न खातां तसेच ठेवले आहेत त्या खिशांत! अरेरे! केवढी निराशा झाली तुझी! तुला एखादं घड्याळ किंवा फाऊन्टन पेनहि मिळालं नाहीं! कसं मिळणार? ज्याला काळवेळाचं बंधन नाहीं, आणि जो नेहमीं बोरूनं लिहितो अशा संपादकाकडे तुला घड्याळ आणि झरणी कोठून मिळेल?

* * * *

**चोरा, जरा हळू!** तूं आतां माझ्या ट्रंकेचं कुलूप फोडायला लागलास! अरे कुलूप फोडण्याचे श्रम कशाला घेतोस? टेबलाच्या उजव्या खणांत किल्ली आहे, ती घेऊन ट्रंक उघड. काय मिळणार तुला त्या ट्रंकेंत? दागिनें? कपडेलत्ते? छे छे! फक्त अडीच आणे आहेत त्या ट्रंकेंत! पण तूं त्याला हात लावणार नाहींस याबद्दल मला खात्री आहे. एवढा मोठा गटाराचा पाईप चढून तूं वर आलास, तें काय फक्त अडीच आण्यासाठीं? हं, संपलं तुझं काम! केवढा घामाघूम झालास तूं! बाहेर निसटून जाण्याची घाई झाली आहे तुला! कावऱ्या बावऱ्या मुद्रेनें वर खालीं काय बघतोस? तूं खुशाल निघून जा. तुला कोणीहि पकडणार नाहीं. तुला मी पोलीसाच्या स्वाधीन करणार नाहीं. उलट तुला या घरांत विनाकारण श्रम पडले याबद्दल मला वाईट वाटते. निराशेनें केवढा खिन्न झाला आहे तुझा चेहरा! तुला आतां रिकाम्या हातानें परत जातांना पाहून मला केवढं दुःख होत आहे याची तुला कल्पना नाहीं. तूं मला खास शिव्या देत असशील! पण असा रागाऊं नकोस. उद्यां सकाळीं मला इराण्याच्या हॉटेलांत भेट. आपण दोघेहि आनंदानें चहा घेऊं! हं चोरा, जरा हळू! हळूच निघून जा. पावलांचा आवाज करूं नकोस!

# चोरा, जरा हळूं !

**चोरा, जरा हळूं !** गटाराच्या पाईपवर मोठ्या कौशल्यानें चढून खिडकींतून उडी मारून तूं माझ्या घरांत प्रवेश केलास ! मध्यरात्रीची सामसूम पाहून, तूं या अंधारांत दबकत दबकत माझ्या खोलींत शिरलास ! इंग्रज लोक हिंदुस्थानांत ज्या हिकमतीनें घुसले, त्यापेक्षां जास्त अकल हुषारी लढवून तूं माझ्या खोलींत घुसलास ! तुला वाटत असेल, मी केवढ्या सफाईनें आलों ! पण मूर्खा, तुझी चाहूल लागून मी जागा झालों आहें ना ! तुझ्या चोरट्या पावलानें आवाज न होऊं देण्याची कितीहि सावधगिरी घेतली असली तरी, गुन्हेगार माणसाच्या धडधडणाऱ्या हृदयाचे ठोके मला ऐकूं आल्याशिवाय कसे राहतील ? आणि वेड्या, तूं कशाला आलास या निष्कांचन माणसाच्या घरीं ! तुला इथें काय मिळणार आहे ? ज्या घरांत उंदरांना सुद्धां दाणा मिळणें मुष्कील, त्या घरांत माझ्या मित्रा, तुला धनदौलत कोठून मिळणार ? उगीच इथं येण्याचें श्रम घेतलेस ! तुझी या ठिकाणीं निराशा होणारच, पण माझी मात्र विनाकारण झोंपमोड झाली ना !

* * * * *

**चोरा, जरा हळूं !** गडबड करूं नकोस. तुला जे कांहीं करायचं आहे तें सफाईनें कर. अंधारांत आवाज न करतां हालचाल करायची, कठीण काम आहे हें खरें असलें तरी तूं चोर आहेस हें लक्षांत ठेव. चोराला ही विद्या आली पाहिजे. हं, असा दचकूं नकोस. माझा खोकल्याचा आवाज तुला ऐकूं आला म्हणून घाबरलास होय ? अरे, भिऊं नकोस. मला गाढ झोंप लागली आहे असेंच तूं समज ! उगीच घाबरटपणानें सुरा बिरा घेऊन माझ्या छातींत खुपसूं नकोस ! छे ! तूं तसं करणार नाहींस ! तूं चोर असलास तरी माणूस आहेस ! अंधारांत माझ्यावर वार करायला तूं हिंदुत्वनिष्ठ गुंड नाहींस ! छान ! किती कौशल्यानें तूं आतां माझ्या

सामानांची तपासणी करण्यास सुरवात केली आहेस! अरे वा! माझ्या कोटाचा खिसा चांचपण्यास लागलास कीं! अरे मूर्खा, काय आहे त्या खिशांत? तुला वाटतं तें नोटाचं पुडकं असेल! नाहीं रे! आजच टपालानें आलेल्या एक डझन कवितांचं तें बंडल आहे! हं, आंतल्या खिशांत हात घालूं नकोस! पैशाचं पाकीट नाहीं तें! सावकाराची नोटीस आणि कोर्टाच्या डिक्र्या आहेत त्या! वरच्या खिशांतहि धुंडाळूं नकोस! एका कुरूप मैत्रिणीनें सक्रांती निमित्त दिलेले तिळगुळ मी न खातां तसेच ठेवले आहेत त्या खिशांत! अरेरे! केवढी निराशा झाली तुझी! तुला एखादं घड्याळ किंवा फाऊन्टन पेनहि मिळालं नाहीं! कसं मिळणार? ज्याला काळवेळाचं बंधन नाहीं, आणि जो नेहमीं वोरूनं लिहितो अशा संपादकाकडे तुला घड्याळ आणि झरणी कोठून मिळेल?

* * * *

**चोरा, जरा हळू!** तूं आतां माझ्या ट्रंकेचं कुलूप फोडायला लागलास! अरे कुलूप फोडण्याचे श्रम कशाला घेतोस? टेबलाच्या उजव्या खणांत किल्ली आहे, ती घेऊन ट्रंक उघड. काय मिळणार तुला त्या ट्रंकेंत? दागिनें? कपडेलत्ते? छे छे! फक्त अडीच आणे आहेत त्या ट्रंकेंत! पण तूं त्याला हात लावणार नाहींस याबद्दल मला खात्री आहे. एवढा मोठा गटाराचा पाईप चढून तूं वर आलास, तें काय फक्त अडीच आण्यासाठीं? हं, संपलं तुझं काम! केवढा घामाघूम झालास तूं! बाहेर निसटून जाण्याची घाई झाली आहे तुला! कावऱ्या बावऱ्या मुद्रेनें वर खालीं काय बघतोस? तूं खुशाल निघून जा. तुला कोणीहि पकडणार नाहीं. तुला मी पोलीसाच्या स्वाधीन करणार नाहीं. उलट तुला या घरांत विनाकारण श्रम पडले याबद्दल मला वाईट वाटते. निराशेनें केवढा खिन्न झाला आहे तुझा चेहरा! तुला आतां रिकाम्या हातानें परत जातांना पाहून मला केवढं दुःख होत आहे याची तुला कल्पना नाहीं. तूं मला खास शिव्या देत असशील! पण असा रागाऊं नकोस. उद्यां सकाळीं मला इराण्याच्या हॉटेलांत भेट. आपण दोघेहि आनंदानें चहा घेऊं! हं चोरा, जरा हळू! हळूच निघून जा. पावलांचा आवाज करूं नकोस!

# भाड्याच्या पलंगावर !

**वाचकहो, जरा हळूं!** जरा हळू बोला! जरा हळूं चाला! आवाज करूं नका! कारण या ठिकाणीं मथू झोंपली आहे. भाड्याच्या पलंगावर मथू झोंपली आहे. शांत क्लांत होऊन झोंपली आहे. लाचार बेजार होऊन झोंपली आहे. थकलेला देह आणि विटलेलें मन क्षणभर विश्रांतिसाठीं या ठिकाणीं बेभान पडलें आहे. म्हणून जरा दया करा आणि हळूं बोला! कारण मथू जर जागी झाली, तर मोठा अनर्थ होईल! मथू जर जागी झाली, तर मोठा कहर होईल. तिला अशीच स्वस्थ पडूं द्या. या मलीन चेहऱ्यावर हे अश्रूंचे ओघळ कसले? या सुकुमार गात्रांना हा शीण कां आला? तिला कसल्या तरी वेदना होत असतील! डोळ्याच्या या नाजूक पापण्या आणि ओंठाच्या या कोमल पाकळ्या थरथरत कां आहेत? छे छे! वाचकहो, चालते व्हा इथून! आपलं इथं काम नाहीं. तिला बिचारीला झोंपू द्या!

* * * *

**भाड्याच्या पलंगावर** मथू झोंपली आहे. होय! भाड्याच्या पलंगावर! कारण हा पलंग तिचा स्वतःचा नव्हें! हा भाड्याचा पलंग आहे. दरमहा चार रुपये या पलंगाचं भाडं आहे. मथूच्याच घरीं हा भाड्याचा पलंग आहे असं नव्हें! मुंबईतील अनेक वेश्यांच्या घरीं असे भाड्याचे पलंग असतात. भाड्याचं फर्निचर असतं. भाड्याचा फोनो असतो. फार काय भाड्याचे दागिनेहि असतात. भाड्याचा पलंग आणि उधारींचं लुगडं या भांडवलावर मुंबईतील असंख्य हतभागी वेश्या गुजराण करून असतात! या जगांत माणसाला रुबाब लागतो. तो खरा असो, खोटा असो. या जगांत माणसाला भपका लागतो. तो सत्य असो, कृत्रिम असो. अवडंबराशिवाय आणि बाह्य देखाव्याशिवाय माणसाची कदर होत नाहीं. आणि वेश्यांची तर मुळीच होत नाहीं. म्हणून जिला गातां येत नाहीं अशी बेसूर गळ्याची वेश्या सुद्धां आपल्या घरीं उगीच एक तंबोरा ठेवून देते!

* * * * *

**भाड्याच्या पलंगावर** मथू झोंपली आहे. तिला मोहनिद्रा लागली आहे. तिच्या थकल्या-भागल्या देहावर निद्रादेवीनें ममतेची पांखर घातली आहे. सत्यसृष्टींतील कठोर व्याप विसरण्याइतकी तिला क्षणभर गुंगी आली आहे, तोंच ती जागी झाली तर ? तुम्हांला माहीत नाहीं केवढा अनर्थ होईल ? आतां रात्रीचे बारा वाजले आहेत. गेल्या तीन तासांत तिच्याकडे तीन प्रकारचे तीन पुरुष येऊन गेले ! त्या तीनहि यजमानांची सरबराई करतां करतां मथू अगदीं हैराण झाली होती. पहिला गृहस्थ दारू पिऊन तर्रर्र होऊन आला होता. त्या दारूचा दर्प मथूच्या नाकांत अद्याप घुटमळत आहे. मथूला इतकी शिसारी आणि ओकारी आली होती कीं, तिनें पांच दहा वेळां तरी नळावर जाऊन खांकरून खोंकरून तोंड स्वच्छ धुवून घेतलं ! एवढ्यानेंच मथूचें संकट टळलें नाहीं. दुसरा गृहस्थ जो आला तो पैशासाठीं घासाघीस करून गेला. आणि तिसरा जो आला तो आपण पोलीस असल्याचें सांगून फुकट मेजवानी झोडून गेला ! मथूला अगदीं वीट आला ! मथू अगदीं थकून गेली ! तीन तासांत तीन पाहुण्यांकडून विटंबना करून घेतल्यानंतर मथू अगदींच कंटाळली आणि पलंगावर जाऊन पडली. तिला तिथेंच झोंप लागली !

* * * * *

**भाड्याच्या पलंगावर** मथू झोंपली आहे. अगदीं संतस्त होऊन, हताश होऊन झोंपली आहे. वाचकहो, जरा हळूं बोला ! जरा हळूं चाला ! तुमच्या पावलाच्या आवाजानें जर मथू जागी झाली, तर मोठा अनर्थ होईल ! कारण उद्यां सकाळी तिला आपल्या खोलीचं भाडं द्यायचं आहे आणि भाड्याचे पैसे तर अपुरे आहेत. उद्यां सकाळीं दाणेवाला आणि कापडवालाहि वसुलीसाठीं तिच्या घरीं येणार आहेत. दूधवाल्याचं बिल तिनें काल चुकतें केलें असलें, तरी एका मारवाड्याचा हप्ता तिला उद्यां भरावयाचा आहे ! म्हणून म्हणतो, कृपा करून मथूला झोंपेंतून उठवूं नका ! कारण ती जर जागी झाली, तर पुन्हां पैसे मिळविण्याच्या आशेनें देहविक्रयास तयार होईल ! छे छे ! आतां रात्र केवढी झाली ! बारा वाजून गेले ! मथूला थोडा तापहि आला आहे ! तिनें आपल्या देहाची विटंबना करून घ्यावी हें ठीक नाहीं ! म्हणून सर्व वाचकांना हात जोडून प्रार्थना आहे की, कृपा करून गोंगाट करूं नका. मथूला स्वस्थ झोंपूं द्या. ती जागी झाली तर मोठा अनर्थ होईल !

# दिग्दर्शका, रात्र वैऱ्याची आहे !

[ कडका फिल्म कंपनीचा पहिलाच बोलपट जेव्हां पहिल्याच रात्रीं पडला— ]

**दिग्दर्शका, रात्र वैऱ्याची आहे !** तुझा नवा बोलपट आज रात्रीं या थिएटरांत सुरूं होत आहे. पण आजची रात्र कशी काय जाईल याची मला चिंताच वाटत आहे. थिएटरांतले साडेतीन प्रेक्षक पाहिले कीं, आजचें लक्षण मला कांहीं ठीक दिसत नाहीं. ही रात्र केवढी भयाण वाटते मला ! निशादेवीचा चेहरा काळा ठिक्कर पडला असून, तुझा बोलपट आज सुरूं होणार म्हणून चंद्र सुद्धां लज्जित झाला आहे आणि ढगाआड त्यानें आपलें तोंड लपवून घेतलें आहे. दिग्दर्शका, रात्र वैऱ्याची आहे. थिएटरांतला हा शुकशुकाट पहा. चार आण्याची तिकीटें सुद्धां अद्याप खपलीं नाहींत. नव्या बोलपटाच्या पहिल्याच खेळाला जर ही दुर्दशा, तर पुढें काय ? हा वैभवशाली नावीन्यपूर्ण बोलपट जर पहिल्याच रात्रीं पडला तर यापेक्षां दैवदुर्विलास तो कोणता ? लग्नाच्या पहिल्याच रात्रीं नवऱ्याला ताप यावा, क्रिकेट सामन्यांत पहिल्याच चेंडूला नायडू ' आऊट ' व्हावा, त्याप्रमाणें हे नामांकित डायरेक्टरा, तुझा हा तडाखेबंद बोलपट पहिल्याच रात्रीं पडावा म्हणजे केवढा अनर्थ !

* * * *

**दिग्दर्शका, रात्र वैऱ्याची आहे !** तूं हातांत व्हिस्कीचा पेला घेऊन नटीशीं गुलगुल गोष्टी करीत बसला आहेस. मूर्खा, गाफील होऊं नकोस. तुझ्यावर ओढवणाऱ्या अनर्थाची तुला कल्पना नाहीं. दिग्दर्शका, सावध हो ! डोळे उघड ! तुझ्या थिएटरा-पासून प्रेक्षक दूर दूर पळत आहेत. अजून साडेबारा रुपयांचासुद्धां गल्ला नाहीं. तिकीट विकणारे झोपा काढीत आहेत आणि डोअरकीपर्स जड पावलांनीं शेंगदाणे खात उभे आहेत. थिएटरला स्मशानाची अवकळा आली आहे. केवढा भीषण

शुकशुकाट हा! भुताटकीच्या घराप्रमाणें आज हें थिएटर निर्मनुष्य दिसत आहे. लोकशाही स्वराज्य पक्षाच्या सभेलासुद्धां यापेक्षां जास्त गर्दी खचित असेल. गणपति उत्सवांत रा. म. आठवल्यांच्या व्याख्यानाला सुद्धां यापेक्षां जास्त गर्दी खचित असेल! अरेरे! काय हा खडतर प्रसंग! कोणताहि नवा बोलपट पहिल्याच रात्रीं एवढ्या जोरानें कधींच आपटला नसेल! एखादा रद्दी बोलपट एक आठवड्यानें पडतो, दोन आठवड्यांनीं पडतो, पण हे दिग्दर्शका, तुझा हा बोलपट मात्र पहिल्याच रात्रीं पडला आहे! म्युनिसिपालिटीच्या निवडणुकींत हिंदु वीर जसे सपशेल पडतात, त्याप्रमाणें तुझा हा बोलपट दणदणून पडला आहे! पहा, माझा चेहराहि पडला आहे, डोअर-कीपर्सचे चेहरेहि पडले आहेत, आणि हे भंपक दिग्दर्शका, थोड्या वेळानें तुझा चेहराहि खास पडेल!

* * * *

**दिग्दर्शका, रात्र वैऱ्याची आहे!** ही घोर निशा ब्लॅक आऊटमुळें मला अधिकच भयाण वाटत आहे. तुझा बोलपट आतां सुरू झाला. तुझ्या बोलपटाच्या पार्श्व संगीताला घुबडाचा घूत्कार साथ देत आहे. उद्यां वर्तमानपत्रांत या पडेल बोलपटाबद्दल टीकाकार काय म्हणणार तें म्हणोत, पण आज मात्र थिएटरच्या दारांत दोन कुत्रीं भुंकत आहेत. तुझ्या बोलपटाला घाबरून जे प्रेक्षक पळाले ते धन्य होत. पण जे कांहीं थोडे दुर्दैवी प्रेक्षक आंत आहेत, ते जांभया देत बसले आहेत, आणि लवकरच इंटरव्हलच्या पूर्वी ते तुला शिव्या देत बाहेर पडतील यांत शंकाच नाहीं. तुझ्या बोलपटाचे कथानक काय तें प्रेक्षकांना अद्याप कळलें नाहीं. कथा आणि संवाद तूंच लिहिलें असल्यामुळें तें तुझ्याशिवाय इतरांना कळणें शक्य नाहीं. तुझ्या बोलपटांत मुख्य नटी गायला लागली कीं, प्रेक्षक कानांत बोळे घालून घेतात. तुझ्या बोलपटाची फोटोग्राफी एवढी अचाट आहे कीं, प्रेक्षकांनीं डोळ्यांवर रुमालाची पट्टी बांधून घेतली आहे. तुझ्या बोलपटांतील नृत्य काय वर्णावें! नाचणाऱ्या नटीचे पाय हत्तीच्या पायासारखें दिसत असल्यामुळें तिच्या पायाला नारू झाला आहे कीं काय अशी प्रेक्षकांना शंका पडली आहे. तुझ्या हिरोईनचे पुढें आलेले दोन दांत 'क्लोज अप' मध्यें इतके उठून दिसतात कीं, तिच्यावर प्रेम करणाऱ्या नायकाला उद्यां चोप देण्याचा प्रेक्षकांनीं विचार केला आहे. एकंदरींत काय, दिग्दर्शका, रात्र वैऱ्याची आहे. तूं इथून पलायन कर. एक क्षणभरहि थांबू नकोस. नाहीतर खवळलेले प्रेक्षक तुझ्यावरहि

अंडीं फेंकतील असा दाट संभव आहे. लक्षावधी रुपये खर्चून, शेंकडों गॅलन पेट्रोल आणि हजारो गॅलन दारू खर्च करून, रात्रपाळ्या आणि दिवसपाळ्या करून, तूं जो हा अभिनव बोलपट तयार केलास, त्याचा पहिल्याच रात्रीं असा अंत व्हावा ना! दिग्दर्शका, पळ! पळ! रात्र वैऱ्याची आहे!

---

# आधुनिक शाकुंतल

**[स्थळः-मलबार हिलवरील कण्वमहाल. मिस् शकुंतला आपल्या दोन मैत्रिणींसह गच्चीवरील फुलझाडांच्या कुंड्यांना पाणी घालीत आहे. इतक्यांत बॅरिस्टर राजा दुष्यंत हातांत टेनिस बॅट घेऊन चेंडू शोधीत शोधीत त्या ठिकाणीं येऊन थडकतो.]**

**दुष्यंतः**—(स्वगत)–अहाहा! काय हें सौंदर्य! कोण ही पेन्शनरकन्या कडेवर घागर घेऊन तरुवल्लरींना पाणी घालीत आहे? अशा सुकुमार बालिकेवर अशी कष्टाचीं कामें करण्याचा प्रसंग यावा ना!

**शकुंतलाः**—(आपल्या सखीस)–सखे प्रियंवदे, कोण मेला ग तो आमच्या गल्लींत घिरट्या घालीत आहे? तो पहा, दिव्याच्या खांबाआड लपून बसला! कोणी चोर बीर नाहीं ना?

**प्रियंवदाः**—अग, तूं ओळखत नाहींस त्याला? तो राजा—

**शकुंतलाः**—कोण? राजा पंडित?

**प्रियंवदाः**—छे!

**शकुंतलाः**—राजा नेने?

**प्रियंवदाः**—नाहीं ग! अग, तूं अशी मट्ठ कशी? एवढी वयांत आलीस तरी गांवातल्या तरुण श्रीमंतांना तूं ओळखत नाहींस म्हणजे काय? अग, तो राजा दुष्यंत. प्रख्यात बॅरिस्टर आणि खुशाल चेंडू—

**अनसूयाः**—त्यांचा चेंडू हरवला आहे म्हणे! गडे शकुंतले, ते म्हणतात, त्यांचा चेंडू या गच्चीवर आला आहे.

११ ७०८१०

**शकुंतला:**—( पदर सावरून )-इश्य !

**दुष्यंत:**—( स्वगत )-अहाहा ! किती नखऱ्यानें पण हिनें आपला पदर सावरला !

( पद )

**तनु इची सुंदरा। सहज मनोहरा।**
**काय ही जातीची अप्सरा। पंकज कोमल तरा।**

**शकुंतला:**—सखे अनसूये, हा पदर मेला फारच वाऱ्यानें उडूं लागला आहे ! काय करावं बाई वाऱ्याला ?

**प्रियंवदा:**—अग, वाऱ्याचा काय दोष ? तुझे तारुण्यच पदराला धक्के देऊन स्थानभ्रष्ट करीत आहे—

**दुष्यंत:**—( स्वगत ) हिच्या या सुंदर देहाला हें साडेचार रुपयांचं हलकं पातळ अगदींच अयोग्य आहे. वास्तविक बहुमोल असा भरजरी शालूच हिच्या तनूला हवा होता. तरीपण ह्या हलक्या पातळांतसुद्धां ही किती शोभून दिसते !

( पद )

**शैवाले युक्त जैसे पंकज तें शोभते।**
**शशिमाजी लांछनाची बहु शोभा दिसते।**
**तैसी ही पातळानें किती नामी वाटते।**
**जातीच्या सुंदरांना कांहीही शोभते।**

**अनसूया:**—अगबाई, हा तर अगदींच पागल झाला ! गडे शकुंतले, हुश्यार !

**शकुंतला:**—सखे अनसूये, मी फुलझाडांना पाणी घालतांच हा एक मच्छर वेलींतून निघून माझ्या बाई तोंडाभोंवती घिरट्या घालूं लागला. काय तरी करूं ?

( गाल चोळीत मच्छरबाधेचा अभिनय करते )

**दुष्यंत:**—काय या मच्छराचें भाग्य तरी !—

(पद)

वीरा मच्छरा, जन्मुनि सार्थक केलें तूं या जागीं।
वसलों विचारांत आम्ही उगी ॥ या प्रमदेच्या वक्र कटाक्षा।
पात्र होसी तूं गड्या ॥ अमुच्या गप्पा मनि कोरड्या ॥

**शकुंतला**—हा दांडगा नाहीं ऐकत! दुसरीकडे तरी जावें! (मच्छराकडे पाहून) काय? इकडेहि माझ्या पाठीला लागून आला! (घाबरून) सख्यांनो, सोडवा ग मला सोडवा! पहा, या दुष्ट मच्छरानें कशी माझी पाठच घेतली आहे!

**प्रियंवदा** (हंसून)—अग, आम्ही सोडविणार कोण? बॅरिस्टर दुष्यंताला हांक मार. कारण तरुणींची दुःख तरुणांनींच दूर करावयाची!

**दुष्यंत** (स्वगत)—आतां ही वेळ पुढें जाण्यास फार चांगली आहे. पण माझ्यासारख्या परक्या पुरुषाला पाहून हीं अल्लड पोरं विचकणार तर नाहींत!

**शकुंतला**—देवा! देवा! हा मच्छर इकडेहि आला!

**दुष्यंत**—(पोयशा घेऊन त्वरेनें पुढें जातो.)—हा खबरदार! दुर्जनांचा शास्ता बॅरिस्टर दुष्यंत मुंबानगरींत हयात असतां, कोण रे तो दुष्ट या पेन्शनर कन्येला त्रास देत आहे?

**शकुंतला**—सखे अनसूये, कोण ग हा चोंबडा माझ्याशीं लगट करीत आहे? प्रियंवदे, आंत जा आणि माझी छडी घेऊन ये पाहूं!

(दुष्यंताला तीन छड्या मारते. दुष्यंत पळतो.)

# अलबेली मुंबई !

[ मुंबई शहराची माहिती कोणाला नाहीं ? तरी पण आज या ठिकाणीं दिलेली जादा माहिती मुंबईकरांना मनोरंजक वाटेलच, पण बाहेरगांवच्या लोकांनाहि उद्बोधक होईल ! ]

**मुंबई**—हिंदुस्थानांतील वैभवसंपन्न व रमणीय शहर. प्रचंड औद्योगिक केंद्र. बंदर आणि रेल्वे स्टेशन.

**नकाशा**—भिस्त्याच्या पखालीसारखा.

**रचना**—खालीं गटार आणि वर आकाश.

**वस्ती**—१५ लाख माणसं आणि ३० कोटी उंदीर.

**लोकांचें मुख्य अन्न**—चहा.

**दुय्यम अन्न**—राईस प्लेट.

**लोकांचा षोक**—भेळ खाणें, सिनेमा पाहणें, बायकोच्या हातांत हात घालून फिरणें.

**मुख्य व्यापार**—सट्टा.

**चोरटा व्यापार**—कंट्री दारू गाळणें, प्रेम करणें.

**कलाकौशल्य**—धांवत्या गाडींत चढणें; धांवत्या गाडींतून उतरणें. गर्दीत खिसा कापणें. गर्दीत सिनेमाचं तिकीट मिळविणं, इ०

**रिकामपणची कामगिरी**—अफवा पसरविणें. कांही बोटी बुडाल्याच्या बातम्या एकमेकास सांगणें.

**मुख्य व्यायाम**—भिकाऱ्यांना सलाम करणें. माड्या चढणें आणि उतरणें.

**दुय्यम व्यायाम**—लाठीहल्ला होत असतां सैरावैरा पळणें.

**स्त्रियांचा मुख्य व्यायाम**—नळावर भांडणें. भाजी मार्केटांत चक्कर मारणें.

**स्त्रियांचा दुय्यम व्यायाम**—मान मुरडणें, वेणीचा शेपटा हलविणें, पदर सावरणें.

**लोकांचा स्वभाव**—दिलदार, अत्यंत सभ्य. स्त्री दाक्षिण्यास तत्पर. पैसे कसे खर्चे करावे हीच चिंता.

**विशेष सद्गुण**—दुसऱ्याच्या भानगडीकडे संपूर्ण दुर्लक्ष करणें आणि स्वतःच्या भानगडींत रमून जाणें.

**भाषा**—अखिल भारतीय खिचडी.

**मुख्य भाषा**—धेडगुजरी.

**दुय्यम भाषा**—बटलर इंग्लिश.

**जिव्हाळयाचा शब्दप्रयोग**—साला.

**धार्मिक भावना**—मारुतीला तेल घालणें, कबूतराला दाणे घालणें, गाईला घास घालणें, बायकोला घास घालणें.

**वाचन**—अत्यंत दांडगे. भवभूति, कालीदास, शेक्सपिअरपासून सध्या हरीपर्यंत. ‘ टाईम्स ऑफ इंडिया ’ पासून ‘ कोल डेली ’ आणि ‘ मोती वधारो ’ पर्यंत.

**चाल चालणूक**—फूटपाथ वगळून रस्त्यानें चालणें.

**नजर**—पहिल्या माळ्यावर आणि दुसऱ्या माळ्यावर.

**मुख्य वाहन**—एकटा असल्यास ट्राम. बरोबर बाई असल्यास मोटार.

**फॅशन**—राजकारणावर वादविवाद करणें.

**विक्षिप्त खोड**—रस्त्यांत उगीच गर्दी करून पोलीसांना बुचकळ्यांत पाडणें.

**उत्पादन**—संतति.

**आयात**—तरुण वेश्या.

**निर्यात**—म्हाताऱ्या वेश्या.

**शहराचा बंदोबस्त**—कडेकोट. ठिकठिकाणीं लाठीवाले पोलीस आणि गल्लोगल्लींतून भुंकणारीं कुत्रीं.

**लोकांची मनोवृत्ति**—पगाराच्या दिवशीं रंगेल आणि इतर वेळीं निराश.

**मुख्य रोग**—हृद्रोग.

**दुय्यम रोग**—अग्निमांद्य.

**प्रेक्षणीय स्थळें**—सिनेमा स्टुडिओ आणि नटी.

**सुधारणा**—सरकारी धान्याच्या दुकानावर एका रांगेंत शिस्तींत उभें राहणें.

**पोषाख**—वॉशिंग कंपनींतून जो मिळेल तो.

**स्त्रियांचा पोषाख**—लठ्ठ असल्यास गोल. सडपातळ असल्यास सकच्छ.

**मुख्य व्यसन**—पानपट्टी.

**दुय्यम व्यसन**—पिवळा हत्ती.

**मुख्य ओरड**—शेअर बाजार.

**दुसरी ओरड**—मासळी बाजार.

**तिसरी ओरड**—फेरीवाला.

**चवथी ओरड**—महागाई भत्ता.

**शिक्षण**—स्त्रीशिक्षणांत प्रगति.

**संस्कृति**—सकाळीं उशीरा उठणें आणि इराण्याकडे चहा घेणें.

# पानपट्टीवाला

[ एका पैशांत पानपट्टी खाऊन शिवाय आरशांत पाहण्याची फुकट सोय पानपट्टीच्या दुकानाशिवाय आणखी कुठें आहे ? ]

ठण् ! ठण् ! ठण् ! हं ! तुमचं लक्ष वेधून घेण्यासाठीं मीं हा घंटानाद केला नाहीं. पितळेच्या चकचकीत तांब्यांत मी ओला कात आणि जहाल चुना तयार करीत आहें. काम जरा रंगेल आहे. म्हणून किंचित् पार्श्वसंगीतासाठीं भांड्यांतून कर्णमधुर खणखणाट झाला तर तो माझा दोष काय ? तुम्हाला काय वाटतं, मी माझ्या धंद्याच्या पब्लिशिटीसाठीं भांड्यावर दांडा आपटून आवाज काढीत आहे ? छे ! छे ! तसा माझा मुळीच हेतु नाहीं. तुमचा जसा जलतरंग, तसा माझा हा पानतरंग ! माझ्या दुकानांतील दहा पांच छोट्या छोट्या भांड्यावर मी एक एक ठोका मारतों आणि तुम्हांला फुकट पान तरंग ऐकवितों !

आतां तुम्हाला कसलं पान देऊं बोला ! देशी का पूणा ? काय म्हणतां, कतरी सुपारी, सुका कात, लवंग, बडीशेप, वेलदोडा, मोहिनी तंबाखू, आणि थंडक सुद्धां ! घ्या शेट ! सगळं कांहीं घ्या. एका पैशाला मी तुम्हाला किती किती जिन्नस देतों याची तुम्हाला कल्पना तरी आहे ? अहो, दुसरा कोणताहि व्यापारी एका पैशांत तुम्हाला इतके जिन्नस कधींहि देणार नाहीं. शिवाय, एका पैशांत पानपट्टी खाऊन वर आरशांत पाहण्याचीहि सोय माझ्या दुकानांत तुम्हाला आहे, हा काय थोडा थोडका फायदा !

एका पैशांत आरशांत पाहा ! आणि रुबाबानें चालायला लागा ! अहो, आमच्या पानपट्टीच्या दुकानांतला आरसा म्हणजे एक और चीज आहे. रस्त्यानें जाणाऱ्या येणाऱ्या कोणीहि माणसानें या आरशांत खुशाल डोकावून आपला बरावाईट चेहरा फुकट पाहून घ्यावा. मदनाचा पुतळा असो, किंवा माकडाचा सहोदर असो,

आमच्या आरशांत नजर टाकल्यांवाचून तो पुढें जातच नाहीं. कित्येक कुरूप स्त्रिया सुद्धां पानपट्टीचं दुकान दिसलं कीं, हळूच चोरून आरशांत पाहतात, ही खाजगी गोष्ट जाहीर करण्याची माझी इच्छा नाहीं!

पानपट्टीचा धंदा, हा मोठा रंगेल व गमतीचा आहे. श्रीमंतांपासून गरीबांपर्यंत सर्वांचाच उदार आश्रय पानपट्टीला रात्रंदिवस मिळत आला आहे एका पैशांत माणसाला भलताच रुबाव आणून देणारी पानपट्टीसारखी दुसरी चीज जगांत नाहीं. कांहीं जण म्हणतात, माणसाला विद्वत्तेनें शोभा येते, कांहींजण म्हणतात, माणसाला पोषाखानें शोभा येते, पण मी नक्की सांगतों, माणसाला पानपट्टीमुळेंच शोभा येते.

पानपट्टी म्हणजे रोमान्स! पानपट्टी म्हणजे शृंगार! आपक माशूकाच्या प्रणयलीलांत पानपट्टीला महत्त्वाचं स्थान आहे. पानपट्टी म्हणजे जिवंत काव्य आहे. ती प्रसिद्ध लावणी तुम्हीं ऐकली आहे का? "**सोडा सोडा मानेची मिठी— बिघडली पट्टी—**"

आमच्या पानपट्टीच्या दुकानांनीं मुंबई शहराला किती तरी शोभा आणली आहे, हें कोण नाकबूल करील? विश्रांतिगृहाच्या कडेला, नाक्या नाक्यावर, कमालीच्या सजावटींनें डौलदार, रुबाबदार दिसणारं तांबूलगृह म्हणजे मानवी कलाकौशल्याची परमावधी नाहीं काय? गुलाब पुष्पांच्या सुकुमोल पाकळ्या पानांपानांवर पसरल्या आहेत, सोन्यासारख्या स्वच्छ चकचकीत भांड्यांवर सूर्यप्रकाश तळपत आहे, देदिप्यमान आरसा पांथस्थाला भुरळ घालीत आहे, इत्यादि अनेक नखऱ्यांनीं नटलेलं पानपट्टीचं दुकान म्हणजे भूतलावरील स्वर्गच नाहीं काय?

पानपट्टीचं दुकान तुम्हाला हलकं वाटतं, आणि आम्ही पानपट्टीवाले म्हणजे तुम्हीं मवाली समजतां! कारण एक पैश्याला आम्ही पट्टी देतों म्हणून! अहो हीच पट्टी जर तुम्ही एखाद्या माडीवर खाल तर रुपया दोन रुपये त्याची सहज किंमत होते! पण आम्ही स्वस्त देतों म्हणून तुम्हाला आमची कदर नाहीं.

# रात्रीं दहा वाजतां !

**मिस् साळुंकीबाई** ( वसंतरावाचा फोटो हातांत धरून )—" किती छान आहांत हो तुम्हीं ! आणि किती भित्रे पण ! त्या दिवशीं पुलाच्या खालीं मी तुम्हाला भेटलें. अंधार होता. आसपास कुणी नव्हतं ! मीं माझा गाल वर केला ! पण छे ! तुम्हांला कुठं अकल आहे ! तें मुख वर केलें परि नाहीं चुंबिलें ! लग्ना-नंतरहि तुम्हीं असें भित्रेच रहाल कीं काय ? शी बाई ! मला असला भ्याड नवरा मुळींच पसंत नाहीं ! टॅक्सी केली तर चार हात अंतरावर वसतां, व्हिक्टोरिया केली तर समोरच्या 'सीट'वर रामा गड्यासारखे वसतां ! अशानं कसं होणार हो आपलं ? पण माणसानं रोमान्स तरी कसा करायचा ? नाहींतर 'दहा वाजतां' मधला अशोक पहा ! किती चिकटगुंडा आहे ! वसंतराव, जरा धीट व्हा गडे ! परवां तुम्हीं माझ्या घरीं आलांत आणि माझा कुत्रा भुंकायला लागतांच पळून गेलांत ! इश्श ! पुरुषच जर असे भित्रे, तर आम्हीं बायकांनीं काय धोतर नेसायचं ! उगीच नाहीं आपला देश गुलामगिरींत आहे ! आतां काय करूं ? तुम्ही असे पळतां. आतां तुमचा फोटोच हृदयाशीं धरून बसते.

* * * *

**सौ. म्हाळसाबाई** ( नवऱ्याचा फोटो हातांत घेऊन )—" काय बाई नवरा तरी ! अहो आतां किती रात्र झाली, दहा वाजून गेले तरी यांचा पत्ता आहे का ? कुठें शेण खायला गेले कुणाला ठाऊक ! रोज रात्रीं मेला उशीर ! घरची आठवण तरी आहे का यांना ! दोन मुलांचे बाप हे ! यांची अकल चुलींत गेली तरी कशी ? आतां येऊं देत म्हणजे ही लोणच्याचीं बरणीं घालतें टाळक्यांत. पण नको ग बाई ! बरण्या केवढ्या महाग आहेत ! या महागाईमुळें आदळ आपट करण्याची सोयच नाहीं. नाहीं तर पूर्वी मीं आठवड्यांतून दोन चार कपबशा सहज फोडून

टाकीत असें ! पण आतां कपबशीला पडतात बारा आणे ! नवऱ्यावर रागावण्याची आणि मोडतोड करण्याची सोयच नाहीं मुळीं ! जळली मेली ही लढाई ! आम्हां बायकांची किती कुचंबणा होत आहे ! रागानें त्यांचा सदरा फाडीन म्हटलें तरी कपडा किती महाग ! देवा देवा ! आतां मी ह्यांना करूं तरी काय ? दहा वाजून गेले तरी यांचा पत्ता नाहीं ! आतां हे येतील पहाटे चार वाजतां ! नवरा आहे का दूधवाला !

* * * *

**मिस् कलावती** (बंडूनानाचा फोटो हातांत धरून)—" आयुष्यांत हा पांचवा किंवा सहावा फोटो असेल ! गेल्या तीन वर्षांत चार पुरुषांनीं मला दगा दिला. एकानें प्रेमभंग केला, दुसऱ्यानें वचनभंग केला, तिसऱ्यानें विनयभंग केला आणि चवथ्यानें–जाऊं द्या ! पुरुषांची जातच मेली अशी ! जो येतो तो बर्लिन रेडिओप्रमाणें थापा मारून जातो ! आतां विश्वास तरी कुणावर ठेवायचा ! बंडोपंत, आतां तुम्ही तरी एकनिष्ठ राहाल ना माझ्याशीं ! कराल ना लग्न माझ्याशीं ? बाकी तुमच्या चेहऱ्यावरून तुम्ही लबाड दिसत नाहीं ! किती छान आहे हा तुमचा फोटो ! माझ्या पलंगावर किती शोभून दिसतो ! अहो, फोटोच जर इतका शोभतो, तर तुम्ही किती शोभाल ? पण नेम काय सांगावा ? तुम्हीहि लग्नाचं वचन देऊन मला फसवलंत तर ? कदाचित् पुढच्या वर्षी हा फोटो टाकून दुसऱ्याच एखाद्याचा फोटो घेऊन चिंतन करीत बसण्याचा प्रसंग येणार नाहीं कशावरून ? बंडूनाना, रागावूं नका ! दुधानं तोंड पोळलं म्हणजे ताक फुंकर मारून प्यावं लागतं. चारपांच तरुणांच्या चुंबनानें होरपळलेले हे ओंठ नव्या पुरुषाशीं मैत्री करतांना किती थरथर कांपतात !

# पत्नीची सहा महिने मुदतवाढ !

श्री. गुंडोपंत गिरमीटकर यांस—

स. न. वि. वि.

तुम्हीं पहिली बायको टाकून देणार असून दुसरी करणार आहांत आणि त्यासाठीं तुम्हीं माझ्या मुलीला मागणीहि घातली आहे, याबद्दल मी तुमचा अत्यंत आभारी आहे.

पण तुम्हांला कळविण्यास वाईट वाटतें कीं, माझी प्रिय कन्या सौभाग्यकांक्षिण चिंगी तुमच्याशीं लग्न करण्यास बिलकूल तयार नाहीं.

कारण तुम्हांला पहिल्या बायकोपासून कपाळाला, डोक्याला, बरगड्याला, गंभीर स्वरुपाच्या जखमा झाल्या आहेत. तुमच्या प्रेमळ पत्नीनें वेळीं अवेळीं तुमच्यावर लाटणें, डबा, लोणच्याची बरणी इत्यादि वस्तु फेंकून तुमच्या अवयवांची नादुरुस्ती केली आहे.

त्याचप्रमाणें तुमची सांपत्तिक परिस्थिति आणि घरदारहि विशेष समाधानकारक नाहीं. तुमच्यामागें कर्जदारांचा तगादा असून तुमचं राहतं घर उंदीर–घुशींच्या पंचमस्तंभांनीं पोखरून काढलं आहे. त्याचप्रमाणें तुम्हाला वरेच शत्रू असून तुमच्या-वर केव्हां हल्ला होईल याचा नेम नाहीं. म्हणून तुमच्या जीवितालाहि धोका आहे.

अशा परिस्थितींत कोणता मूर्ख गाढव तुम्हांला आपली कन्या देईल ? तरी तुम्ही आमचा नाद सोडून दुसरीकडे खटपट करावी. कळावे.

आपला,

**रंगराव रेवडीवाले**

*   *   *   *   *

श्री. गुंडोपंत गिरमीटकर यांस—

स. न. वि. वि.

आपलें गुलाबी पाकिटांतील पत्र मिळालें, आणि त्याबरोबर पाठविलेला आपला फोटो पाहूनहि आनंद झाला.

आपण प्रेमपत्र फार चांगलें लिहितां आणि फोटोहि फार सुंदर काढून घेतला आहे, याबद्दल मी आपलें कौतुक करतें.

पण हा खोटा प्रचार आहे हें मी जाणून आहे. असल्या दिखाऊ प्रेमपत्रांनीं आणि फोटोंनीं हुरळून जाण्याइतकी मी मूर्ख बाई नाहीं. तुम्ही आपला फोटो पाठविण्यापेक्षां शरीर प्रकृति व मेंदू तपासून डॉक्टरचं सर्टिफिकेट पाठविलें असतें तर बरें झालें असतें!

तुम्हीं कितीहि खोटा प्रचार केला, तरी आम्ही शहाण्या बायका अशानें फसणार नाहीं. तुमची खरी परिस्थिति मला माहित आहे. तुमच्याशीं लग्न करण्यापेक्षां विहिरींत जीव देणं कांहीं वाईट नाहीं!

मी तुमच्या घरीं यायला आणि तुम्हीं ' राम ' म्हणायला एकच गांठ पडली तर विनाकारण ' पांढऱ्या पायाची ' म्हणून माझा दुर्लौकिक व्हायचा!

शिवाय तुमच्या पहिल्या बायकोनें जो कांहीं विचका करून ठेवला आहे तो निस्तरण्याची माझ्या अंगांत ताकद नाहीं.

तुमच्याशीं लग्न करून भलतीच जबाबदारी पत्करण्याची माझी इच्छा नसल्यामुळें तुमचें गुलाबी प्रेमपत्र आणि अति सुंदर फोटो परत करीत आहे. आपण दुसरीकडे खटपट करावी, ही विनंति. कळावें.

आपली,

मिस् चंपावती

* * * * *

## गुंडोपंताचें पहिल्या बायकोस पत्र

सकलगुणालंकृत प्रिय पत्नी म्हाळसाबाई हीस—

नवरोजी गुंडोपंत यांच्याकडून हात जोडून आशीर्वाद.

कळविण्यास अत्यंत आनंद वाटतो कीं, तुला टाकून देऊन दुसरी बायको करण्याचा विचार मीं तूर्त रहित केला आहे. आणखी सहा महिने तरी तूं माझ्यावर

सत्ता गाजवावी अशी माझी इच्छा आहे. तुझ्याइतकी प्रेमळ आणि गुणी भार्या मला अन्य मिळणार नाहीं, आणि तुझ्या हातूनच माझं जें कांहीं बरं वाईट व्हावं अशी तीव्र इच्छा आहे. तूं जात आहेस असें कळल्यावरोवर गोठ्यांतील वैल हंबरडा फोडीत आहे आणि मनी मांजरी अन्न सत्याग्रह करून वसली आहे. तुझा वियोग आम्हा सर्वांनाच असह्य होत असल्यामुळें आणखी सहा महिने तुझ्या गृहिणीपदाची मीं मुदतवाढ केली आहे. कळावें.

आपला,
**गुंडोपंत गिरमीटकर**

---

# अहो तुम्ही. . . . .

अहो प्रोड्यूसर, तुमच्या यशाचें रहस्य काय ?

**—" मी नटी आणतो आणि लोक भांडवल आणतात. "**

* * * *

अहो नटी, तुमच्या यशाचें रहस्य काय ?

**—" मी कांहीं तरी भानगड करीत असते आणि वर्तमानपत्रांत माझं नांव नेहमीं झळकत असतं. "**

* * * *

अहो टांगेवाले तुमच्या यशाचें रहस्य काय ?

**—" मी गिऱ्हाईकांशीं पहिल्यानें ठरवीत नाहीं. मागाहून तक्रार करतों. "**

* * * *

अहो दूधवाले, तुमच्या यशाचें रहस्य काय ?

**—" मी दुधांत पाणी घालीत नाहीं. पाण्यांत दूध घालतों. "**

* * * *

अहो मूर्खशिरोमणी, तुमच्या यशाचें रहस्य काय ?

—" मी सभेंत मौन धारण करतों. "

* * * *

हे सुंदर स्त्रिये, तुझ्या यशाचें रहस्य काय ?

—" मी लग्नाचें वचन देतें. पण लग्न करीत नाहीं. "

* * * *

अहो पुढारी, तुमच्या यशाचें रहस्य काय ?

—" मी दिव्य करीत नाहीं. फक्त वक्तव्य करतों. "

* * * * *

अहो पंतोजी, तुमच्या यशाचें रहस्य काय ?

—" मी वर्गांत झोंपा काढतों आणि मुलं अभ्यास करून पास होतात. "

* * * *

अहो डॉक्टर, तुमच्या यशाचें रहस्य काय ?

—" मी रोग्यांना औषध देत नाहीं. फक्त धीर देतों.

* * * * *

अहो गणिके, तुमच्या यशाचें रहस्य काय ?

—" मी सभ्य लोकांशीं व्यवहार ठेवीत नाहीं. "

* * * *

अहो ज्योतिषी, तुमच्या यशाचें रहस्य काय ?

—" मी खरं कांहीं सांगत नाहीं. फक्त थापा मारतों. "

* * * *

अहो लेखक, तुमच्या यशाचें रहस्य काय ?

—" मी स्वतंत्र कांहीं लिहित नाहीं. वाङ्मय चौर्य करतों. "

* * * *

अहो वकील, तुमच्या यशाचें रहस्य काय ?

—" पक्षकार समेट करावयास उत्सुक असतात. पण मी त्यांना तसें करूं देत नाहीं. "

* * * *

अरे चोरा, तुझ्या यशाचें रहस्य काय ?

—" मी नेहमीं अपटुडेट असतों आणि मित्रांचेच खिसे कापतों."

* * * *

अग कोळिणी, तुझ्या यशाचें रहस्य काय ?

—" मी मासळी बर्फांत ठेवतें आणि गिऱ्हाईकांना दुप्पट भावानें देतें. "

* * * *

अहो पेन्शनर, तुमच्या यशाचें रहस्य काय ?

" तरुणपणीं माड्या आणि म्हातारपणीं टेकड्या चढण्याचा मी व्यायाम घेत आलों. "

# लघु लघुतम कथा!

## त्याचा नंबर!

सरकारी धान्याच्या दुकानावर लांबच लांब रांग लागली होती. तांदूळ घेण्यासाठीं प्रत्येकजण हातांत एकेक पिशवी घेऊन तासन् तास तिष्ठत होता!

गुंडोपंतहि सकाळीं सहा वाजल्यापासून रांगेंत उभे होते. अखेर साडेनऊ वाजतां एकदाचा त्याचा नंबर लागला!

मोठ्या आशेनें गुंडोपंतानें पिशवी पुढें केली!

आणि हाय! दुकानदारानें शांतपणें उत्तर दिलें.

"धान्य संपलं!"

* * * *

## अरे बाबा जाहिरात!

पहिल्या बायकोपासून मूल होत नाहीं म्हणून चिकटोपंतानें दुसरें लग्न केलें!

दुसऱ्या बायकोपासूनहि मूल होत नाहीं म्हणून त्यांनीं तिसरें लग्न केलें!

पण तिसऱ्या बायकोपासूनहि त्यांना मूल होईना!

आतां शेवटचं एकच लग्न करावं म्हणून चिकटोपंतांनीं पुढील जाहिरात दिली—

**"वधु पाहिजे. लेंकुरवाळी."**

* * * *

## वृत्तपत्रांचा हरताळ

सरकारी धोरणाचा निषेध करण्यासाठीं म्हणून वृत्तपत्रांनीं एक दिवस प्रकाशन बंद ठेवावं असें संपादक मंडळींच्या सभेनें ठरविलें.

याबद्दल सर्व संपादकांचे आभार मानतांना सभेचे अध्यक्ष म्हणाले, "तुम्हा

सर्वांचं मी अभिनंदन करतों. तुम्ही सारेजण जो त्याग करीत आहां याबद्दल तुमचे आभार मानावे तेवढे थोडेच. वर्तमानपत्रानें एक दिवस आपलं प्रकाशन बंद ठेवायचं म्हणजे केवढें आर्थिक नुकसान—"

इतक्यांत एक मालक मध्येंच उठून म्हणाले, " तें चूक आहे. एक दिवस प्रकाशन बंद ठेवल्यानें माझा तर फायदाच होईल. कारण मी नुकसानींत वर्तमान-पत्र चालवितों ! "

* * * *

## आंधळ्या स्त्रीची तपश्चर्या !

एकदां एक आंधळी बाई हिमालयाच्या पायथ्याशीं जाऊन घोर तपश्चर्या करूं लागली !

तिची तपश्चर्या पाहून ईश्वर तिला प्रसन्न झाला !

ईश्वर म्हणाला, " हे अंध स्त्रिये, वर माग. "

" देवा, मला दृष्टि दे ! " ती स्त्री म्हणाली.

ईश्वर म्हणाला, " खरं आहे. ही एवढी सुंदर सृष्टि तूं बघूं शकत नाहींस हें केवढं दुर्दैव !—"

ती स्त्री एकदम उसळून म्हणाली, " आग लावा तुमच्या त्या सुंदर सृष्टीला ! मला दृष्टि पाहिजे ती मला आरशांत माझं रूप पहायला मिळावं म्हणून ! "

# नाटक कंपन्यांचा सुळसुळाट !
## आणि
# नाट्यदेवीची किंकाळी !

[ नाट्य निकेतन, लिटल् थिएटर, नवनाट्य मंडळ, ललितकलादर्श संगीत मंडळी, राजाराम संगीत मंडळी, कमलेश नाट्य मंडळ, उत्कर्ष संगीत मंडळी, नाट्यसेवक मंडळी, वीरधवल मंडळी, किशोरी संगीत मंडळी इत्यादि 'मंडळी'च्या बेसुमार गर्दीत गुदमरून महाराष्ट्र नाट्यदेवी मूर्छित पडली आहे. तिला सावध करण्यासाठीं सर्व नाटक कंपनीवाले आपापल्या हातांतील रंगीबेरंगी हँडबिलांनीं नाट्यदेवीला वारा घालीत आहेत. ]

**नाटकवाला नं. १**—देवी, सावध हो ! सावध हो ! भांगवाडींत प्लॅन खुला आहे.

**नाट्यदेवी**—तूं भांग पिऊन आला आहेस का ?

**नाटकवाला नं. १**—हें काय देवी ? मी नवीन नाटक कंपनी काढली आहे हें तुला माहित नाहीं ? ही जाहिरात पहा ! आणि तुला आनंदाची बातमी सांगण्यासाठीं आलों आहे कीं, प्लॅन खुला आहे.

**नाट्यदेवी**—मला ठार करण्याचा प्लॅन ? त्या रेजिसरनें माझा अर्धा जीव घेतला आहे आणि आतां उरला सुरला जीव तुम्ही घेणार ? देवा ! देवा ! आतां मी करूं तरी काय ? ( पुन्हा मूर्छित पडते. )

**नाटकवाला नं. २**—देवी, सावध हो ! माझ्या नाटक कंपनीची बातमी ऐकून घे आणि मग वाटल्यास मूर्छित पड. देवी, आज दुपारीं परळ दामोदर हॉलमध्यें आणि उद्या रात्रीं बालीवाला ग्रँड थिएटरांत—

**नाट्यदेवी**—आणि परवां सकाळीं सोनापूरांत ?

**नाटकवाला नं. २**—अरेरे ! आज देवीला अशा फिट्स कां वरं येतात !

**नाटकवाला नं. १**—देवी, तुझ्या उद्धारासाठीं आम्ही केवढ्या खटपटी लट-पटी करून नव्या नव्या कंपन्या काढतों आणि तूं असा आकांत करतेस म्हणजे काय ? वास्तविक पुणें शहरांतल्या ढेंकणांप्रमाणें नाटक कंपन्यांचा तडाखेबंद सुळ-सुळाट झालेला पाहून तुला आनंद वाटायला पाहिजे.

**नाटकवाला नं ४**—गल्लीगल्लींत दडून असलेल्या बायका आम्ही शोधून काढतों आणि त्यांना नटी करतों. त्यांचे फोटो छापतों—

**नाट्यदेवी**—आग लावा त्या फोटोंना ! यापेक्षां राणीच्या बागेंतील जना-वरांचे फोटो चांगले !

**नाटकवाला नं. ५**—छे ! छे ! आज देवीचं डोकं ठिकाणावर दिसत नाहीं ! काय नशीब पहा ! मराठी नाट्यदेवी मरायला टेकली म्हणून तिला संजीवनी देण्या-साठीं आम्ही अहमहमिकेनें पुढें आलों—

**नाटकवाला नं. ६**—आणि मी माझा नवा खेळ किती महत् प्रयासानं बसविला ! नटीच्या शोधासाठीं मी कन्याकुमारीपासून हिमालयापर्यंत दौरा काढला, चोर बाजारांतून पडदे आणि राजाचा मुकुट आणला, त्या टिल्लू रामाकडून फुक-टांत नाटक लिहून घेतलं, श्री महाकाली विश्रांति गृहांतील आचाऱ्याकडून नवीन चाली बसवून घेतल्या—

**नाटकवाला नं. ७**—आणि हें सगळं कशासाठीं ? मराठी रंगभूमि मरत होती तिला जगविण्यासाठीं !

**नाट्यदेवी**—आतां मात्र मी साफ मरेन याबद्दल मला पूर्ण खात्री वाटत आहे !

**नाटकवाला नं. १**—असं अभद्र बोलणं देवीला शोभत नाहीं !

**नाटकवाला नं. २**—आणि आतां नाट्यदेवी मरेल हें शक्यच नाहीं ! केवढा अपूर्व सोहळा सुरू आहे चोहीकडे ! रंगदेवतेचं केवढं भाग्य पाहा ! उषा मंत्री मुंबईला आली आहे, हिराबाई बडोदकरांनीं पुन्हा कंपनी काढली आहे, नंदू खोटे पुन्हा 'देवी' च्या मागे लागले आहेत, डॉ. भालेराव 'अरे बाबा जाहिरात' करीत आहेत, श्री. भालचंद्र पेंढारकर, मोतीराम रांगणेकर, रेजीसर अळतेकर—

**नाट्यदेवी**—बस्स बस्स! मंडाले शहर संपूर्ण उध्वस्त झालं! तुम्हा सर्वांच्या या अखंड बाँबवर्षावांनीं नाट्यदेवी बेचिराख झाली! आतां तुम्हीं सर्वजण माझ्या मरणकाळची एक शेवटची भैरवी म्हणा, एवढीच माझी हात जोडून अखेरची विनंति आहे. ( किंकाळी फोडते. )

---

# तुला आईची शपथ आहे !

**शू:** ऽऽए **थांब**! ये ना! तुला आईची शपथ आहे. थांबलास? छान! इतक्या अजीजीनं मी तुला हांक मारतें, विनवणी करतें, आणि तूं पुढें जातोस म्हणजे काय? पिंजऱ्यांतल्या मैनेप्रमाणें, मी माझ्या पिंजऱ्यांतून मंजुळ स्वरांत तुला साद घालतें नि तूं खुशाल पुढें चाललास म्हणजे काय? बघ. आतां कसा थांबलास! आईची शपथ घातल्याबरोवर तुझे पाय आपोआप थांबले. असा घावरल्या-सारखा काय बघतोस? नवखा आहेस? होय, दिसतंच आहे. एकोणीस वीस वर्षांचा कोंवळा मुलगा आहेस. तूं वाट चुकून आलास या ठिकाणीं? कीं मुद्दाम आलास? अरे लबाडा! कळलं मला! दार उघडूं? भिऊं नकोस. लाजूं नकोस. पळूं नकोस. अरे थांब! थांब जरा. तुला आईची शपथ आहे!

*  *  *  *

**मध्यरात्रीच्या पाहुण्या**, जरा थांब. तनुविक्रयाच्या बाजारांत तूं आलास, आतां सौदा केल्याशिवाय परत जाणें तुला शोभणार नाहीं. चला, होऊं द्या भवानी! हं, वर पाहूं नकोस. पहिल्या माळ्यावर पाहूं नकोस. दुसऱ्या माळ्यावर पाहूं नकोस. तुझी मति बावचळेल! देहाचें दुकान मांडून बसलेल्या या असंख्य नखरेल पण्यांगना तुला आरपार लुबाडतील! अरे, कुठें तरी शेण खायचंच आहे, मग मी काय वाईट आहें? चल, माझ्या रंगमहालांत. तुझं मी उत्तम स्वागत करतें. रंगमहाल कसला? कबूतर-खानाच आहे हा! हें पहा पिंजऱ्याचें दार उघडलें! ही माझी खोली पाहून घे. हें पहा फाटकं लुगडं मध्यें टाकून पार्टीशन केलं आहे. किती छान आहे पार्टीशन नाहीं? आणि हा माझा मोडका खाट! अगदीं झुलत्या पुलासारखा आहे. चंद्रसेनेच्या पलंगावर बसल्याबरोबर प्रभु रामचंद्र जसे कोसळले, तसें या खाटेवर कित्येकजण आपटी

खातात ! चल ये ना ! बस या आसनावर ! कां चाललास ? अरे थांब ! जरा थांब. तुला आईची शपथ आहे.

* * * *

**वाट चुकलेल्या तरुणा,** जरा थांब. बघ, जरा बाहेर डोकावून बघ. कशी माणसांची रीघ लागली या रस्त्यावर ! रात्रीं बारा वाजले कीं ही नेहमींची गर्दी ! नव्या सिनेमाला कमी गर्दी असेल. पण जुन्या वेश्यांना दुप्पट गर्दी. पौर्णिमेच्या रात्रीं समुद्राला येणारी भरती तूं पाहिली आहेस ? चैत्र वैशाखात फळाफुलांना येणारा बहर तूं पाहिला आहेस. असाच बहर, असाच उन्मेष रात्री बारा वाजतां या रस्त्याला येतो. वेषभूषेचें अनेक दिलचस्प प्रकार रात्रीं बारा वाजतांच इथें दृष्टीस पडतात नि इथल्या मैना साळुंक्यानाहि मध्यरात्रीला कंठ फुटतो. आंवटषोकी म्हातारे, दुःखी कष्टी विधुर, व्याधि जर्जर रोगी, बेहोष निशाचर, आणि तुज्यासारखीं कोंवळी चुकार मुलेंहि मध्यरात्रीच्या समयीं याच रस्त्यावरून चक्कर मारतात. कां रे ? उठलास ? तिरस्कार आला तुला माझा ? मी बोलल्याचा राग आला ? अरे, जरा थांब ! क्षणभर थांब ! तुला आईची शपथ आहे.

* * * *

**सुकुमार पोरा,** किती रे कोंवळा तूं ! मिसूरूड सुद्धां फुटली नाहीं तुला ! हे टवटवीत गाल, हे लालबुंद ओठ, हा तेजाळ चेहरा ! सोन्यासारख्या जीवाचं मातेरं करून घ्यायला आलास ! तुला मी परत जा म्हणत नाहीं. माझा धंदा आहे हा ! हातचं गिऱ्हाईक उपदेश करून घालवून देण्याइतकी मी मूर्ख का आहे ? आमच्या जवळ दयामाया, माणुसकी कांहीं नाहीं. पैसा मिळाल्याशीं आमचं काम ! पण तुला पाहताच मला थोडी दया आली. अगदी नवीन आहेस तूं ! तूं कुणाचा तरी भाऊ असशील, कुणाचा तरी मुलगा असशील, आणि उद्यां कुणाचा तरी नवराहि होशील ! म्हणून माझे डोळें जरा भरून आले. कधी कधी माणुसकी अशी जागृत होते. तुला सोडलं तर हातचं गिऱ्हाईक जातं आणि जवळ केलं तर तुझ्या भवितव्याची काळजी वाटते. मूर्खा, कशाला आलास इथं ! केवढा घामाघूम झाला आहेस तूं ! भीति वाटली तुला ? कां उठलास ? जाऊं नकोस. थाब. जरा थांब ! तुला आईची शपथ आहे.

# पोऱ्या, एक सिंगल चहा आण !

**पोऱ्या, एक सिंगल चहा आण.** अरे, अर्धा तास झाला, मी इथें ठणाणा करतों, तरी माझ्याकडें तुझं लक्ष नाहीं म्हणजे काय ? अरे, गिऱ्हाईकांची तुम्हाला जरा तरी दया आहे कीं नाहीं ? तहानेनें व्याकुळ होऊन मी या स्वच्छ उपहारगृहांत धांव घेतली, पण हाय ! हिंदी मागण्याकडे संपूर्ण दुर्लक्ष करणाऱ्या चर्चिलप्रमाणें तूं माझ्या याचनेकडें कानाडोळा करीत आहेस. तूं तिकडें पेंगत उभा आहेस, मी इकडे 'चहा चहा' म्हणून ओरड करीत आहें आणि या स्वच्छ विश्रांतिगृहाचा मालक गल्ल्यावर तंगड्या ताणून आराम पडला आहे ! अरे, हें अस्सल हिंदूंचं हॉटेल आहे, हें मला माहीत आहे. ज्या ज्या वेळीं मी ह्या उपहार गृहांत पाऊल ठेवतों, त्या त्या वेळीं येथील बेशिस्तपणा, गलिच्छता, गैरसोय वगैरे पाहून खऱ्या खुऱ्या हिंदूच्या हॉटेलांत आल्याच्या जाणीवेनें माझी तहान–भूक आपोआप नष्ट होते !

*  *  *  *

**पोऱ्या, एक सिंगल चहा आण.** माझ्या तृषार्त जिवाला यावेळीं चहाची फारच जरूरी आहे. मध्यरात्र उलटून गेली आहे. तुझ्या हॉटेलांतील कडू चहा पिऊन उरलेली रात्र मला दवडायची आहे. पोऱ्या, लवकर चहा आण. कसलाहि चहा आण. गरम आण, थंडा आण, फुटक्या कपांतून आण, मी तक्रार करणार नाहीं. पहा, केवढी रात्र झाली आहे ! प्रणयीजनांना प्रिय अशी ही रात्र आज थंडीमुळें त्यांना अधिकच प्रिय झाली असेल. दिवसभर आपसांत भांडलेल्या नवरा-बायकोंनीं आज रात्रीं थंडीमुळें समेट केला असेल ! आहाहा ! केवढी रमणीय आहे ही रात्र ! ह्यावेळीं कोण कुणाचं चुंबन घेत असेल ! पण युवतीच्या गोड अधरपानापेक्षां तुझ्या हॉटेलांतील चहाचं कडू विषपान मला अधिक प्रिय आहे. चल, लवकर एक

सिंगल चहा आणून दे. माझ्या डोळ्यांवर निद्रेची मोहिनी येण्यापूर्वीच तूं चहाची मोहिनी घाल. तुझा लाल भडक चहा पाहून माझी गुलाबी झोंप उडून जाईल !

*　　　*　　　*　　　*

**पोऱ्या, एक सिंगल चहा आण.** किती काकुळतीनें मी तुझी विनवणी करतों, पण तुला तें ऐकूच जात नाहीं. या हॉटेलांतील कान फुटलेल्या कपाप्रमाणें तुझेहि कान फुटले आहेत काय ? कान फुटलेला कप आणि कान फुटलेला बॉय, याशिवाय हिंदू हॉटेलाला शोभा नाहीं. पण छे ! बहिरा नाहींस तूं ! तुला झोंप आली आहे, होय ? रात्रीच्या वेळीं झाडं उभ्यानें झोंपतात, त्याप्रमाणें हॉटेलांतील पोरेंहि उभ्यानेंच झोपतात ! पोऱ्या, रागाऊ नकोस. माझ्यावर तुझे अनंत उपकार आहेत. तूंच माझं जीवन जगविलं आहेस. तुझ्याच कृपेनें माझ्या देहाचें पालनपोषण झालं आहे. पोऱ्या, तुझे उपकार मी किती किती सांगत बसू ? एकादशीला व शिवरात्रीला, तुझ्याच हॉटेलांतील मिसळ-पाव चोरून खाऊन मी उपवासाच्या दिव्यांतून पार पडलों आहें. तुझ्या उपहारगृहांतील नानाविधि बरे वाईट पदार्थ सेवन करून माझ्या शरीराला पुष्टी आणि तुष्टी मिळाली आहे. चहाच्या कपांतील कचरा हळूच बोटानें बाजूला करून आणि पातळभाजींतील झुरळ मला नकळत फेंकून देऊन तूं माझ्या आरोग्याचें रक्षण केलें आहेस. उंदरानें कुरतडलेल्या पावाला लोणी लावून त्याचा तूं 'शिलेस मस्का' केलास, आणि मला पाण्याचा ग्लास देतांना नेहमीं त्यांत दोन बोटं बुडवून, त्याला गंगोदकाचं पावित्र्य आणलंस ! पोऱ्या, तुझं मी किती किती गुणगान करूं ? तुझी लीला अगाध आहे. पण मला आतां तुझी जास्त स्तुति करायला वेळ नाहीं. तहानेनें माझा जीव कासावीस झाला आहे. चल, पोऱ्या, एक सिंगल चहा आण !

१०५०७

# ही मुलगी आंधळी आहे !

**ही मुलगी आंधळी आहे.** दोन्ही डोळ्यांनीं आंधळी आहे. अंधत्व हा तिला जन्माचा शाप आहे. या भरल्या जगांत ती मिटल्या डोळ्यांनीं वावरतं आहे. या सुंदर सृष्टीची शोभा तिला माहीत नाहीं. प्रकाश आणि अंधार तिला सारखाच आहे. दिवस आणि रात्र तिला सारखीच आहेत. पूर्णिमा आणि आमावास्या तिला एकच आहेत. पहांटेच्या प्रहरीं सूर्याची कोंवळी किरणं तिच्या सुकुमार गालावर चमकतात; पण सूर्य कसा आहे हें तिला माहीत नाहीं. रात्रीच्या समयीं चंद्रबिंबांतून ओसंडणारा शीतल सुधावर्षाव तिच्या चंद्रमुखाला उजाळा आणतो; पण चंद्र कसा आहे हें तिला माहीत नाहीं. गगनमंडळांत लुकलुकणारे असंख्य तारे तिला खुणा करतात; ती मान वर करते. पण स्वर्गाची शोभा तिला दिसत नाहीं ! उपवनांतून दरवळणारा फुलांचा सुमधुर सुगंध तिच्या नाकाला झोंबतो. पण फूल कसं असतं हें तिनं पाहिलं नाहीं ! समुद्राच्या किनाऱ्यावर ती तासन् तास वेड्यासारखी उभी राहते. पण सागराची शोभा आणि लाटांचें नृत्य ती पाहूं शकत नाहीं !

*　　*　　*　　*

**ही मुलगी आंधळी आहे.** त्यांतून अनाथ आहे. भिकारी आहे. तिच्या हातांतील काठी हा एकच तिला या जगांत आधार आहे. काठी हाच तिचा मार्गदर्शक आहे. काठी टेकीत टेकीत ती रस्त्यानें चालूं लागली म्हणजे तिच्या नाजूक पायाला ठेंच लागूं नये म्हणून दगड-धोंडे सुद्धां बाजूला होत असतील ! पण माणूस ? छे ! तो तिला हटकून धक्का देणार ! कारण तो डोळस आहे. ह्या जगांत आंधळ्यांना गाडीघोड्याची भीति वाटत नाहीं, दगड-धोंड्याची भीति वाटत नाहीं. जनावरांची भीति वाटत नाहीं. पण डोळस माणूस धक्का देईल ही भीति त्यांना

पावलोंपावली असते. आयुष्यांत लोकांकडून धक्के खाण्यासाठींच आंधळ्यांचा जन्म असतो. पण मानवतेचा तेवढा सुद्धां स्पर्श त्यांना केवढा सुखावह वाटतो! जगाला अगदींच पारखें होण्यापेक्षां माणसांकडून थोडे थोडे धक्के खाणें, याला सुद्धां भाग्य लागतं अशी आंधळ्यांची समजूत आहे. खरोखर माणसाला अंधत्व फार मोठा शाप आहे. म्हणतात ना, एक डोळा गेला कीं, अर्धें जग गेलं; दोन डोळें गेलें कीं, संपूर्ण जग गेलं! संत तुकारामानें एके ठिकाणीं म्हटलें आहे, ‘आंधळ्याशीं जन अवघेची आंधळे.’

* * * *

**ही मुलगी आंधळी आहे.** आंधळ्याच्या गायी देव राखतो म्हणतात, त्याचप्रमाणें हिचा प्रतिपाळहि परमेश्वरच करतो. ‘आंधळ्याला पैसा दे भगवान!’ म्हणून ही छोकरी रस्त्यांत भीक मागत फिरते, तेव्हां एखाद्या दयाळू माणसाच्या हृदयाला पाझर फुटतो आणि तो एक पैसा तिच्या हातावर ठेवतो! पण हाय! त्या धर्मी दात्यांचा चेहरा तिला दिसत नाहीं. एखादा फुटका पैसा मिळताच तिला मोठा आनंद होतो. हर्षभरानें तिचे आंधळें डोळे चमकूं लागतात. तिच्या चेहऱ्यावर कृतज्ञतेचा भाव उमटतो. पण आपणांस पैसा कोणी दिला हें जाणून घेण्याची तीव्र इच्छा असूनहि, त्या उपकारकर्त्यांचा चेहरा ह्या दुर्दैवी पोरीला दिसत नाहीं!

# उडतीं पांखरें !

## प्रवेश १

[ स्थळ : गिरगावांतील एका चाळींतील गलिच्छ स्वयंपाकघर. उष्टी खरकटी इतस्ततः पसरली असून डांस, मच्छर, झुरळ, माशी इत्यादि उडतीं पांखरें वर खालीं घोंघावत आहेत. त्याच पसाऱ्यांत एक लठ्ठ बाई नवऱ्याच्या रागानें गाढ झोंपली असून, तिच्या गालावर एक मच्छर बसला आहे. जवळच कांहीं अंतरावर एक झुरळ नारळाची करवंटी कुरतडीत बसला आहे. ]

**झुरळ**—( मच्छराकडे मत्सरानें पाहून ) ब्रह्मचारी म्हणवतोस आणि बाईच्या गालावर बसतोस ?

**मच्छर**—मी शृंगारिक भावनेनें बसलों नाहीं. मला भूक लागली आहे. मी आतां रक्त पिणार !

**झुरळ**—काय ? त्या नाजूक स्त्रीच्या गालाचा चावा घेणार तूं ? उलट्या काळजाच्या निर्दया—

**मच्छर**—चूप ! तुझं स्त्रीदाक्षिण्य बंद कर. मला भूक लागली आहे. तुझ्या-सारखे हळव्या हृदयाचे प्राणी नेहमीं उपाशी मरतात ! मन जरा कठोर करून अस्सा कडकडून चावा घेतला पाहिजे. ( दंश करतो. स्त्री किंकाळते. )

**स्त्री**—आई ग ऽ ऽ देवा देवा ! ते कुठें गेले ?

**मच्छर** (वर उडून)—मसणांत ! काय बायकांची जात मूर्ख पाहा ! नवऱ्यानें हिला चांगली मच्छरदाणी आणून दिली आहे, तर ही पलंगावर झोंपायची सोडून या घाणींतच पडली आहे !

**झुरळ**—( अश्रु ढाळीत ) निष्ठुरा, मच्छरा, काय केलंस तूं हें ? या सुंदर स्त्रीच्या यातना मला पहावत नाहीं.

**मच्छर**—चूप. बडबड करूं नकोस. तूं बैस तिकडे दरिद्री लेखकाप्रमाणें करवंटी कुरतडीत !

**झुरळ**—तूं चावलास तिला. आतां तिला मलेरिया झाला तर ? गावांत क्विनाईनच्या गोळ्या मिळत नाहींत हें तुला माहीत आहे ना ?

**मच्छर**—क्विनाईनची गोळी मिळत नसली म्हणून काय झालं ? तिचा नवरा तिला पेपरमिंटची गोळी आणून देईल !

**झुरळ**—बोलू नकोस तूं माझ्याशीं.

**मच्छर**—माझा हेवा वाटतों तुला. बघ माझे ओंठ कसे लालबुंद दिसत आहेत पानपट्टी खाल्ल्याप्रमाणें. किती गोड आहे हिचें रक्त ! ( पुन्हां तिच्या गालावर बसतो. ती जोरानें एक थप्पड मारते. मच्छर मरून पडतो ! )

**झुरळ**—अरेरे ! केवढा शोकजनक मृत्यु हा ! ओंठावरचें दूध—नव्हे रक्त अजून वाळलें नाहीं तोंच बिचारा मरून पडला ! ( टोळ प्रवेश करतो. )

**टोळ**—काय करवंटी खातोस ? भिकारी कुठला !

**झुरळ**—नाहींतर काय करूं ? अलीकडे धान्याची टंचाई आहे. तूप-साखर वगैरे सध्यां दुर्मिळ आहेत.

**टोळ**—पण मी केवढा भाग्यवान ! उभं पीक खाऊन आलों आहे !

**झुरळ**—( आश्चर्यानें डोळे वटारून )—काय म्हणतोस ?

**टोळ**—ऐकून घे. कित्येक एकर जमिनीचं पीक सफा चट्टा करून आलों आहें. सरकारनें उपदेश केला, जास्त धान्य पिकवा ! पण कोणासाठीं ? या टोळासाठीं ?

**झुरळ**—काय भयंकर प्राणि आहेस तूं ! शेतीची नासाडी केलीस ?

**टोळ**—तूं बैस तिकडे करवंटी खात ! तुझ्यासारखे दुबळे प्राणी उपाशी मरण्यासाठींच जन्माला येत असतात. अरेच्या ! ही कोण बरें इथें रडत येते ? ( माशी प्रवेश करते. )

**माशी**—( टाहो फोडून )—माझं कसं होणार हो आतां !

टोळ—बाई, झालं काय तुला ?

माशी—माझा नवरा बुडून मेला !

टोळ—बुडाला ! कुठें ? समुद्रांत ? विहिरींत ?

माशी—नाहीं हो ! चहाच्या कपांत ! काय दुर्बुद्धि आठवली त्यांना ! ते शेजारचे गणपतराव चहा पीत बसले होते, त्यांच्या कपांत स्वारीनें उडी घेतली !

झुरळ—अरेरे ! आज उडत्या पांखरावर ईश्वराचा कोपच झाला म्हणायचा ! आतांच माझ्या डोळ्यां देखत मच्छर मरून पांच मिनिटें झालीं नाहींत, तोंच ही दुसरी बातमी !

माशी—देवा देवा ! माझ्या नवऱ्याचं प्रेत सुद्धां मला पाहावयाला मिळालं नाहीं हो ! गणपतरावानें चहा तसाच ढकलला पोटांत !

टोळ—आतां अंत्यविधीचाहि प्रश्न मिटला ! बाई, रडूं नकोस. जा ! तूं पुनर्विवाह कर ! ( इतक्यांत झुरळ किंकाळी फोडतो. )

झुरळ—मेलो ! मेलो ! वांचवा !

टोळ—मित्रा, काय झालं तुला एकाएकी ?

झुरळ—माझाहि मृत्यू ओढवला आतां ! अहो हें पहा, झुरळ मारण्याचें औषध कुणीतरी या करवंटींत ठेवलें आहे आणि तेंच मी मघापासून खात आहे. हाय ! हाय ! ( मरून पडतो ! )

टोळ—अरेरे ! अखेर आम्हा उडत्या पांखरांची अशी ट्रेजेडी व्हावी ना ! ( पडदा पडतो. )

# राम राम भाऊसाहेब !

राम राम भाऊसाहेब !

या बसा भाऊसाहेब.

फार दिवसांनीं गरीबाची आठवण झाली ?

तांब्याच्या पैशाप्रमाणें तुम्हीहि दुर्मिळ झालात कीं हो भाऊसाहेब !

पण हें बरं नाहीं भाऊसाहेब !

तुम्ही आम्ही बालपणाचे दोस्त—

आठवड्यांतून एकदां तरी भेटगांठ झालीच पाहिजे भाऊसाहेब !

अहो, तुम्ही आम्ही परके का आहोंत ?

लहानपणापासून आपली केवढी दोस्ती.

शाळेंत आपला दोघांचा सारखाच नंबर !

आम्ही नापास व्हायचे कीं तुम्हीहि नापासच !

आतां मोठेपणीं तरी काय ?

आम्ही गाढवपणा केला कीं तुम्हीहि करायचाच.

यालाच खरी दोस्ती म्हणतात भाऊसाहेब.

*　　　*　　　*　　　*

असे जरा जवळ बसा भाऊसाहेब !

संकोच करण्याचं कारण नाहीं भाऊसाहेब.

हे घ्या दोन पेढे !

तोंड गोड करा भाऊसाहेब !

काय म्हणतां, कसले पेढे ?

तुम्हाला माहीतच नाहीं का ?

अहो, आमची ही बाळंत झाली !

तुम्हाला दोन पेढे दिले, त्याचं कारण—

तिला जुळं झालं आहे !

हंसू नका भाऊसाहेब !

अहो, दोन रुपयाची नोट निघाली नाहीं का ?

आमच्या हिनंहि एकदम दोन मुलं राष्ट्राला दिलीं !

ही चालू परिस्थिति आहे भाऊसाहेब !

राजकारणाचा संसारावरहि परिणाम होतो तो असा !

तोंड गोड करा भाऊसाहेब !

हे दोन पेढे खाऊन टाका भाऊसाहेब !

*　　*　　*　　*

असे आंत या भाऊसाहेब !

जरा आमचा पाळणा बघा.

पोरं पहा कशी गुटगुटीत झालीं आहेत भाऊसाहेब !

पण या खेपेला रंग जरा निराळा आहे.

माझी पूर्वीची सर्व मुलं गोरी गोरी पान निघाली.

पण या खेपेला कुठं तरी चुकलं भाऊसाहेब !

करड्या रंगाची पोरं झालीं आहेत भाऊसाहेब.

चालू परिस्थितीचा हा परिणाम आहे भाऊसाहेब.

अहो, पांढरा सफेत पाव आतां करड्या रंगाचा नाहीं का झाला ?

बेकरीवाले ओरडतात, आणि गिऱ्हाईकहि ओरडतात.

पण करणार काय भाऊसाहेब ?

बदलत्या परिस्थितीप्रमाणें रंगहि बदलायचे भाऊसाहेब !

*　　*　　*　　*

अरेच्या ! तुम्ही पेढे खाल्लेच नाहीं भाऊसाहेब !
तोंड गोड करा भाऊसाहेब !
आतां तुम्ही मला पेढे केव्हां देणार बोला !
आम्हाला एकंदर सहा मुलं झालीं, पण तुम्हाला एक तरी आहे का ?
अहो, बायकोच नाहीं, तर तुम्हाला पोर कसं होणार ?
जरा लाज धरा भाऊसाहेब !
अजून तरी लग्न करा भाऊसाहेब.
अहो फडक्यांनीं दोन लग्नं केलीं !
तुमच्यानं एकसुद्धां होत नाहीं !
तुम्ही गाढव आहांत भाऊसाहेब !
अहो, तुम्ही आम्ही बालपणचे दोस्त.
जोडीनें नापास झालों.
जोडीनें शाळा सोडली.
जोडीनें मवाली झालों.
पण जोडीनें लग्न करण्यास मात्र तुम्ही तयार नाहीं !

*　　*　　*　　*.

चेहरा गंभीर कां केलांत भाऊसाहेब ?
पेढा घशांत अडकला ?
थोडं पाणी प्या भाऊसाहेब !
काय म्हणतां, फडक्यांचा द्वितीय विवाह तुम्हाला पसंत नाहीं ?
आम्हालाहि पसंत नाहीं भाऊसाहेब.
आम्ही या विवाहाचा तीव्र निषेध करतों.
अहो, एवढ्या उतारवयांत अशी फटाकडी बायको मिळाली म्हणजे काय ?

कुणाला मत्सर वाटणार नाहीं ?
आम्हाला एखादी अशी मिळाली असती तर ?
आम्हींहि दुसरं लग्न केलं नसतं का ?
पण आमच्या नशीबांतच कुठं आहे !
त्या फडक्यांचा आम्हाला हेवा वाटतो भाऊसाहेब !
म्हणून आम्ही त्यांचा तीव्र निषेध करतों भाऊसाहेब !

*  *  *  *

पानसुपारी घ्या भाऊसाहेब !
काय म्हणतां नको ?
तुम्हाला चक्कर आली आहे ?
आमच्या हिनें आंतून शिवी दिली असेल !
घरांत पाहुणा आला कीं असं कांहीं तरी व्हायचंच !
ही आंतून शिवीगाळ करते, आणि बाहेर असा अपशकुन होतो.
म्हणून आमच्या घरीं कोणी पाहुणा येत नाहीं भाऊसाहेब !
पण तुम्हीं आलं पाहिजे भाऊसाहेब !
तुम्हीं का आम्हाला परके आहांत ?
तुम्ही आम्ही बालपणचे दोस्त !
ओळखदेख असूं द्या भाऊसाहेब !
आमच्या करड्या रंगाच्या पोरांवर माया ठेवा भाऊसाहेब !
मधून मधून असे येत रहा भाऊसाहेब.
राम राम भाऊसाहेब !

# ज्याची त्याची प्रार्थना

## चांदी

" धनवंतानों, मला पुरून ठेवूं नका !

*       *       *       *

## भोकाचा पैसा

" पुरुषांनो, मला जानव्यांत अडकवूं नका. स्त्रियांनो, मला कपाळावर ठेवून कुंकू लावूं यका ! "

*       *       *       *

## चपाती

" सनातन्यांनो, मला जरा कमी खा ! "

*       *       *       *

## लाकूड

" माणसांनो, मृत्युसंख्या वाढवूं नका. जरा कमी मरा ! तुमच्या अंत्यविधीला आतां केवढा खर्च आहे याची तुम्हाला कल्पना ? "

*       *       *       *

## तांदूळ

" भातानें वात निर्माण होतो. शिवाय भात खाल्ल्यानें काय काय अपाय होतात याचा प्रचार करा !

*       *       *       *

## मसाला

" स्त्रियांनो, रुचकर स्वयंपाक करूं नका. स्वयंपाक बिघडला तर तुम्हीच नाहीं का दोन घास कमी खाणार ! "

*       *       *       *

## दूध

" व्यायामशाळेंतल्या नवजवान तरुणांनो, व्यायाम घेऊं नका. तुमच्यासाठीं दूध आणि अन्न आणायचं कोठून ? "

* * * *

## वीज

" जरा लवकर दिवा काढून झोंपलांत तर नाहीं का चालणार ? विजेची तेवढीच बचत होईल. युद्धकार्याला विजेची फार आवश्यकता आहे. "

* * * *

## सत्यनारायण

" गव्हाचा रवा नाहीं म्हणून माझी पूजा बंद पाडूं नका. तुम्हीं दुसरा कसलाहि शिरा दाखविला तरी मी रागावणार नाहीं. "

* * * *

## सेफ्टी रेझर

" आरशांत पाहूं नका म्हणजे झालं ! तुमची दाढी वाढली आहे हें तुम्हाला समजणारच नाहीं !

* * * *

## कागद

" लेखकांनो, कागदाची नासाडी करूं नका. मार्जिन न सोडतां कागदाच्या दोन्ही बाजूवर लिहा. लेख संपूर्ण लिहिण्यापेक्षां अर्धवट लिहिणें उत्तम. "

* * * *

## कोळसा

महिलांनो, शेगडी जळत ठेवून गप्पा मारीत बसूं नका. शिवाय तुम्हांपकीं कित्येकांना कोळसा खाण्याची संवय आहे, ती बंद कराल काय ?

* * * *

## कापड

" लुंगी नेसण्याचे हेच दिवस ! "

# कोंबडी गल्लींतील उपवास

[ स्थळ—कोंबडी गल्लींतील गणोबा गिरमिटकर यांचें घर. गणोबाची पत्नी गजरा हिच्या उपवासाचा आज तेरावा दिवस असल्यामुळें तिची प्रकृति चिंताजनक झाली आहे. तिच्या उशीजवळ गणोबा गंभीर चेहरा करून बसले आहेत. ]

**तो**—हं, जरा हळू. बोलूं नकोस. बोलण्याचा प्रयत्न करूं नकोस. तुझा आवाज क्षीण होत चालला आहे.

**ती**—महात्माजींनीं उपवास सोडला का ?

**तो**—नाहीं. ते एकवीस दिवस झाल्याशिवाय उपवास सोडणार नाहींत. त्यांना सहानुभूति दाखविण्यासाठीं तूं उपवास सुरू केलास, पण तुझ्यानें दम धरवेल असं मला वाटत नाहीं. तुला एक चपाती देऊं का ?

**ती**—नको. मी सुद्धां एकवीस दिवस उपाशी राहणार ! माझा दृढ निश्चय आहे.

**तो**—पण गांधींच्या सेवेला सहा डाक्टर आहेत. तुला मी एकच नवरा आहे, हें लक्षांत ठेव. तुझ्या या उपवासामुळें मला हजामत करायला सुद्धां वेळ नाहीं. बघ, केवढी दाढी वाढली आहे माझी !

**ती**—माझ्या छातीवरचा हात काढा पाहूं ?

**तो**—कसा काढू ? तुझ्या हृदयाचे ठोके चालू आहेत कीं बंद आहेत हें मला कळायला नको का ?

**ती**—जळलं मेलं तुमचं ! मी इथं मरायला टेकलें तरीं—

**तो**—असं बोलूं नकोस. गांधींच्या जीवाची जगाला जितकी काळजी, त्यापेक्षां जास्त तुझी मला काळजी आहे. तुझं बरं वाईट झालं तर दुसरी बायको करण्याची मला ऐपत नाहीं.

**ती**—माझ्यासाठीं तुम्हीं प्रार्थना केली का ?

**तो**—कपाळ ! तो ईश्वर काय रिकामटेकडा आहे ? पृथ्वीतलावरील सर्व खंडांतून गांधींच्या प्राणासाठीं प्रार्थना चालू असतां, तो ईश्वर आतां काय माझी प्रार्थना ऐकायला थोडाच बसला आहे ! आणि ईश्वरानें कुणाकुणाची काळजी वहावी ? महात्मा गांधींची कीं गणोबा गिरमिटकराच्या बायकोची ?

**ती**—तुमची अक्कल मेली अशीच ! बायकोनं सांगितलेली एकहि गोष्ट तुम्ही कधीं ऐकत नाहीं.

**तो**—तूं उपवास सुरूं कशाला केला आहेस तेंच मेला कळत नाहीं. परवां लोकनायक अणे यांनीं राजीनामा दिल्याची बातमी मीं तुला सांगितली. पण तूं क्षीण हास्य करायचं सोडून, अणे कोण म्हणून मला विचारतेस ! राजकारणाचं जर तुला इतकं अगाध ज्ञान तर तूं उपास तरी कशाला करतेस ?

**ती**—देवा देवा, काय माझा छळ तरी !

**तो**—रडूं नकोस. तूं रडायला लागलीस तर मला यावेळीं धीर कोण देणार ! अरेरे ! काय तुझी ही दशा ! तेरा दिवस उपास म्हणजे काय ? चोळी सुद्धां किती सैल झाली आहे पहा तुला !

**ती**—माझ्या चोळीची पंचाईत तुम्हाला नको. चालते व्हा येथून !

**तो**—हं जरा हळू ! अशी मोठ्यानें ओरडूं नकोस. लोक काय म्हणतील ? इतका उपास करून भांडायला ताकद कशी ?

**ती**—त्यांना म्हणावं हें आत्मबळ आहे.

**तो**—मी तें जाणतों. पण लोकांना कसं पटावं ? काल शेजारची ठमाबाई म्हणत होती, तुमची बायको चोरून खात असावी !

**ती**—मेल्यांचं तळपट होवो ! तुम्हींच सांगितलं असावं त्यांना !

**तो**—छे छे ! मी कशाला सांगेन ? नवरा काय आपल्या बायकोची कधीं बदनामी करील ? आतां तूं जास्त बोलूं नकोस बघूं. तुझा आवाज मंद होत चालला आहे ! जिवाला त्रास करून घेऊं नकोस.

**ती**—मला थोडं पाणी द्या हो ! फक्त अडीच औंस द्या हं !

**तो**—मला तें औंस वगैरे कळत नाहीं. पेला भरून मी पाणी देतों. वाटेल तितकं पी.

**ती**—कशाला नवरा झालांत कुणाला ठाऊक ! शास्त्रोक्त उपास करण्याची सुद्धां सोय नाहीं !

**तो**—काय करूं ? गांधी लिंबाचा रस घेऊन उपास करतात म्हणून तूं कडू-निंबाचा रस चालूं ठेवला आहेस ! तुझं चुंबन घेऊन सांत्वन करूं म्हटलं तर तीहि सोय नाहीं. माझं तोंड कडू व्हायचं !

**ती**—शी शी ! तुम्हाला लाज कशी नाहीं हो !

**तो**—नवऱ्यानें फार लाज धरूं नये. हें बघ, मी आतां जरा बाहेर जाऊन येतों. त्या अवधींत तुला काय चोरून खायचं असेल, तर तें कार्य गुपचूप उरकून घे. मग रात्रीं बघू, तुला किती औंस पाणी द्यायचं तें !

**ती**—देवा देवा ! नवराच जर असं बोलूं लागला, तर माझं होणार तरी कसं ? ( ती त्याच्या टाळक्यांत पाण्याचा पेला फेंकते. तो पळतो. )

---

# लघु लघुतम कथा

## १० वाजतां —

१ वा.—तूं दिसलीस !

२ वा.—तूं हंसलीस !

३ वा.—तूं रुसलीस !

४ वा.—तूं फणकाऱ्यानं चाललीस.

५ वा.—तुझा पाठलाग केला !

६ वा.—तुला वेणी दिली !

७ वा.—टॅक्सी केली !

८ वा.—तुला वरळीला घेऊन गेलो.

९ वा.—गंधर्व विवाह !

१० वा.—घटस्फोट !

* * * *

## दोन गप्पीदास !

एकदां दोन वाचाळ गप्पीदास एकमेकावर ताण करीत गप्पा झोडीत होते.

एकजण म्हणाला, " अहो, काय सांगू ? काल मी झोंपलों असतां एक न्हावी माझी हजामत करून गेला ! केवढा कुशल कारागीर ! मला समजलं सुद्धां नाहीं ! सकाळीं आरशांत पाहिलं तेव्हां समजलं. "

त्यावर दुसरा म्हणाला, " अहो, हें कांहींच नाहीं. काल मी झोंपलों असतां एका चोरानें माझा सोन्याचा दांत लांबविला ! "

## त्याचें दुःख !

एकदां एका माणसाला ट्राम-अपघात झाला. त्याच्या पायावरून ट्रामगाडी गेली आणि इस्पितळांत तो पाय कापून कांढावा लागला !

पाय कापलेला पाहून तो माणूस ढळढळा रडूं लागला ! जवळच असलेल्या एका प्रेमळ नर्सनें त्याची समजूत घातली. ती म्हणाली, ' असा शोक करून आतां उपयोग काय ? '

तो माणूस म्हणाला, " पाय गेला म्हणून मी दुःख करीत नाहीं. पण आतां बायकोला लाथ कशी मारूं ? "

## रस्त्यांत धक्का

एकदां एक कुरूप स्त्री रस्त्यानें चालली असतां तिला एका आंधळ्याचा धक्का लागला. आंधळा घाबरला आणि त्यानें तिची माफी मागितली !

त्यावर ती बाई म्हणाली, " माझी कशाला माफी मागतां ? मीच उलट तुमची आभारी आहे. आयुष्यांत तुम्हींच मला पहिल्यानें धक्का दिला ! हे मेले डोळस लोक, बघतात तरी का माझ्याकडे ? "

## सुंदर

रस्त्यानें चालणाऱ्या एका आंधळ्या भिकाऱ्याला पाहून एक सुंदर स्त्रीला दया आली. तिनें त्याला एक पैसा दिला !

" कुणी पैसा दिला मला ? " त्या आंधळ्यानें पृच्छा केली.

" तुला कसं कळणार तें ? एका सुंदर स्त्रीनें तुला पैसा दिला आहे!" ती स्त्री म्हणाली.

" अरेरे! मला डोळे असते तर ?" आंधळा करुण वाणीनें म्हणाला.

" माझं रूप पाहण्यासाठीं ?"

" छे छे! पैसा खरा कीं खोटा तें पाहण्यासाठीं!"

## दोन भिकारी !

मुंबईच्या फूटपाथवर दोन भिकारी बेहोष होऊन नाचत सुटले! त्यांना जवळ जवळ वेडच लागलें होतें! त्यांना झालं होतं तरी काय ? त्यांना कल्पनातीत आनंद झाला होता. कारण--

पहिल्या भिकाऱ्याजवळ तांब्याचा पैसा होता!

दुसऱ्या भिकाऱ्याजवळ गव्हाची चपाती होती!

## त्याचा नंबर !

सरकारी धान्याच्या दुकानावर लांबच लांब रांग लागली होती. तांदूळ घेण्यासाठीं प्रत्येकजण हातांत एकेक पिशवी घेऊन तासन् तास तिष्ठत होता!

गुंडोपंतहि सकाळीं सहा वाजल्यापासून रांगेंत उभे होते. अखेर सांडेनऊ वाजता एकदाचा त्याचा नंबर लागला!

मोठ्या आशेनें गुंडोपंतानें पिशवी पुढें केली!

आणि हाय! दुकानदारानें शांतपणें उत्तर दिलें,

" धान्य संपलं!"

## अरे बाबा जाहिरात !

पहिल्या बायकोपासून मूल होत नाहीं म्हणून चिकटोपंतानें दुसरें लग्न केलें!

दुसऱ्या बायकोपासूनहि मूल होत नाहीं म्हणून त्यांनीं तिसरें लग्न केलें!

पण तिसऱ्या बायकोपासूनहि त्यांना मूल होईना !

आतां शेवटचं एकच लग्न करावं म्हणून चिकटोपंतांनीं पुढील जाहिरात दिली—

" वधू पाहिजे. लेंकुरवाळी. "

* * * *

## वृत्तपत्रांचा हरताळ

सरकारी धोरणाचा निषेध करण्यासाठीं म्हणून वृत्तपत्रांनीं एक दिवस प्रकाशन बंद ठेवावें असें संपादक मंडळीच्या सभेनें ठरविलें.

याबद्दल सर्व संपादकांचे आभार मानतांना सभेचे अध्यक्ष म्हणाले, " तुम्हा सर्वांचं मी अभिनंदन करतों. तुम्ही सारेजण जो त्याग करीत आहा, याबद्दल तुमचे आभार मानावे तेवढे थोडेच. वर्तमानपत्रानं एक दिवस आपलं प्रकाशन बंद ठेवायचं म्हणजे केवढं आर्थिक नुकसान—"

इतक्यांत एक मालक मध्येंच उठून म्हणाले, " तें चूक आहे. एक दिवस प्रकाशन बंद ठेवल्यानं माझा तर फायदाच होईल. कारण मी नुकसानींत वर्तमानपत्र चालवितों ! "

* * * *

## आंधळ्या स्त्रीची तपश्चर्या !

एकदां एक आंधळी बाई हिमालयाच्या पायथ्याशीं जाऊन घोर तपश्चर्या करूं लागली !

तिची तपश्चर्या पाहून ईश्वर तिला प्रसन्न झाला !

ईश्वर म्हणाला, " हे अंध स्त्रिये, वर माग. "

" देवा, मला दृष्टि दे ! " ती स्त्री म्हणाली.

ईश्वर म्हणाला, " खरं आहे. ही एवढी सुंदर सृष्टि तूं बघूं शकत नाहींस हें केवढं दुर्दैव !—"

ती स्त्री एकदम उसळून म्हणाली, " आग लावा तुमच्या त्या सुंदर सृष्टीला ! मला दृष्टि पाहिजे ती मला आरशांत माझं रूप पहायला मिळावं म्हणून ! "

# साल अखेर !

जानेवारींत तो बेकार होता.

फेब्रुवारींत तो उपाशी भटकत होता.
मार्चमध्यें तो चणे-कुरमुरे खात होता.
आणि आज साल अखेर......
**—त्याला १२ हजार रुपये पगार मिळत आहे !**

* * * *

जानेवारींत तो सिनेमाच्या तिकीटासाठीं रांगेत उभा राही.
फेब्रुवारींतहि तिकीटासाठींच उभा राही.
मार्चमध्येंहि तिकीटासाठींच उभा राही.
आणि आज साल अखेर......
**—तो तांदळासाठीं रांगेत उभा आहे !**

* * * *

जानेवारींत तो कॅव्हेंडर सिगारेट ओढीत होता.
फेब्रुवारींत पिवळी हत्ती ओढूं लागला.
मार्चमध्यें विडीवर आला.
आणि आज साल अखेर......
काड्याच्या पेट्या मिळत नसल्यामुळें......
**—तो कांहींच ओढीत नाहीं !**

* * * *

जानेवारींत त्यानें सिनेमा कंपनी काढली.
फेब्रुवारींत त्यानें वॉशिंग कंपनी काढली.
मार्चमध्यें तो बेकार कंपनींत सामील झाला.
आणि आज साल अखेर......

**—त्यानें नाटक कंपनी काढली आहे!**

*　　*　　*　　*

जानेवारींत त्याच्या खिशांत पैसे खुळखुळत होते.
फेब्रुवारींतहि पैसे खुळखुळत होते.
मार्चमध्येंहि पैसे खुळखुळत होते.
आणि आज साल अखेर...
सुटे पैसे नसल्यामुळें

**—त्याच्या खिशांत फक्त नोटाच आहेत.**

*　　*　　*　　*

जानेवारींत त्यानें नटी आणली.
फेब्रुवारींत भांडवल आणलं.
मार्चमध्यें चित्रपट काढला.
आणि आज साल अखेर...

**—तो बोलपट पडला आहे!**

*　　*　　*　　*

जानेवारींत ती नऊ वारी पातळ नेसत असे.
फेब्रुवारींत पांच वारी नेसूं लागली.
मार्चमध्यें परकर नेसूं लागली.
आणि आज साल अखेर...
कापड महाग झाल्यामुळें...

**—ती फक्त चड्डीच नेसत आहे!**

*　　*　　*　　*

जानेवारींत त्यानें वर्तमानपत्र काढलें.
फेब्रुवारींत त्यांच्या वृत्तपत्राचा रंग पिवळा झाला.
मार्चमध्यें तो हिरवा झाला.
आणि आज साल अखेर...
कागदाच्या दुर्मिळतेमुळें...
**—तो ताडपत्री वापरीत आहे!**

* * * * *

जानेवारींत तो व्हाईसरॉयांना भेटला.
फेब्रुवारींत सावरकरांना भेटला.
मार्चमध्यें जिनांना भेटला.
आणि आज साल अखेर......
मति कुंठित झाल्यामुळें......
**—त्यानें राजकारण-संन्यास घेतला आहे!**

* * * *

जानेवारींत त्याने चर्चिलना तार धाडली.
फेब्रुवारींत रुझवेल्टना तार धाडली.
मार्चमध्यें चँग कै शेक यांना तार धाडली.
आणि आज साल-अखेर......
**—तो फक्त आपल्या बायकोलाच तार पाठवीत आहे!**

* * * *

जानेवारींत तो गोमूत्र पीत होता.
फेब्रुवारीत ताडी पिऊं लागला.
मार्चमध्यें बेवडा पिऊं लागला.
आणि आज साल अखेर......
फॅक्टरींत नोकरी मिळाल्यामुळें...
**—तो व्हिस्की पीत आहे!**

* * * *

जानेवारींत तो गिरगांव व्यायाम शाळेंत होता.
फेब्रुवारींत तो बजरंग व्यायाम शाळेंत जाऊं लागला.

मार्चमध्यें तो पेहेलवान झाला.
आणि आज साल अखेर......
लग्न केल्यामुळें...
**—तो काडी पेहेलवान झाला आहे !**

*    *    *    *

जानेवारींत त्यानें गोटा केला.
फेब्रुवारींत पुन्हां केंस वाढविले.
मार्चमध्यें शेंडी वाढविली.
आणि आज साल अखेर...
सेफ्टी ब्लेड्स महाग झाल्यामुळें,...
**—त्यानें दाढीहि वाढविली आहे !**

*    *    *    *

जानेवारींत त्यानें एक लेख लिहिला.
फेब्रुवारींत एक कविता लिहिली.
मार्चमध्यें एक लघुनिबंध लिहिला.
आणि आज साल अखेर...
तें सर्व संपादकांकडून...
**—साभार परत आले आहेत !**

*    *    *    *

जानेवारींत ती त्याला भेटली.
फेब्रुवारींत दोघांचें प्रेम जडलें.
मार्चमध्यें त्यांनीं लग्न केलें.
आणि आज साल अखेर...
**—दोघांनीं घटस्फोट घेतला आहे !**

# शिवरात्रीच्या दिवशीं

आज महाशिवरात्रीचा पवित्र दिवस असल्यामुळें, काल रात्रीपासूनच मला उपासाचा शीण येऊं लागला होता. सकाळीं उठून मी आरशांत पहातों तो, रात्रभर शूटिंग करून आलेल्या नटीप्रमाणें माझे डोळे खोल गेलेले आहेत आणि चेहरा फिकट पडला आहे, हें दृश्य मला दिसून आलें. प्रत्यक्ष लग्नापेक्षां लग्नाची कल्पनाच जशी गोड असते, त्याप्रमाणें उपवास करण्यापेक्षां उपवासाची कल्पनाच अधिक तापदायक असते. नाहींतर सकाळीं आठ वाजतांच मला सडकून भूक लागण्याचें कारण काय ? पण माझा मनोनिग्रह दांडगा असल्यामुळें माझा व्रतभंग होणें शक्यच नव्हतें ! मी कपडे करून खालीं उतरलों. उपास करण्याच्या पवित्र संकल्पामुळें माझ्या चेहऱ्यावर एक प्रकारचें दैवी तेज विलसूं लागलें. नाक्यावरच्या इराणी हॉटेलकडे मीं एक तुच्छतादर्शक कटाक्ष फेंकला आणि धीर गंभीर चेहरा करून पुढें चालूं लागलों !

*　　*　　*　　*

रस्त्याच्या दुतर्फा अनेक प्रकारचे खाद्यपदार्थ मला मोह घालीत होते. चिक्की, रेवड्या, गंडेऱ्या, द्राक्षें इत्यादि माल विकणारे फेरीवाले ओरडून ओरडून मला हांक मारीत होते, पण मी तिकडें संपूर्ण दुर्लक्ष केलं. हिंदु उपहार गृहाच्या बाहेर फराळाचे खास जिन्नस खडूनें मोठ्या अक्षरांत तळपत होते, पण माझ्या कठोर निश्चयापासून मी परावृत्त झालों नाहीं. उलट उपास करण्याचा माझा निश्चय अधिकच दृढतर झाला. माझा उपाशी चेहरा पाहून एक कलिंगडवाली अर्धा मैल माझ्या मागें लागली, तरीहि माझें चित्त विचलित झालें नाहीं. मला वाटलें, माझें सत्त्व पाहण्यासाठीं परमेश्वरच कलिंगडवालीचें रूप धारण करून आला असावा ! पण ईश्वराला काय माहीत, संपादक हा त्याच्यापेक्षां जास्त शहाणा !

*　　*　　*　　*

माझे पाय चौपाटीच्या दिशेनें वळूं लागले. बाराहि महिने नळावर स्नान करून अपवित्र झालेलें शरीर शुचिर्भूत करावें म्हणून मी समुद्रस्नान करण्याचें ठरविलें. चौपाटीवर सहस्रावधि स्त्री-पुरुषांची प्रचंड यात्रा भरली होती. मीहि ' माझ्या भोळ्या महादेवा, आवड तुला बेलाची बेलाची ' हें भजन गुणगुणत त्या गर्दीतून वाट काढीत समुद्रापर्यंत येऊन पोंचलो मला पोहतां येत नसल्यामुळें बुडण्याची भीति नव्हतीच. हिंदुमहासभेप्रमाणें फार खोलांत न शिरतां किनाऱ्यावरूनच लुडबुड करावी म्हणून मी कांठावरच्या पाण्यांतच बुचकुळी मारली. म्हटलं तर स्नान, म्हटला तर चिखल अशा प्रकारचा तो थाट होता. पण मी हिंदुत्वनिष्ठ पडल्यामुळें, फार खोलांत शिरून धोका पत्करण्यापेक्षां, किनाऱ्यावरचा मिळेल तो पाचोळाच हातीं घेऊन चामडी सलामत ठेवणें मला अधिक शहाणपणाचें वाटलें! असो. स्नान झाल्यावर बाबुलनाथच्या टेकडीकडें तोंड करून भक्तिभावानें मीं दोन्ही हात जोडले. पण काय चमत्कार पहा! माझ्यासमोर असलेल्या एका लठ्ठ बाईनें मला उलट नमस्कार केला! तिला वाटलं, मी तिलाच नमस्कार केला असावा! जगांत गैरसमजूत कशी होते ती पहा!

* * * *

समुद्रस्नानाचा पवित्र कार्यक्रम उरकून मी बाहेर येतों तोंच माझे मित्र गट्टूलाल हे मला अचानक भेटले आणि श्रीशंकराचा प्रसाद म्हणून एक पेला भांग घ्याच असा मला ते आग्रह करूं लागले! मला मोठा पेंच पडला! गेल्या वर्षी शिवरात्रीला एक पेला भांग घेऊन त्या तिरमिरींत मी एक अत्यंत सोज्वळ असा लेख लिहून काढला होता! नेहमीं अश्लील लेखन करणारा मी भांगेच्या तारेंत इतका सोंवळा लेख लिहूं कसा शकलों याचेंच मला फार दिवसपर्यंत आश्चर्य वाटत होतें! खरंच माणूस शुद्धीवर नसला तरच तो जगांत रीतसर वागतो.

१०९०८९

# चित्रपट सृष्टींतल्या म्हणी !

( १ ) दाम करी काम, नटी करी सलाम.

( २ ) आधी जाते नटी, मग जातें भांडवल.

( ३ ) पाप्याला पंढरपूर, नटीला स्टुडीओ दूर.

( ४ ) नकटीच्या शूटींगला सतराशें विघ्नें.

( ५ ) घर ना दार, स्टुडीओंत बिऱ्हाड.

( ६ ) मालकाला सांगितली कहाणी, उपड्या घड्यावर पाणी.

( ७ ) ओळखीचा संपादक जीवानिशीं मारी.

( ८ ) स्टोरी मूठभर, शूटींग हातभर.

( ९ ) मालक जेऊं घालीना, डायरेक्टर भीक मागूं देईना.

(१०) सदा पडे, त्याला कोण रडे.

(११) गातां येईना, रेकॉर्डिंग वाईट.

( १२ ) नटी राखील, तो भांडवल चाखील.

( १३ ) मागून आली, हिरॉईन झाली.

( १४ ) डायरेक्टर तारी, तिला कोण मारी.

( १५ ) सासरीं शिवरात्र, स्टुडिओंत नवरात्र.

( १६ ) नटी रुसली, मोटारींत बसली.

( १७ ) आपलीच स्टोरी, आपलेंच कथानक.

# ठासून झाली पाहिजे!

ह्या चवलीचं काय म्हणणं आहे? चवलीचं असं म्हणणं आहे कीं, ठासून झाली पाहिजे. दिवाळीची गंमत ठासून झाली पाहिजे. दिवाळीचा नखरा ठासून झाला पाहिजे. स्त्रियांचा नट्टापट्टा ठासून झाला पाहिजे. तोंडाला पावडर ठासून लावली पाहिजे. नवऱ्याच्या पाठीला उटणं ठासून रगडलं पाहिजे. मंगल-स्नान ठासून झालं पाहिजे. लक्ष्मीपूजन ठासून झालं पाहिजे. फटाकडे ठासून उडवले पाहिजेत. रांगोळ्या ठासून घातल्या पाहिजेत. मिष्टान्न भोजन ठासून झालं पाहिजे. आणि एक गोष्ट लक्षांत ठेवा, स्वातंत्र्याची मागणीहि ठासून झाली पाहिजे.

* * * *

ह्या चवलीचं चर्चिलच्या कानांत असं सांगणं आहे कीं, दुसऱ्या आघाडीची भाषा ठासून झाली पाहिजे. ह्या चवलीचं स्टॅलिनच्या कानांत असं सांगणं आहे कीं, स्टॅलिनग्राडचा लढा ठासून लढविला पाहिजे. ह्या चवलीचं व्ही. शांताराम यांच्या कानांत असं सांगणं आहे कीं, नव्या बोलपटाची तयारी ठासून झाली पाहिजे. ह्या चवलीचं पेन्शनरांच्या कानांत असं सांगणं आहे कीं, मिशीला कलप ठासून लावला पाहिजे. ह्या चवलीचं बापू कोल्हटकरांच्या कानांत असं सांगणं आहे कीं, नैष्ठिक ब्रह्मचर्य ठासून पाळलं पाहिजे. ह्या चवलीचं बाबूराव पै यांच्या कानांत असं सांगणं आहे कीं, दिवाळीचा गल्ला ठासून झाला पाहिजे. ह्या चवलीचं कुरूप स्त्रियांच्या कानांत असं सांगणं आहे कीं, मुरका मारायाचा झाला तर तो ठासून मारला पाहिजे.

* * * *

प्रत्येक गोष्ट ठासून झाली पाहिजे हेंच ह्या चवलीचं म्हणणं आहे. कोणतीहि गोष्ट अर्धवट करूं नका. जें कांहीं करायचें तें संपूर्ण ठासून, दणाणून, गर्जून

करा. अर्धवट साहित्यसेवा, अर्धवट देशसेवा, अर्धवट प्रेम, अर्धवट लग्न, अर्धवट हनीमून, अर्धवट संतति, अर्धवट लढा, इत्यादि सर्व अर्धवट गोष्टींना मूठ-माती द्या आणि प्रत्येक कार्य संपूर्ण जोमानें, धडाडीनें, उत्साहानें, आवेशानें, पार पाडा. त्या चवलीचा हाच स्फूर्तिदायक संदेश आहे. तरुण-तरुणींना, गरम रक्ताच्या जवान मर्दांना, हिंमतबहाद्दरांना ही चवली दिवाळीच्या या मंगलकालीं हाच दिव्य मंत्र देत आहे. जीवन ठासून जगलं पाहिजे आणि मरतांनासुद्धां ठासून मेलं पाहिजे. क्रियाशून्य जीवनापेक्षां तेजस्वी मृत्यु हा शतपटीनं बरा. ह्या चवलीचं हेंच म्हणणं आहे.

* * * *

ऐका! ह्या चवलीचं आणखी काय म्हणणं आहे? दिवाळीचे दिवस आहेत. नवरा-बायकोनें आपसांत भांडूं नये. बायकोनें दिलेली करंजी नवऱ्यानें प्रेमानें खावी आणि नवऱ्यानें दिलेला गुलाबजांबू बायकोनें लाजत सेवन करावा. शहाण्या नवऱ्यानें बायकोनें घातलेली रांगोळी पाहून वरकरणी स्तुति करावी आणि मनांतल्या मनांत शिव्या द्याव्या. दिवाळीच्या दिवसांत चतुर स्त्रीनें नवऱ्याला पुरणपोळी आणि सासूला क्विनाईनची गोळी द्यावी. लङ्ठ स्त्रियांनीं ब्लॅक आऊटमध्यें आपले चेहरे दिसावेत म्हणून फुलबाज्या पेटवाव्यात. भाऊबीजेला बंधुराजानें आपल्या वहिणीला घासलेट आणि साखर यांचीच ओंवाळणी घालावी. दिवाळीच्या दिवसांत सर्वत्र आनंदी आनंद असावा. ज्या ब्रह्मचाऱ्यांनीं सबंध वर्ष हळहळत काढलें, त्यांनीं दिवाळीला तरी आपली सोय करून घ्यावी. प्रियकरानें आपल्या प्रेयसीला फुलांच्या वेणीसाठीं एक चवली द्यावी आणि मग त्या प्रेयसीनेहि लाजत मुरडत म्हणावं,—

**चवली दिली फुलाला**
**मुका घेतला गालाला**

# शोकगीत झालं पाहिजे !

ह्या चवलीचं काय म्हणणं आहे ? विशेष कांहीं म्हणणं नाहीं. एक शोकगीत झालं पाहिजे. एक करुणगीत झालं पाहिजे. एक रडगाणं झालं पाहिजे. भग्नहृदयाचे आर्त सूर, करुण रसाचा महापूर, आणि संगीत कलेचा चक्काचूर इत्यादि गुणांनीं युक्त अशी एक स्वर्गीय कव्वाली म्हटली पाहिजे. आणि हें शोकगीत कशासाठीं ? ही रडारड कशासाठीं ? हें अश्रुगान कशासाठीं ? आपत्तींनीं आणि संकटांनीं गांजलेल्या मुंबईंतील संत्रस्त जनासाठीं ! बाजारांत चिल्लर नाणीं मिळत नाहींत म्हणून शोकगीत झालं पाहिजे. दूध महाग होणार म्हणून शोकगीत झालं पाहिजे. हिंदुस्थानांतील तांदूळ सिलोनला जाणार म्हणून शोकगीत झालं पाहिजे. दिवाळीच्या आनंदांत कांहीं रद्दी चित्रपट सुरू झाले म्हणून शोकगीत झालं पाहिजे. ह्या चवलीचं एवढंच म्हणणं आहे कीं, रडून रडून, ऊर बडवून, किंचाळून, ओरडून, एक शोकगीत म्हटलं पाहिजे.

* * * *

कम्युनिस्टांचा बुद्धिभ्रंश झाला म्हणून शोकगीत झालं पाहिजे. लोकनायक अणे यांनीं स्वजनांचा घात केला म्हणून शोकगीत झालें पाहिजे. राजगोपालाचार्य जिनांच्या दारांत अपमानास्पद धक्के खातात म्हणून शोकगीत झालं पाहिजे. हिंदुस्थानच्या या आणीबाणीच्या वेळीं भारतमातेचे कित्येक सुपुत्र देशद्रोही बनले म्हणून शोकगीत झालं पाहिजे. जे जे कांहीं अनिष्ट आणि अमंगळ आहे, जे जे कांहीं अभद्र आणि पापमय आहे, जे जे कांहीं करुणपूर्ण आणि क्लेशदायक आहे, त्या त्या सर्वांसाठीं एक शोकगीत झालं पाहिजे. परतंत्र हिंदुस्थान ज्या अग्निदिव्यां-तून सध्यां जात आहे, उपासमारीनें व महागाईनें नाडलेली प्रजा ज्या हालअपेष्टांतून आपलें दुःखमय जीवन व्यतीत करीत आहे, त्या सर्वांसाठीं एक शोकगीत झालं

पाहिजे. ब्रह्मदेशांतल्या निर्वासितासाठीं, आंबेडकरांच्या कामगारांसाठीं, आणि नटींच्या नवऱ्यांसाठीं एक शोकगीत झालं पाहिजे. ह्या चवलीचं एवढंच म्हणणं आहे कीं, आरडून ओरडून, गगनाचे पडदे फाडून, दिग्मंडळाला वणवा लावून एक शोकगीत झालं पाहिजे.

* * * *

ह्या चवलीचं आणखी काय म्हणणं आहे ? शोकगीत कसं झालं पाहिजे ? केसरी कचेरींतल्या संपादकाप्रमाणें रडवा चेहरा करून शोकगीत झालं पाहिजे. गं. दे. खानोलकरांप्रमाणें उदासवाणा चेहरा करून शोकगीत झालं पाहिजे. बापू कोल्हटकरांप्रमाणें सुस्कारे टाकून शोकगीत झालं पाहिजे. अंधकवि के. सी. डे. प्रमाणें जबडा पसरून, मास्तर कृष्णरावांप्रमाणें हातवारे करून आणि गोविंदराव जोश्यांप्रमाणें नाकांतून सूर काढून शोकगीत झालं पाहिजे. नटवर्य लोंढ्याप्रमाणें जबरदस्त तान घेऊन, बिब्बोप्रमाणें किंकाळी फोडून, दामूअण्णा मालवणकरांप्रमाणें उडी मारून, देवधरांचं पार्श्वसंगीत लावून, कुसुम देशपांड्याप्रमाणें मुरका मारून, आणि लीला चंद्रगिरीप्रमाणें ढळढळा रडून शोकगीत झालं पाहिजे.

* * * *

ह्या चवलीचं आणखी कांहीं म्हणणं नाहीं. फक्त एक शोकगीत झालं पाहिजे. करुणरसानें रसरसलेली एक दीलफोडक कवाली झाली पाहिजे. दगडाला पाझर फोडणारी, मूर्खांना मार्गदर्शन करणारी, देशबुडव्यांना वठणीवर आणणारी आणि सैतानांना माणुसकी प्राप्त करून देणारी एक कवाली झाली पाहिजे. बाजारांत केवळ चिल्लर मिळत नाहीं म्हणूनच नव्हे, घासलेट आणि साखर मिळत नाहीं म्हणूनच नव्हें, तर ब्लॅक आऊटमध्यें आजकाल रस्तोरस्तीं कुरूप स्त्रियांचे विनयभंग होतात म्हणूनसुद्धां एक शोकगीत झालं पाहिजे.

# नाताळचा डान्स !

या चवलीचं काय म्हणणं आहे ? विशेष कांहीं नाहीं. फक्त नाताळचा एक डान्स झाला पाहिजे. लांडी साडी परिधान करून व साहेबाला डोळा घालून विलायती डान्स झाला पाहिजे. नाताळच्या बेहोष महोत्सवाला साजेल असा ताळ सोडून, मेळ सोडून स्वैर डान्स झाला पाहिजे. सरकारी धान्याच्या दुकानांवर जसा आरडा ओरडीचा डान्स होतो तसा तडाखेबंद डान्स झाला पाहिजे. ' तांदूळ तांदूळ ' म्हणून ठणाणा करीत, ' ज्वारी ज्वारी ' म्हणून शंख करीत आणि ' गहूं गहूं ' म्हणून आक्रोश करीत, ऊर बडवून, खांदे उडवून, आणि घसा फोडून डान्स झाला पाहिजे. नोकरशाहीच्या नालायकीमुळें धान्याचा जो दुष्काळ पडला आहे, गोरगरीबांची जी उपासमार चालली आहे, मूठभर दाणा मिळविण्यासाठीं बायाबापड्यांची रस्त्यांत जी विटंबना चालली आहे, या आनंदाप्रीत्यर्थ नाताळचा डान्स झाला पाहिजे. डान्स विलायती असला तरी तो किंचित् गांवठी व बाटगा झाला पाहिजे. विलायती व्हिस्कींत देशी ताडी मिळविल्यानें जो बाटगेपणा येतो, तशा प्रकारचा बाटगा डान्स झाला पाहिजे.

*　　*　　*　　*

ह्या चवलीचं आणखी काय म्हणणं आहे ? नाताळचा नाच कसा झाला पाहिजे ? हावभाव करून झाला पाहिजे. नखरा करून झाला पाहिजे. नूतन वर्षाच्या शुभचिंतनपर चर्चिलसाहेबांना एक ' फ्लाईंग किस् ' देणारा हावभाव करून नाच झाला पाहिजे. डेहराडूनच्या थंड हवेंत तेरा हजार रुपयांचा कर्णमधुर हिशेब करण्यांत गर्क असलेल्या कॉमरेड रॉय यांना ' चिअर यू ' करणारा हावभाव करून नाच झाला पाहिजे. स्वर्गांतील सांटाक्लॉजनें खास नाताळानिमित्त आणून दिलेला केकचा तुकडा विळ्याकोयत्यानें कापीत बसलेल्या भाई निमकरांच्या क्रांतिकारक गालावर हातोड्या-

ची एक गोड टिचकी मारणारा हावभाव करून नाच झाला पाहिजे. मुंबईच्या रस्त्यांत मधून मधून दोन भाई आणि एक बाई यांची ‘ कॉंग्रेस लीग एकजुटी ’ची मिरवणूक निघते, त्यांच्याप्रमाणेंच लढावू हावभाव करून नाच झाला पाहिजे. ह्या चवलीचं आणखी कांहीं म्हणणं नाहीं. फक्त एक डान्स झाला पाहिजे. नाताळचा डान्स झाला पाहिजे. लांडी साडी परिधान करून आणि साहेबाला डोळा घालून डान्स झाला पाहिजे.

* * * *

ही चवली हिंदुस्थानांतील तमाम गुलामांना दौलतजादा करीत आहे. गुलामांनाच नव्हे, तर कलकत्त्यांतील शूर नागरिकांनाहि ही चवली दौलतजादा करीत आहे. रात्रीं अकरा वाजतां बॉंब हल्ला झाल्यानंतर लगेच बारा वाजतां शांत चित्तानें गाढ झोंपी जाणाऱ्या कलकत्त्यांतील मर्द पुरुषांना, आर्य ललनांना आणि पाळण्यांतील बाळांना ही चवली प्रणिपात करीत आहे. आणि संकटकाळीं आम्हा सर्वांस धीर देणाऱ्या व्हाइसरॉयांना ही चवली साष्टांग नमस्कार घालीत आहे. गेल्या कांहीं वर्षांच्या नाताळापेक्षां यंदाचा नाताळ विशेष आशादायक व उत्साहवर्धक आहे असें ‘ टाईम्स ऑफ इंडिया ’ चें मत ऐकून या चवलीला विशेषच स्फुरण चढलें आहे आणि म्हणूनच ही चवली आनंदानें बेहोष होऊन नाताळचा डान्स करीत आहे.

# शेंगदाण्याची उसळ !

ह्या चवलीचं काय म्हणणं आहे ? शेंगदाण्याची उसळ झाली पाहिजे. टेस्टदार उसळ झाली पाहिजे. चकाचक उसळ झाली पाहिजे. नेपाळचा हिंग गायकवाड वाड्यांतील बटाटे आणि भागलपुरची फोडणी देऊन शेंगदाण्याची उसळ झाली पाहिजे. आणि ही उसळ कशासाठीं ? हिंदुमहासभेचे एक प्रमुख पुढारी डॉक्टर श्यामप्रसाद मुकर्जी यांनीं आपल्या मंत्रीपदाचा राजीनामा दिला म्हणून ! बंगालच्या या अर्थमंत्र्यानें महा भयंकर अनर्थ केला म्हणून ! या दुर्दैवी घटनेसाठीं शेंगदाण्याची उसळ झाली पाहिजे. साऱ्या हिंदुसभेंत हा एकच एक नालायक वीर निघाला, या दुःखप्रदर्शनासाठीं शेंगदाण्याची उसळ झाली पाहिजे. डॉक्टर मुकर्जी यांनीं हिंदुमहासभेची फटफजीति केली म्हणून शेंगदाण्याची उसळ झाली पाहिजे. आपला कान फक्त शिवाजीनेंच धरावा, अशी प्रौढी मिरवणाऱ्या राव सावरकरांचा कान अखेर मुकर्जीनींच धरला या खेदजनक घटनेबद्दल शेंगदाण्याची उसळ झाली पाहिजे.

* * * *

ह्या चवलीचं आणखी काहीं म्हणणं नाहीं. फक्त शेंगदाण्याची उसळ झाली पाहिजे. नोकऱ्या म्हणजेच सर्वस्व समजणाऱ्या आणि नोकऱ्यांसाठीं रात्रंदिवस धडपडणाऱ्या हिंदुसभेची या बंगालीबाबूनें परस्पर शोभा केली म्हणून शेंगदाण्याची उसळ झाली पाहिजे. वाटेल त्या अपमानास्पद परिस्थितींतसुद्धां नोकऱ्या सोडूं नयेत या सावरकरांच्या गुलामगिरीच्या तत्त्वज्ञानाला एका हिंदु वीरानेंच मूठमाती दिली या विपरीत घटनेबद्दल शेंगदाण्याची उसळ झाली पाहिजे. चामडी सलामत ठेवून, आरमखुर्चीवर राजकारण करणाऱ्या नोकरीवाल्या पक्षाला, त्याच पक्षाच्या एका प्रमुख शिरोमणीनें दगा दिला, म्हणून शेंगदाण्याची उसळ झाली पाहिजे. उसळ टेस्टदार झाली पाहिजे. चकाचक झाली पाहिजे. नेपाळचा हिंग, गायकवाड वाड्याचे बटाटे आणि भागलपूरची फोडणी देऊन शेंगदाण्याची उसळ झाली पाहिजे.

* * * *

हिंदुमहासभावाल्यांनीं नोकरी सोडावी हा एक महान् चमत्कार होय! पृथ्वीतलावरील हा एक अजब चमत्कार होय. सुरवंटाचं फुलपांखरू झालं, कावळ्याचा राजहंस झाला, एरंडाचा इक्षुदंड झाला! ' नवाकाळ 'चा पिवळा रंग पांढरा झाला, वसंतराव मराठे गोरे झाले, बालगंधर्व तरुण झाले! वेवड्याची व्हिस्की झाली, नकट्या नाकाची चाफेकळी झाली, तिरळ्या डोळ्याची हरिणाक्षी झाली! ' केसरी 'चे अग्रलेख वाचनीय झाले, गोपीनाथ तळवलकर उंच झाले, आचार्य अत्रे ठेंगणे झाले! बापू कोल्हटकर चतुर्भुज झाले, पी. आर. लेले पहेलवान झाले आणि र. धों. कर्वे संस्कृति संरक्षक मंडळाचे अध्यक्ष झाले! भसाड्या आवाजाची नटी कोकीळकंठी झाली, डोअर-कीपरचा डायरेक्टर झाला, आणि पट्टेवाल्याचा हेडक्लार्क झाला! सडपातळ स्त्री लठ्ठ झाली, अशक्त नवरा सशक्त झाला आणि गुलाम लोक स्वतंत्र झाले! हिंदुसभावाल्यांचा नोकरीत्याग हा जगांतील अनेक चमत्कारांपैकींच एक होय! हिंदु वीर कधींहि नोकरी सोडणार नाहींत. पण श्यामप्रसाद मुकर्जी यांनीं फजलूल हक यांच्या मंत्रिमंडळांत शिरून बारा महिने झाले नाहींत तोंच त्यांनीं हिंदुसभेचे बारा वाजविले ही खरोखर नामुष्कीची गोष्ट होय! आणि म्हणूनच शोकप्रदर्शनासाठीं शेंगदाण्याची उसळ झाली पाहिजे. ह्या चवलीचं आणखी कांहीं म्हणणं नाहीं. फक्त शेंगदाण्याची उसळ झाली पाहिजे. उसळ टेस्टदार झाली पाहिजे. चकाचक झाली पाहिजे. नेपाळचा हिंग, गायकवाड वाड्यांतले बटाटे आणि भागलपुरची फोडणी देऊन शेंगदाण्याची उसळ झाली पाहिजे!

# राम राम भाऊसाहेब !

राम राम भाऊसाहेब !

या बसा भाऊसाहेब !
हा काय अवतार तुमचा भाऊसाहेब ?
हा कोट कसा फाटला भाऊसाहेब ?
हें धोतर कसं फाटलं भाऊसाहेब ?
काय म्हणतां, जोडाहि हरवला ?
आणि टोपी उडून गेली ?
कुठें गेला होतां भाऊसाहेब ?
काय म्हणतां सेंट्रल थिएटरांत ?
' दहा वाजतां ' पाहायला ?
तिकीट मिळालं नाहीं ?
आणि अशी फजीति झाली ?
थोडं पाणी प्या भाऊसाहेब !
डॉक्टरला बोलवूं का भाऊसाहेब ?

*   *   *   *

कुठं लागलं बिगलं नाहीं ना भाऊसाहेब ?
काय म्हणतां, फार धक्के खावे लागले ?
आणि इतकं करून तिकीट मिळालं नाहीं ?
तुम्ही मूर्ख आहांत भाऊसाहेब !
तुम्ही गाढव आहांत भाऊसाहेब !

अहो, तिकीट काढायची अक्कल नाहीं, तर गर्दींत घुसलांत कशाला ?
नाहींतर माझ्याकडे बघा भाऊसाहेब.
मला कसं तिकीट मिळालं ?
मी ' दहा वाजतां ' सिनेमा पाहिला भाऊसाहेब !
म्हणजे तें असं झालं भाऊसाहेब !
माझ्या बायकोनं तिकीट काढलं !
आमची ही म्हणजे या कामांत हुषार !
म्हणून मी नेहमीं बायकोला घेऊन सिनेमाला जातों भाऊसाहेब !

* * * *

पानसुपारी घ्या भाऊसाहेब !
आतां बरं वाटतं ना जीवाला ?
तोंड आंबट करूं नका भाऊसाहेब !
तुमच्या नशीबांतच जर नाहीं तर तिकीट कसें मिळणार ?
म्हणून मी म्हणतों, लग्न करा भाऊसाहेब !
बायको नाहीं, तर तुम्हाला तिकीट कसं मिळेल ?
नाहींतर गर्दींत काय आम्हीं मारामारी करायची ?
आम्हां सभ्य लोकांना हें कसं शोभेल ?
असे हताश होऊं नका भाऊसाहेब !
तिकीट आज नाहीं, उद्यां मिळेल !
उद्यां नाहीं परवां मिळेल !
असं हातपाय गाळून कसं चालेल भाऊसाहेब ?

* * * *

लहान मुलासारखे तुम्ही रडूं लागलांत कीं हो भाऊसाहेब ?
काय म्हणतां, तिकीट आत्ताच्या आत्तां पाहिजे ?
त्याशिवाय जेवणार नाहीं; अन्न घेणार नाहीं !
हें काय भाऊसाहेब ?
पोरासारखं करतां कीं हो तुम्ही भाऊसाहेब ?
भलताच हट्ट करून कसं चालेल भाऊसाहेब ?

चला, उठा जेवायला !
तुम्ही आम्ही बालपणचे दोस्त !
तुम्ही उपाशी राहिलांत तर माझ्या पोटांत घांस कसा जाईल ?
उठा कीं हो भाऊसाहेब !
माझ्या गळ्याची शपथ आहे भाऊसाहेब !

*           *           *           *

ताट मांडलं कीं हो भाऊसाहेब !
आज आमच्या घरीं स्पेशल वांगीभात आहे !
आमच्या बायकोच्या हातचं आज खाऊन तर बघा भाऊसाहेब !
आमची ही म्हणजे पट्टीची सुगरीण !
पाककलेंत एक नंबरची हुषार !
हें पीढिजात कौशल्य आहे भाऊसाहेब !
म्हणजे तिचा बाप होता आचारी !
आणि आई होती स्वयंपाकीण !
नशीबानेंच ही बायको मिळाली मला भाऊसाहेब !
अगदीं रत्न आहे भाऊसाहेब !
हा वांगीभात खाऊन बघा भाऊसाहेब !
घर तुमचंच आहे भाऊसाहेब !
संकोच करूं नका भाऊसाहेब !

*           *           *           *

तुम्ही गप्प कां भाऊसाहेब ?
काय म्हणतां, जेवण नको ?
' दहा वाजतां ' पाहिल्याशिवाय अन्न घेणार नाहीं ?
काय भयंकर प्रतिज्ञा करतां भाऊसाहेब !
अहो, असा वैताग करून कसं चालेल भाऊसाहेब ?
तुम्हाला उपाशी ठेवून मी कसा जेऊं ?
हें बरं नाहीं भाऊसाहेब !
तुम्हाला माझ्या गळ्याची शपथ आहे भाऊसाहेब !

माझ्या बायकोची शपथ आहे भाऊसाहेब !
प्रभात कंपनीची शपथ आहे भाऊसाहेब !
' दहा वाजतां ' बोलपटाची शपथ आहे भाऊसाहेब !
तुम्हाला हात जोडतों भाऊसाहेब !
बरं, तुमचाच हट्ट पुरा होऊं द्या.
तुम्ही आजच्या आज सिनेमा पहा भाऊसाहेब !
तिकीट काढण्यासाठीं माझ्या बायकोला घेऊन जा !
काय करणार भाऊसाहेब !
तुम्ही आम्ही बालपणचे दोस्त !
तुम्हाला आम्हीं तिकीट काढून दिलं नाहीं तर कोण काढून देईल ?
आमची ही या कामांत वस्ताद भाऊसाहेब !
अंगानें मजबूत आणि लठ्ठ !
गर्दीत घुसली कीं लोक घाबरून बाजूला होतात.
तिकीट हटकून मिळतं भाऊसाहेब !
तुम्ही ' दहा वाजतां ' पहाच भाऊसाहेब !
तिकीट काढल्यानंतर माझी बायको मला परत करा भाऊसाहेब !

# वासंतिक चढाई !

**अक्काबाई**—माझ्या शूर मैत्रिणींनो, आज छाकटे आळींतील ही बायकांची सभा कां बोलावण्यांत आली आहे हें तुम्हांला नव्यानं सांगायला नकोच. मुंबईचा प्रसिद्ध मवाली मनोहर वाटमारे हा पुण्यांत पुन्हा आला असून तो लवकरच आमच्या आळींत वासंतिक चढाई करणार आहे अशी बातमी आहे. गेल्या हिंवाळ्यांत तो आमच्याकडून मार खाऊन गेला आहे. आमच्या गल्लींतील एक शूर महिला मिस् रेवडीबाई हिनं त्याला चप्पलचा प्रसाद दिला होता. त्यामुळं तो चिडून पुन्हा आतां उन्हाळीं चढाई करण्यासाठीं आला आहे. वसंत ऋतु हा प्रणयाला अनुकूल आहे अशी त्याची समजूत असून या खेपेची भानगड यशस्वी होईल अशी तो सगळीकडे वढाई मारीत आहे. तरी आपण त्याला दाखवून दिलं पाहिजे कीं, छाकटे आळींतील कुमारिका हिंवाळ्यांत काय किंवा उन्हाळ्यांत काय कोणाहि पुरुषाला दाद देत नाहींत !

( 'हिअर हिअर' अशी ओरड होते. टाळ्यांचा आणि त्याबरोबरच बांगड्यांचा कडकडाट होतो. मिस् रेवडीबाई ही भाषण करण्यासाठीं वेणीचा शेपटा उडवीत व्यासपीठावर चढते. )

**रेवडीबाई**—माझ्या भगिनींनो, मुंबईचा मनोहर पुण्यांत आला आहे म्हणून भिण्याचं कारण नाहीं. गेल्या हिंवाळ्यांत लकडीपुलावर तो माझ्याशीं अतिप्रसंग करीत असतां मीं त्याची कशी शोभा केली हें तुम्हांला माहीत आहे. तो आतां पुन्हा माझ्या वाटेस आला तर त्याची अशी जिरवीन कीं जन्मभर त्याला आठवण राहील.

**चिमणाबाई**—रेवडीबाईनं फार मिजास करूं नये अशी तिला माझी सूचना आहे. या खेपेला मनोहर फारच तयारीनं आला आहे हें लक्षांत ठेवा ! तरुण स्त्रीला

भुरळ पाडील असा रुबाबदार पोषाख त्यानं धारण केला आहे. टेलर कंपनींतून त्यानं खास सूट शिवला आहे. ' व्हाईट वे लेड लॉ ' कंपनींतून त्यानं उत्तमपैकीं बूट, टाय आणि हॅट खरेदी केली आहेत. छाकटे आळींतील स्त्रियांवर छाप पाडण्यासाठीं मनोहर अद्यावत् तयारीनं पुण्यांत आला आहे. म्हणून मी म्हणते कीं, रेवडीबाईनं फाजील आत्मविश्वास बाळगूं नये. मनोहरसारखा देखणा पुरुष डामडौल करून आला तर रेवडीबाईचा निश्चय कितपत टिकेल हा संशयच आहे.

**रेवडीबाई**—माझा निश्चय अढळ आहे. मनोहर पुन्हा माझ्याकडून मार खाऊन जाईल हें मी ठासून सांगतें. त्यानें कितीहि जंगी तयारी केली असली तरी माझ्यावर आक्रमण करणं त्याला जड जाईल. त्याच्या सुटाबुटाची मिजास मला सांगू नको !

**चिंगी**—इश्श ! मला बाई सुटांतला पुरुष मुळींच आवडत नाहीं ! मला धोतरच आवडतं !

**अक्काबाई**—चिंगे, गप्प बैस ! तूं असं बोलूं नयेस. तुला अजून बारा वर्षं झालीं नाहींत.

**चंपावतीबाई**—सभेपुढं आणखी एक अडचण मांडण्यासाठीं मला थोडंसं स्पष्ट बोलणं भाग आहे. वासंतिक चढाई ही मोठी नाजूक चढाई आहे. अचानक केव्हां वर्मी घाव लागेल याचा नेम नाहीं. मुंबईचा मनोहर हा आमच्या छाकटे आळींत वसंत ऋतूची संधि साधूनच कां येतो याचा विचार केला पाहिजे. माझ्या शहाण्या भगिनींनो, तुम्हांला जास्त सांगण्याची जरूरी नाहीं. तुम्हांला सारं माहीतच आहे. वसंत ऋतु हा तरुण-तरुणींना मोठा घातक ऋतु आहे. मनाची चलबिचल होणं, हृदयाला हुरहुर लागणं, कुणाला तरी पाहून कसंसंच वाटणं, चोरून भेटणं, लांब लांब उसासे टाकणं वगैरे प्रकार वसंत ऋतूंतच होत असतात. प्रणयी जनांना उन्मादक असा हा ऋतु आहे. या ऋतूंत मनाचा तोल संभाळणं फार कठीण आहे. लैंगिक गुन्हे, विनयभंग, बलात्कार, दंगेधोपे इत्यादि गोष्टी याच भयंकर ऋतूंत घडत असतात. माझाच अनुभव सांगतें मी ! इथं सगळ्या बायका-बायकाच आहेत, तेव्हां बोलायला हरकत नाहीं. माझा प्रेमभंगसुद्धां एका वसंत ऋतूंतच झाला होता, आणि तो कुणी केला तर एका मोटार ड्रायव्हरनं !

**चिंगी**—किती छान ! मला सुद्धां ड्रायव्हर नवराच पाहिजे !

अक्काबाई—चिंगे, गप्प बैस. तूं असं बोलूं नयेस. तुला अजून बारा वर्षेसुद्धां झालीं नाहींत !

चंपावतीबाई—सांगायचं तात्पर्य हेंच कीं, हा वसंत ऋतु आहे हें लक्षांत घेऊन रेवडीबाईनं जरा हुषारीनं असावं !

मंजुळाबाई—रेवडीबाईला आणखी एक सूचना देण्यासाठीं मी उभी आहें. मुंबईचा मवाली मनोहर हा मवाली असला तरी सुशिक्षित मवाली आहे. तो मोठा डोकेबाज आणि कारस्थानी आहे. प्रणयांतील डावपेच खेळण्यांत तो पटाईत असून रेवडीबाईला वश करून घेण्यासाठीं तो नाना हिकमती लढवील याबद्दल मला शंका वाटत नाहीं. कदाचित् रेवडीबाईच्या मोलकरणीला तो फितूर करून घेईल. रेवडीबाईच्या धाकट्या भावाला चॉकलेट, पेपरमिंट इत्यादि लालूच दाखवून चिठ्या-चपाट्याचं टपालखातं निर्माण करील. तरी रेवडीबाईनं हें सारं धोरण संभाळून मोठ्या अक्कलहुषारीनं आलेल्या संकटाला म्हणजे प्रियकराला तोंड द्यावं अशी माझी तिला सूचना आहे.

रेवडीबाई—मला कसलीच भीति वाटत नाहीं. तुमच्या मूर्खपणाला हंसावं कीं रडावं हेंच मला कळत नाहीं. कृपा करून आतां शहाणपणाचा उपदेश कोणी करूं नये.

मंजुळाबाई—तुला मीं सावधगिरीचा इषारा दिला. तुला स्वतःच्या हुषार-पणाबद्दल घमेंड वाटत असेल. पण अत्यंत हुषार स्त्रीच आयुष्यांत फसत असते.

रेवडीबाई—तुम्ही विनाकारण भीतिदायक वातावरण निर्माण करून माझी हिंमत खच्ची करण्याचा प्रयत्न करतां ! पण मी तुम्हांला सांगतें कीं, डगमगून जाणारी स्त्री मी नाहीं. युद्धजन्य परिस्थितीप्रमाणं प्रणयजन्य परिस्थितींतहि माणसानं निर्भय असायला हवं.

मंजुळाबाई—म्हणजे ? उद्यां छाकटे आळींत मनोहर आला म्हणजे तूं कर-णार तरी काय ?

रेवडीबाई—काय करणार ? लग्न करणार !

अक्काबाई—काय बोललीस ? पुन्हा बोल !

रेवडीबाई—होय ! पुन्हा बोलतें, कान लांब करून ऐका ! मी मनोहरशीं

लग्न करणार आहें. माझ्याच आमंत्रणावरून मला वरण्यासाठीं तो पुण्यांत आला आहे!

**अक्काबाई**--काय ऐकतें मी हें? तूं त्याला चप्पल मारली होतीस ना?

**रेवडीबाई**—होय! त्याच क्षणापासून त्याच्यावर माझं प्रेम जडलं आहे. हिंवाळ्यांत त्याच्यावर माझा राग होता. पण आतां उन्हाळ्यांत राग जाऊन अनुराग निर्माण झाला आहे. मी त्याच्या श्रीमुखात भडकावली! पण जातां जातां तो माझ्या अंबाड्यातलं फूल घेऊन गेला! केवढी दिव्य निष्ठा ही! माझ्या भगिनींनो, तुम्हीच सांगा, अशा थोर प्रेमवीराचा मी कसा त्याग करूं?

**अक्काबाई**—देवा देवा! काय ऐकते मी हें? सभा कशासाठीं बोलावली आणि झालं काय? अखेर छाकटे आळींतील वासंतिक चढाईचा असा विचका व्हावा ना!

# जीवनांतील सुखदुःखें !

आयुष्यांत मला जास्तींत जास्त आनंद जर केव्हां झाला असेल, तर तें माझं पहिलं लग्न मोडलं तेव्हां ! कैलासवासी गडकऱ्यांनीं एके ठिकाणीं म्हटलं आहे कीं, पहिलं फूल आणि पहिलं मूल यांचा आनंद अमर्याद आहे. पण माझ्या बाबतींत पहिलं लग्न मोडलं, तेव्हांच आनंदाचा उच्चांक झाला ! पुढं दुसरं लग्न मोडलं तेव्हां आनंदाची तीव्रता जरा कमी झाली. त्यानंतर आतांपर्यंत अशीं अनेक लग्नं मोडलीं. पण म्हणतात ना, 'सदा मरे त्याला कोण रडे !' आतां या गोष्टींचा मला इतका सराव झाला आहे कीं, त्याचं मला विशेष कौतुक वाटत नाहीं. इतरांनीं माझं लग्न जुळवायचं आणि मीं तें मोडायचं, असा परिपाठ आज कित्येक वर्षं चालला आहे !

होय ! माझं लग्न मीच मोडतों. तुम्ही विचाराल हें असं कां करतां ! माफ करा ! त्याचं कारण असं कीं शेपटी तुटलेल्या कोल्ह्यापेक्षां मी अधिक शहाणा आहें आणि माझे विचार जरा उन्नत आहेत.

घरांत बायको आणणं म्हणजे एक शत्रु निर्माण करणं होय, अशी माझी प्रामाणिक समजूत आहे. कुठली तरी अनोळखी बाई घरीं आणायची, आणि तिला माझी वैरीण करायची हें मला पसंत नाहीं. जगांत वांवरणारे दोन वेगवेगळे जीव पति-पत्नी या नात्यानं एकत्र आले कीं, वैरी बनतात अशी माझी समजूत आहे. दोन राष्ट्रं वर वर मैत्रीचा करार करतात, पण आंतून एकमेकाचा सूड घेण्यास टपून असतात, तोच प्रकार लग्नाच्या बाबतींतहि आहे.

आणखी तुम्हाला एक सांगूं ? लग्नाच्या वेळीं नवरी-मुलगी मान खालीं घालते, पण लग्नानंतर नवऱ्या-मुलाला मान खालीं घालण्याचा प्रसंग येतो. 'वैवाहिक जीवना' बद्दल धडकी भरविणारे इतके कांहीं प्रसंग मला माझ्या स्नेह्यांच्या जीवनांत आढळून आले आहेत कीं, त्यामुळंच मी लग्न न करण्याबद्दल मनाला खडा लावून घेतला आहे.

लग्नानंतरचे ते खडतर प्रसंग मी काय वर्णन करूं ? सिनेमा थिएटरांत बायको सिनेमा पहात बसली आहे, आणि तिचा नवरा थिएटरच्या बाहेर रडणाऱ्या पोराला खेळवित आहे, हें दृश्य नेहमीं मी पहात असतों ! आणि आज धान्याच्या दुकानावर कित्येक नवरे हातांत झोळी घेऊन रांगेत उभे असलेले पाहिले म्हणजे माझं मलाच वाटतं, मी केवढा भाग्यवान !

एकाकी जीवनांत किती शांती आणि समाधान असतं ! अविवाहित माणूस सुखी असतो, याचं बरचसं कारण अज्ञान होय ! अज्ञानांत सुख असतं असं म्हणतात, तें कांहीं खोटं नाहीं. माझंच उदाहरण पहा ! लुगड्या-पातळाचे भाव मला माहित नाहींत. पावडरीची किंमत मला ठाऊक नाहीं. फुलाची वेणी कशी मिळते तें मी जाणत नाहीं. गार्टर, स्नो, गंगावन, बांगड्या, पाळणा यांचे दर काय तें मला माहित नाहीं. खरोखर अज्ञानांत केवढं सुख आहे ! नाहींतर आजच्या या महागाईंत त्या त्या वस्तूचे दर मला कळते तर माझी छातीच फाटली असती !

लग्न न केल्यामुळं मी इतर दृष्टीनंहि कसा सुखी आहे तें पहा ! माझ्या कोटाची इस्तरी कधीं बिघडत नाहीं. माझ्या पुस्तकावर तेलाचे डाग पडलेले तुम्हाला दिसून येणार नाहींत. मी लेखनांत किंवा वाचनांत मग्न असतां-मध्येंच 'ग्रँटरोडवरून गवारी आणा' असा स्फूर्तिदायक संदेश मला मिळत नाहीं. त्यामुळं माझी प्रतिभा अद्याप रसातळास गेली नाहीं. नळावरच्या भांडणावरून शेजाऱ्यापाजाऱ्यांत जे वैरभाव निर्माण होतात, ते प्रसंग माझ्यावर कधींहि येत नसल्यामुळं माझी लोकप्रियता अद्याप शाबूद आहे !

लग्नाचं बंधन नसल्यामुळं जीवनाचा खरा उपभोग मी घेऊं शकतों. रस्त्यानं फिरतांनासुद्धां किती आनंद वाटतो जीवाला ! इतर लोक गाडीघोडे पाहून जपून चालतात रस्त्यानं ! पण मी तसा नाहीं. मला अपघाताचं भय वाटत नाहीं. माझ्या मागं रडणारं कुणी नाहीं, ही खात्री असल्यामुळं निर्धास्तपणं मी रस्त्यांत वावर. असतों. आतां मोटर-ड्रायव्हर्स मला ठार करीत नाहींत, हा त्यांचा चांगुलपणा होक,

बेफिकिर जीवनाची मौज मी अखंड लुटीत आलों आहें. हॉटेलांत चकाट्या केव्हां बसलों असतांना किंवा क्लबांत मित्रमंडळीबरोबर पत्ते खेळत असतांना, घरीं अ कीं, प्रेमळ पत्नी वाट पहात आहे, ही टोचणी मनाला किती यातना देणारी आहे ! ग-

लग्न केलेल्या विवाहित माणसाचं जीवन केवढं केंविलवाणं असतं! आयुष्यांत मानहानीचे प्रसंग तो मुकाट्यानं सहन करतो. ऑफिसांत वरिष्ठाकडून मानहानी करून घेण्यासारखा प्रसंग ओढवला, तरी तो नाईलाजानं तें सहन करतो. बायको-मुलांची चिंता हेंच त्याच्या लाचारीचं कारण नाहीं काय? पण माझ्यासारखा अविवाहित माणूस एक क्षणभरहि असा अपमान सहन करणार नाहीं!

तुम्हाला खरं खरं सांगतों, स्त्रीजातीविषयीं मला जो कमालीचा आदर आहे, त्याचं कारण मी त्यांच्यापासून चार हात दूर आहें म्हणून! माझं जर लग्न झालं असतं तर स्त्रियांविषयीं माझा आदर राहिला असता कीं काय याची मला शंकाच आहे. मी माझ्या लेखनांतून स्त्रियांचं वर्णन करतांना, 'चंद्रानना,' 'बिंबाधरा,' 'हरिणाक्षी,' 'देवता' इत्यादि गौरवपूर्वक उल्लेख करीत असतों. स्त्रियांची मी एवढी बेफाम स्तुति करतों, याचं कारण, त्यांच्यापासून मला उपद्रव होत नाहीं म्हणून! आयुष्यांत एकाहि स्त्रीनं माझं वाईट केलं नाहीं, आणि तशी संधी मी कुणाला दिलीहि नाहीं!

लग्न न केल्यामुळं स्त्रियांविषयीं मला एक प्रकारचा पूज्यभाव वाटत आहे. स्त्रियांविषयीं माझं चांगलं मत असण्याचं आणखी एक कारण म्हणजे नटूनथटून बाहेर पडलेल्या नीटनेटक्या स्त्रियांनाच मी पहात आलेलों आहें. सकाळच्या प्रहरीं स्वयंपाकघरांत पटकूर नेसलेली आणि हातांत शेणाचा गोळा व खराटा धारण केलेली सुगृहिणी कशी काय दिसते, याची मला कल्पना नाहीं! गंगावनाशिवाय स्त्रीचा अंबाडा किती मोहक दिसतो याचीहि मला कल्पना नाहीं.

मी लग्न केलं असतं तर स्त्रीला मी 'देवता' म्हटलं असतं का? माझा केवढा मनोभंग झाला असता! मला केवढा धक्का बसला असता! पत्नीच्या निकट सहवासानं स्त्रियांच्या आल्हादकारक रंगसफेतीमागं दडलेली सत्यसृष्टि कशी असते दिसून येऊन तमाम स्त्रीजातीविषयीं वाटणारा माझा आदर लयास गेला असता! —खर अज्ञानांत केवढं सुख आहे!

घरांत बायको आणणं म्हणजे एक शत्रु निर्माण करणं होय. विवाहित माणसाची बायको तेवढी त्याची शत्रु बनते असं नाहीं, तर विनाकारण इतर लोकांचंहि शत्रुत्व त्यांच्यामुळं त्याच्या नशिबी येतें!

सिनेमा थिएटरांत माझ्या बायकोशेजारी दुसरा कोणी येऊन बसला तर मी त्याच्याकडे वटारलेल्या डोळ्यांनीं पाहीन ! म्हणजे तो गृहस्थ माझा विनाकारण शत्रु बनला ! जगांत स्त्रीमुळं जेवढे कलह आणि तंटे बखेडे झाले तेवढे दुसऱ्या कशा-मुळं झाले नसतील !

माझी पत्नी सुंदर असेल, तर माझ्या मित्रमंडळींनीं वारंवार माझ्या घरीं येणं मला आवडणार नाहीं. आणि ती जर कुरूप असेल, तर मी स्वतःच वारंवार घरीं जाणार नाहीं ! एकूण काय, बायको सुंदर असो, कुरूप असो, नवऱ्याला या नाहीं त्या कारणानं मनःस्ताप आहेच !

मीं लग्न न करण्याचं आणखी एक कारण हें कीं, लग्नानंतर स्त्री लठ्ठ होते, हा धाक माझ्या मनानं घेतला आहे. माझ्या लहानपणच्या कित्येक बालमैत्रिणी आज लग्न होऊन लठ्ठ झाल्या आहेत. माझी पत्नीसुद्धां अशीच लठ्ठ होणार ही कल्पना मला भेडसावून सोडीत आहे !

आतां इतकं हृदय मोकळं करून सांगितल्यानंतर मी अविवाहित जीवनाची कां तरफदारी करतों, हें तुम्हांला कळून आलं असेलच ! एकंदरींत लग्न करणं धोक्याचं आहे, दुःखाचं आहे, क्लेशाचं आहे, अशी माझी ठाम समजूत झाली आहे. समाजांत अविवाहित माणसाला मान नाहीं, याचं खरं कारण विवाहितांना अविवाहितांविषयीं वाटणारा मत्सर होय ! लग्न करून फसलेल्या या लोकांना ब्रह्मचारी माणसाचं सुख पाहवत नाहीं यांत नवल काय ?

नाहीं तर बायको पाळण्यापेक्षां ब्रह्मचर्य पाळणं हें जास्त खर्चाचं असूनहि आम्ही तें पाळतों तें कां उगाच ?

लग्नानंतर पुरुषाच्या सद्गुणाची माती होते, असाहि अनुभव आहे. माझे कित्येक चांगले चांगले मित्र केवळ लग्न झाल्यामुळं लबाड बनले आहेत. उठल्या-सुटल्या खोटं बोलण्याची संवय लग्नानंतरच पुरुषांना जडते. आपण ज्याला 'थापा मारणें ' असं म्हणतों ती कलासुद्धां लग्नामुळंच पुरुषांना साध्य करून घ्यावी लागली. जगांत पहिल्यानं जेव्हां मानव वंशाची निर्मिती झाली, तेव्हां सारे पुरुष प्रामाणिक, पापभिरू आणि सत्यवक्ते होते. कुणीहि खोटं बोलत नव्हता. पुरुष पहिल्यानं केव्हां व कोणाजवळ खोटं बोलला, असं जर मला विचारलं, तर मी उत्तर देईन कीं, आपल्या बायकोजवळ तो पहिल्यानं खोटं बोलला ! आणि ही घरची संवय अं-वळणी पडून तो पुढें साऱ्या जगाशीं बनवाबनवी करूं लागला !

लग्नामुळं ओढवणारी आणखी एक आपत्ति मी सांगूं का ? एक बायको केली कीं कांहीं काळानं तिचा कंटाळा येऊन दुसरी करावीशी वाटतं, ही ती आपत्ति होय. आतां सामाजिक भीतीमुळं, किंवा आर्थिक दुःस्थितीमुळं सर्वच जणांना तसं करणं जमत अगर परवडत नाहीं हा प्रश्न वेगळा. पण नाविन्याची आवड ही मनुष्याच्या अंतर्मनांत एक सूक्ष्म प्रवृत्ति असते, हें नाकबूल करतां येत नाहीं. म्हणून मुळांतच लग्न न केलेलं काय वाईट ?

आणि याचसाठीं लग्न न करण्याची मी नेहमीं खबरदारी घेत असतों. दुर्दैवानं कुठं जमलं तर तें मोडण्याची मी खटपट करीत असतों. माझं लग्न होऊं नये म्हणून काय काय हिकमती लढवितों मी ! अत्यंत वावळट वेष धारण करून मी जगांत वांवरतो. माझी हजामत नेहमीं वाढलेली असते. मी म्हातारा दिसावा म्हणून डोकीच्या केसांना थोडथोडा चुना लावून घेतों. शेजाऱ्या-पाजाऱ्यांनीं माझी चौकशी केली तर मी अगदीं ठोकून देतों कीं, माझं लग्न झालं आहे आणि बायको मोहरीं गेली आहे !

जेव्हां एखाद्या नवीन चाळींत बिऱ्हाड बदलण्याचा माझ्यावर प्रसंग येतो, तेव्हां मी माझ्या दाराच्या बाहेर एक लुगडं वाळत घालतों ! हेतु हा कीं आसपासच्या लोकांना वाटावं, कीं घरांत बाई आहे.

पण इतकंही करून जेव्हां एखादी चारुगात्री माझ्यावर चोरटा नेत्रकटाक्ष फेंकते तेव्हां माझ्या छातींत धस्स होतं आणि मी कपाळावर हात मारून म्हणतों, 'ईश्वरा, तुझी लीला अगाध आहे!'

# गल्लींतील गस्त !

( ती पद म्हणत आहे )

कोण ग दारावरून माझ्या,
गस्त घाली फिरफिरून ॥ ध्रु० ॥
शिकलेला ग एक मवाली
आळीमध्यें रपेट घाली
चोरुनि बघतो हंसतो गाली
सभ्य दिसे वरवरुन मेला,
गस्त घाली फिरफिरुन ॥ १ ॥

**तो**—काय ग ? कसलं गाणं गात आहेस एवढ्या रात्रीं ?

**ती**—हें युद्धजन्य गाणं आहे.

**तो**—म्हणजे ?

**ती**—याला गस्तगीत म्हणतात. भावगीतासारखंच आहे हें ! काल मी गेलें होतें छाकटे आळींत भागीरथीबाईकडे बसायला ! तिथं त्यांची मुलगी मंजुळा हें गाणं म्हणत होती. त्यांच्या गल्लींत म्हणे सध्यां रात्रीं गस्त सुरू आहे. आणि मंजुळेला कसंसंच होत आहे.

**तो**—होणारच. युद्धजन्य परिस्थिति आहे.

**ती**—पोरं म्हणे रात्रीं गस्त घालतात. आणि पोरी खिडकींत बसून असतात.

**तो**—बसणारच ! युद्धजन्य परिस्थिति आहे. अग, मागें प्रभातफेरी नाहीं का झाली होती ! तशी ही रात्रफेरी !

ती—पण आपल्या गल्लींत अजून गस्त कशी नाहीं सुरू झाली ?

तो—कुणी तरी सुरू केली पाहिजे. मला वाटतं मीच सुरू करावी. ठरलं ! मीच गस्त घालतों आतां !

ती—काय म्हणतां ? तुम्ही गस्त घालणार ? पण मी जाऊं देईन तेव्हां ना ? झोंपा आतां स्वस्थ ! रात्र फार झाली आहे.

तो—माझ्या कार्याची हीच वेळ आहे. मला आतां बाहेर पडावंच लागणार. आण, एक काठी आण. आणि माझी निळी विजार पण आण. जरा रुबाबांत गस्त घातलेली बरी ! पाहतों चोर आणि गुंड कसे माझ्या गल्लींत येतात ते ! आण, काठी आण म्हणतो ना ?

ती—पण आपल्या घरांत काठी कुठं आहे ?

तो—तुझं लुगडं वाळत घालायची काठी आण ! तीहि चालेल ! या प्रसंगीं माणसानं मिळेल त्या साधनानं गुंडांचा प्रतिकार करण्यास सिद्ध असलं पाहिजे.

ती—पण तूर्त तुमचा प्रतिकार करण्यास मी समर्थ आहें. तुम्हांला मी बाहेर जाऊं देणार नाहीं. पुरे झाला तुमचा डौल. आतां स्वस्थ झोपा. बिछान्यांतच गस्त घाला.

तो—भलताच हट्ट करूं नकोस. युद्धजन्य परिस्थिति लक्षांत घे. तूं वीरपत्नी आहेस. या प्रसंगीं वीरपत्नीनं आपल्या नवऱ्याला बाहेर लोटलं पाहिजे. सोड, माझा हात सोड.

ती—अहाहा ! काय पण वीरपुरुष ! तुम्ही गस्त घालायला लागलांत म्हणजे तुमचं रक्षण करण्यासाठीं आणखी कुणी तरी गस्त घातली पाहिजे !

तो—काय म्हणतेस ?

ती—नाहीं तर काय ? मवाल्यानं एक चपराक दिली तर तुम्ही पाणी पिण्यास उठणार नाहीं ! आणि म्हणे गस्त घालणार ! तुमच्या अंगांत काय ताकद आहे हें मला माहीत आहे. एका हातानं पलंगावरून मीं तुम्हांला किती वेळां खालीं फेंकलं आहे !

तो—हं, जरा हळूं बोल. नवऱ्याची बेअब्रू करूं नकोस. आर्य स्त्रीला हें शोभत नाही. अरेरे ! देशावर बॉंब पडायची वेळ आली तरी आमच्या बायकांना अकल नसावी ना !

**ती**—मला अक्कल आहे म्हणूनच मी बोलतें. या अंधारांत एखाद्या म्हशीनं तुम्हाला शिंग मारलं तर तुम्ही ओरडत येणार इथं! आणि तें सारं मलाच निस्त-रावं लागणार. एवढ्या रात्रीं मी डाक्टरला आणावं तरी कुठून?

**तो**—नवऱ्याला उत्तेजन देण्याऐवजीं तूं त्याला नाउमेद करतेस? मी आतां कांहीं एक ऐकणार नाहीं. आण, माझी विजार आणि काठी आण!

**ती**—गस्त घालणार म्हणजे तुम्ही करणार तरी काय?

**तो**—काय करणार? तुला काय सांगूं रात्रीची वेळ आहे. मी काय करीन आणि काय नाहीं याचा नेम नाहीं.

**ती**—पण मला सांगावं गडे! गस्त कशी घालतात ती!

**तो**—ऐक. या टोंकापासून त्या टोंकापर्यंत मी चक्कर मारणार. नंतर त्या टोंकापासून पुन्हा ह्या टोंकापर्यंत एक चक्कर मारणार. मधून मधून हातांतला दंडुका जमिनीवर आपटून 'हुश्यार!' म्हणून ललकारी ठोकणार! कांहीं वेळ यमुना-बाईच्या घराजवळ थांवून 'यमुनाबाई हुश्यार!' असं म्हणावयाचं! कांहीं वेळ नर्मदाबाईच्या घराजवळ थांवून 'कसं काय नर्मदाबाई, ठीक आहे ना? हुश्यार!' असं म्हणायचं असं करीत करीत सगळ्या गल्लीची हजेरी घ्यायची!

**ती**—सगळ्या गल्लीची काळजी तुम्हांला! माझी मात्र नाहीं!

**तो**—असं कसं होईल? तुझ्या दारांतहि येऊन मी म्हणेन, "कसं काय वायको, हुश्यार! ठीक आहे ना? मी नसतांना कोणी चोर-वीर आला नाहीं ना?"

**ती**—जळ्ळी मेली तुमची गस्त! हे नखरे करायला पाहिजेत तुम्हांला? अशा अपरात्रीं यमुनाबाईच्या आणि नर्मदाबाईच्या दारांत जाऊन—

**तो**—अग, ही युद्धजन्य परिस्थिति आहे! असं करावंच लागतं!

**ती**—मलाहि आतां युद्धजन्य परिस्थितीमुळं कांहीं तरी करावंच लागणार! मीहि येतें तुमच्याबरोबर गस्त घालायला! चला, आपण दोघंहि बरोबरच जाऊं!

**तो**—छे छे! हें बरं नाहीं! अग, तुझं काय काम आहे? बायकांनीं गस्त घालूं नये.

**ती**—नाहीं. मी तुम्हांला एकटं सोडणार नाहीं. तुमच्या मागोमाग माझीहि गस्त आतां सुरू! ज्या ठिकाणीं तुमची गस्त, त्या ठिकाणीं माझीहि गस्त!

**तो**—देवा देवा ! काय हा युद्धजन्य प्रसंग ! लाडके, लाडके, जरा विचार कर.

**ती**—मी आतां कांहीं एक ऐकणार नाहीं. तुमच्याबरोबर माझीहि गस्त ! तुम्ही निळी विजार घाला. मी निळी साडी नेसते !

**तो**—मला वाटतं आज गस्त नको. रात्र फार झाली आहे आणि झोंपहि येऊं लागली आहे. आजचा बेत मी रहित करतों.

**ती**—आतां कसे वठणीवर आलांत ! झोंपा आतां स्वस्थ. वाटल्यास खोलींतल्या खोलींतच गस्त घाला !

**तो**—बरं. खोलींतल्या खोलींतच गस्त घालतों ! कसं काय बायको, हुश्यार ?

**ती**—हुश्यार !

# सोळा रुपये पगार !

[ **स्थळ :** गुंडोबा गिरमिटकर याची सिंगल रुम. गुंडोबा आरशासमोर उभा राहून कपडे करीत आहे. गुंडोबाची पत्नी जवळच ' हरभरा ' खात बसली आहे. ]

**तो**—( मोठ्या खुषींत येऊन )—यमुना जळिं खेळूं खेळ कन्हैय्या SSS—

**ती**—आज झालं तरी काय एवढी मिजास करायला ?

**तो**—चूप ! जपून बोल ! जपून बोल ! मी बेकार काय ? मला बेकार बेकार म्हणून हिणवतेस ? आतां दाखवतों तुम्हां सर्वांना ! काय समजलीस ?

**ती**—म्हणजे ? नोकरी मिळाली कीं काय ?

**तो** ( छाती फुगवून )—कां नाहीं मिळणार ? सोळा रुपये पगार, जेवण आणि कपडे फुकट !

**ती**—काय म्हणतां ? सोळा रुपये पगार ?

**तो**—जेवण आणि कपडे फुकट !

**ती**—कित्ती छान आहात हो तुम्हीं ! आतां हा सर्व पगार तुम्ही मलाच देणार ना ?

**तो**—लांबून बोल ! लांबून बोल ! नखरा करूं नकोस ! आतां माझ्याजवळ लाड चालायचे नाहींत ! मी लष्करी माणूस आहे !

**ती**—जरा बायकोशीं बोला तरी ! तुम्हांला मी श्रीखंड करून वाढते !

**तो**—वेळ नाहीं. फुरसत नाहीं. हा पहा चाललों. सोळा रुपये पगार; जेवण आणि कपडे फुकट !

**ती**—शी शी ! असा उतात्रळा नवरा मीं कुठं पाहिला नाहीं ! काय मेली मिजास तरी !

**तो**—जपून बोल! जपून बोल! मी आतां नवरा नाहीं, सैनिक आहे; बेकार नाहीं, नौकरीवाला आहे.

**ती**—तुम्हांला लष्करांत घेतलं तरी कुणी कसं? तुम्ही आहांत काडी पेहेलवान! बगळ्यासारखी मान! छातीची झाली आहे कमान!

**तो**—काय म्हणतेस? बोल! परत बोल!

**ती**—बोलणार! शंभर वेळां बोलणार! तुम्हांला लष्करांत नोकरी मिळाली कशी याचंच मला नवल वाटतं! तुमच्या छातीचा घेर आहे साडेबारा इंच! आणि तुमच्या अंगांत अशी ताकद तरी कुठं आहे?

**तो**—चूप! वटवट करूं नकोस! प्रत्येक बायकोला आपला नवरा अशक्तच वाटतो. म्हणून काय तो जगांत नालायक ठरत नाहीं! माझी ताकद आतां जपानला कळून येईल. बायकोला मी अशक्त वाटत असलों तरी जपानला भारी पडेन! साल्या जपान्या, सिंगापूरवर हल्ला करतोस काय? लक्षांत ठेव, गुंडोबा गिरमिटकर तुझ्यावर चाल करून येत आहे! हा पहा, हा पहा—

**ती**—अहो, अहो, तुम्ही माझ्यावरच चाल करून आलांत कीं!

**तो**—बायको आहेस कीं कोण आहेस? ही नुसती तालीम आहे. तुला एवढी-सुद्धां अक्कल नाहीं? माझ्या भावी आक्रमणाचा तुला नुसता इंगा दाखविला! तुला मीं नक्की सांगतों, शत्रूला मी भारी पडेन!

**ती**—पडणारच! सोळा रुपये पगार!—

**तो**—जेवण आणि कपडे फुकट!

**ती**—मी म्हणतें, जेवण आणि कपडे फुकट मिळाल्यावर तुमचा पगार तसाच शिल्लक राहील; खर्च होणारच नाहीं! ते सगळे पैसे मलाच मिळतील ना? होय ना गडे! होय ना गडे?

**तो**—एक दमडीसुद्धां मिळणार नाहीं तुला! दूर उभी रहा! नखरा करूं नकोस! मी लष्करी माणूस आहें. सोळाहि रुपये मला एकट्यालाच लागतील!

**ती**—अहो, मी तुमची बायको आहें—

**तो**—सैनिकाला नातं गोतं नसतं! बायको म्हणून तुला मी विशेष सवलत देऊं शकत नाहीं. हजारों ब्रिटिश प्रजाजनांपैकींच तूं एक आहेस.

**ती**—देवा देवा! मी आतां करूं तरी काय?

**तो**—चहा कर. गरमागरम चहा कर. मला आतां तहान लागली आहे.

**ती**—तुम्ही लढाईवर गेलांत म्हणजे इथं मला एकटीला कसं करमणार! मी येऊं का तुमच्याबरोबर?

**तो**—तो काय सिनेमा आहे तुला बरोबर घेऊन जायला? आणि तूं शत्रूच्या हातीं पडलीस म्हणजे या लढ्याला राम-रावण युद्धाचं स्वरूप प्राप्त होईल!

( इतक्यांत पोस्टमन पत्र आणून देतो. सौभाग्यवती गजरा गिरमिटकर पत्र वाचून बेहद्द खूष होते. )

**ती**—( पत्र घेऊन नाचत )—यमुना जळिं खेळूं खेळ कन्हैय्या ऽऽ—

**तो**—अग, अग! झालं तरी काय तुला एकाएकीं—

**ती**—मलाहि नोकरी मिळाली! हें पहा पत्र आलं आहे.

**तो**—काय म्हणतेस? तुलाहि नोकरी मिळाली?

**ती**—होय! भडभडे वकिलांच्या घरीं मी अर्ज केला होता. त्यांच्याकडे स्वयंपाकिणीची नोकरी आहे. सतरा रुपये पगार, जेवण आणि कपडे फुकट!

**तो**—म्हणतेस तरी काय? सतरा रुपये पगार?

**ती**—जेवण आणि कपडे फुकट!

**तो**—म्हणजे? माझ्यापेक्षां एक रुपया तुला जास्त?

**ती**—होय! तुमच्यापेक्षां एक रुपया पगार मला जास्त!

**तो**—लाडके, लाडके,—

**ती**—जवळ येऊं नका. लांबून बोला! जपून बोला! मी आतां सैंपाकीण आहे. सैंपाकिणीला सगळे मेंबर्स सारखेच आहेत. नवरा म्हणून मी तुम्हांला विशेष सवलत देऊं शकत नाहीं. हे सतराहि रुपये मला एकटीलाच खर्च करावे लागणार!

**तो**—देवा देवा! माझ्या बायकोला माझ्यापेक्षां एक रुपया पगार जास्त मिळावा ना? हरकत नाहीं. हा पहा चाललों. सोळा रुपये पगार, जेवण आणि कपडे फुकट!

**ती**—ही पहा चालल्यें! सतरा रुपये पगार, जेवण आणि कपडे फुकट!

( तो बंदूक घेऊन जातो. ती झारा घेऊन जाते. )

# या ठिकाणीं बाँब टाकूं नका !

या घरावर बाँब टाकूं नका; कारण या घरांत कोणीच नाहींत. फक्त To be let अशी पाटी आहे.

*        *        *        *

हा सनातनी गृहस्थ लाडू जिलबी खात बसला आहे. त्याचें भोजन संपेपर्यंत बाँब टाकूं नका.

*        *        *        *

ह्या व्यापाऱ्यानें देशी खादी म्हणून जपानी खादी विकली. जापान्यांनो, तुम्ही त्याच्यावर बाँब टाकणार काय ?

*        *        *        *

शहरांत बाँब पडेल या भीतीनें हा गृहस्थ खेड्यांत पळाला. आतां खेड्यांत बाँब टाकून त्याला परत शहरांत पाठवूं नका !

*        *        *        *        *

हा एक बेकार माणूस आहे. गेलीं दहा वर्षें तो बेकार आहे; वैऱ्यांनो, बाँब टाकून त्याची बेकारी नष्ट करूं नका.

*        *        *        *

अरेरे ! हा आंधळा आहे ! दोन्ही डोळ्यांनीं आंधळा आहे. त्याला भुयार दिसत नाहीं. शत्रूंनो, त्याच्यावर बाँब टाकूं नका !

*        *        *        *

हा एक संपादक अग्रलेख लिहीत बसला आहे. 'बाँब पडला तर काय करावें ?' या विषयावर तो लिहीत आहे. वैऱ्यांनो, त्याच्यावर बाँब टाकूं नका. कारण 'बाँब पडला तर काय करावें ?' हें खुद्द त्यालाच माहीत नाहीं !

*        *        *        *

ह्या जोडप्याचें नवीनच लग्न झालेलें आहे. नवरा-बायको 'हनीमून' ला चालली आहेत. मूर्खांनो, घटस्फोटापूर्वीच त्यांच्यावर बॉंब टाकूं नका !

* * * *

हा आजारी माणूस औषधोपचारासाठीं डॉक्टरकडे निघाला आहे. मूर्खांनो, त्याच्यावर बॉंब कशाला टाकतां ? कारण डॉक्टरच त्याला मारणार आहे !

* * * *

ह्या श्रीमंत मारवाड्यानें चांदीचे रुपये जमिनींत पुरून ठेवले आहेत. त्याच्यावर बॉंब टाकूं नका. कारण पुरून ठेवलेली संपत्ति त्याच्याशिवाय कुणालाहि माहीत नाहीं.

* * * *

या ठिकाणीं चेंडूफळीचा सामना सुरू आहे. ह्या क्रिकेपटूनें ९९ धांवा काढल्या आहेत. वैऱ्यांनो, थांबा ! त्याला आणखी एकच धांव काढूं द्या !

* * * *

या ठिकाणीं लोकशाही स्वराज्य पक्षाची बैठक चालू आहे. वैऱ्यांनो, चालते व्हा ! भ्याडावर बॉंब टाकण्यांत पराक्रम काय ?

* * * *

या फिल्म कंपनींत अखेरचें शूटिंग चालूं आहे. एवींतेवीं बोलपट पडणारच ! मूर्खांनो, तुम्ही बॉंब कशाला टाकतां ?

* * * *

ह्या वेश्येच्या घरावर बॉंब टाकूं नका. सभ्य लोकांचीं प्रेतें आढळून यावयाचीं !

* * * *

हा सावकार कर्जवसुलीसाठीं निघाला आहे. त्याच्यावर बॉंब टाकूं नका. कर्जदारांना वाईट वाटेल !

* * * *

हा दारूबाज माणूस चिक्कार पिऊन पडला आहे. तुम्हीं बॉंब टाकला तरी तो शुद्धीवर येणार नाहीं !

* * * *

ह्या तंबोऱ्यावर आणि तवल्यावर बॉंब टाकूं नका. अहो, या वाद्यांच्या साथी-शिवाय ती गाणार कशी !

*　　*　　*　　*

हें पहा ! विधवेनें टाकून दिलेलें मूल रस्त्यांत मरून पडलें आहे ! वैऱ्यांनो, या अर्भकावर बॉंब टाकून पुरावा नाहींसा करूं नका ! कारण त्या विधवेला शिक्षा व्हावयाची आहे !

*　　*　　*　　*

ह्या ब्रह्मचारी माणसावर बॉंब टाकूं नका ! कारण इतरांसाठीं एकच एक बायको रडेल, पण ह्याच्यासाठीं—!

*　　*　　*　　*

उघड्यावर पडलेल्या ह्या मजुरांवर बॉंब टाकूं नका. कारण भांडवलदारांच्या इमारती बांधण्यास त्यांची जरूरी आहे !

*　　*　　*　　*

उद्योग, उन्नति आणि उत्साह ! काल बूट पॉलिश करणारा पोऱ्या आज कार-खानदार झाला ! वैऱ्यांनो, त्याच्या कारखान्यावर बॉंब टाकून त्याला तुम्ही परत पोऱ्या करणार काय ?

*　　*　　*　　*

या थिएटरवर बॉंब टाकूं नका. कारण या ठिकाणीं नवीन बोलपट आजच सुरू होणार आहे.

*　　*　　*　　*

युद्धपरिस्थितीचा फायदा घेऊन नफेबाजी करणाऱ्या या व्यापाऱ्यावर बॉंब टाकूं नका. अहो, लोकांना महाग वस्तु घेण्याची आतां संवय झाली आहे.

*　　*　　*　　*

या स्वच्छ हिंदु उपहारगृहावर बॉंब टाकूं नका. कारण असा चहा दुसरीकडे कुठें मिळत नाहीं.

*　　*　　*　　*

उद्यांच माझी परीक्षा आहे. अहो, तुम्ही माझ्यावर बॉंब टाकलांत तर केलेला सर्व अभ्यास फुकट जायचा ना !

*        *        *        *

अरे विमानहल्ल्या, जरा थांब ! माझं मृत्युपत्र मला लिहूं दे. नाहींतर इस्टेटीसाठीं कोर्टांत किती भांडणं होतील !

*        *        *        *

पैठणी–साडीसाठीं तिनं आज हट्ट धरला आहे. वैऱ्यांनो थांबा ! तिला ही साडी नेऊन देईपर्यंत माझ्यावर बॉंब टाकूं नका !

*        *        *        *

जीवन असह्य झाल्यामुळें हा माणूस आत्महत्या करण्यास निघाला आहे. मूर्खांनो त्याच्यावर बॉंब टाकल्यानें तो थोडाच जिवंत राहणार !

# सखे सगुणे

सखे सगुणे,—दिवाळीनिमित्त तूं ' व्ही ' कडबोळी करीत आहेस असें कळतें. V आकाराचीं स्पेशल कडबोळी करून तूं यंदाच्या दिवाळींत एक नवीनच शोध लावलास याबद्दल मी तुझें अभिनंदन करतों. तुझी V कडबोळी खाऊन शेजारच्या गोविंदरावाचे दोन दांत पडले म्हणे! ऐन दिवाळींत तुझ्या कडबोळीमुळें शेजाऱ्यापाजाऱ्यांचे दांत पडावेत ही दुर्दैवाची गोष्ट होय! सखे सगुणे, काय हें? तुझी ' व्ही ' कडबोळी ' विजयाची आहे कीं आणखी कशाची? तुझी कडबोळी खाणें आणि तुझ्या गालाचें चुंबन घेणें या दोन्ही गोष्टी दांताच्या सुरक्षितेच्या दृष्टीनें सारख्याच अपायकारक आहेत!

* * * *

**सखे सगुणे,**—मला आणखी एक बातमी लागली आहे कीं, ' संत सखू ' बोलपट पाहिल्यापासून तूं ' पांडुरंग ' ' पांडुरंग ' म्हणून सारखा धांवा करीत असतेस. अग, हा पांडुरंग कोण? पांडुरंग तलगेरी कीं पांडुरंग नाईक? कीं मीनाक्षीचा नवरा पांडुरंग शिरोडकर? सखे सगुणे, हें लक्षण कांहीं ठीक नव्हे. माझ्याशीं प्रतारणा करून तूं इतरांशीं लाडीगोडी करावीस हें मला पसंत नाहीं. अग, तुला माझी दया कशी येत नाहीं? मी निर्धन असल्यामुळें, हातातोंडाची गांठ पडत नाहीं; आणि तूं तर गांवांतल्या पांडुरंगाच्या नांवानें जप करीत बसली आहेस! आतां आपलं कसं होईल?

* * * *

**संत सगुणे,**—ऐन दिवाळींत तूं माझा प्रेमभंग करूं नकोस. थोरांचा मानभंग आणि पोरांचा प्रेमभंग या दोन घटना अत्यंत दुर्दैवी आहेत. वर्षानुवर्षांच्या दीर्घ परिश्रमानें आतां आपलं कुठं जमण्याच्या बेतांत आलं आहे. अशा वेळीं तूं मोडता

घालावास हें इष्ट नाहीं ! लढाईच्या वेळीं बंदूक मोडावी, अग्रलेख लिहितांना लेखणी मोडावी किंवा 'हनीमून'च्या वेळीं पलंग मोडावा, त्याप्रमाणें आपली दोस्ती ऐन रंगांत भग्न होत आहे. गाणं रंगांत आलं असतांना तंबोरा मोडावा, चकली खातांना दांत मोडावा, शूटिंग चालू असतां नायिका गरोदर रहावी त्याप्रमाणें तुझी माझी दोस्ती ऐन रंगांत भंग होत आहे.

* * * *

**नादान नखरेवाली,**—मला झिडकारण्याचें धारिष्ट्य तूं करूं नकोस. कारण लक्षांत ठेव, माझ्याशिवाय या जगांत तुला दुसरा कोणीहि नवरा मिळणार नाहीं. तूं स्वतःला मोटी राणी समतेस; पण राणीछाप रुपयाप्रमाणें बाजारांत तुला कोणी विचारीत नाहींत ! हा खोटा रुपया फक्त माझ्याकडे चालेल. म्हणून म्हणतों, सखे सगुणे, तूं माझ्याच गळ्यांत पड. संत सखूप्रमाणें हातवारे करून उगीच नखरा करूं नकोस. ' पांडुरंग ' ' पांडुरंग ' म्हणून कितीहि ओरड केलीस तरी आयुष्यांत तुला कधींही ' प्रभात ' टच लाभणार नाहीं !

* * * *

**माझ्या अर्धवट प्रिये,**—अर्धवट रोमान्स करून तूं मला आतां दूर लोटूं नकोस. अर्ध्या ताटावरून ब्राह्मणाला उठविणें आणि अर्ध्या चुंबनावरून नवऱ्याला उठविणें या दोन्ही गोष्टी महापातकांत जमा होतात. तुझा आणखी एका संकल्प ऐकून मला अधिकच धक्का बसला आहे. तूं स्वयंवर करणार आहेस म्हणे. पुराणांतल्या राजकन्येप्रमाणें तूं स्वयंवर करणार आहेस हें ऐकून मला थोडीशी भीति वाटते. पुराणांत अशी एक कथा आहे कीं, दमयंतीच्या स्वयंवरप्रसंगीं इंद्र, वरुण, यम आणि अग्नि या चार देवानीं नळाचीं रूपें धारण केलीं होतीं. तुझ्या स्वयंवर-प्रसंगींहि कुणीतरी चार ब्रह्मचारी माझें रूप धारण करून येतील कीं काय अशी मला भीति वाटते. कारण तूं आहेस तशी सुंदर ! अहाहा ! काय हें दिव्य लावण्य ! तुझं रूप पाहण्यास दोन डोळे पुरत नाहींत; तुला आलिंगन देण्यास दोन हात पुरत नाहीत, तुझं चुंबन घेण्यास दोन ओंठ पुरत नाहीत, आणि राग आला म्हणजे तुला लाथ मारण्यास दोन पायहि पुरत नाहींत !

# आधुनिक स्वयंवर !

[ खख्याहरीची वाग्दत्त वधू सखी सगुणा हिनें एकाएकीं आपला स्वयंवराचा बेत जाहीर केल्यामुळें देशोदेशींचे अनेक आशाळभूत उमेदवार पाणिग्रहणासाठीं उपस्थित झाले आहेत. फॅशनेबल तरुण, रंगेल म्हातारे, खुशालचेंडू प्रेमवीर, हळहळणारे ब्रह्मचारी, सोंवळे सनातनी, कॉलेजकुमार, लेखक, कवि इत्यादि मंडळीच्या बेसुमार गर्दीनें स्वयंवर मंडप गजबजला आहे. खख्याहरीला शिव्या देणारे वृद्ध पेन्शनरसुद्धां मिशीला कलप लावून स्वयंवरासाठीं चोरून हजर राहिले आहेत. सखी सगुणा हातांत वरमाला घेऊन मंडपांत चक्कर मारीत असून तिची दासी तिला प्रत्येक उमेदवाराची थोडी थोडी माहिती सांगत आहे. ]

**सगुणा**—( दासीच्या कानांत ) सेविके, मी भांबावून गेलें आहें. या ठिकाणीं जमलेल्या शेंकडों पुरुषांतून कुणाला धरावं नि कुणाला सोडावं याचा मला भ्रम पडला आहे. माझ्या दृष्टीला तर प्रत्येकजण मदनाचा पुतळा दिसत आहे.

**दासी**—पण शास्त्राप्रमाणं तुला एकच नवरा करावा लागेल हें मी सांगून ठेवतें.

**सगुणा**—( सद्गदित कंठानें )-मला जरा मदत कर ग !

**दासी**—थांब, अशी गोंधळून जाऊं नकोस. मी प्रत्येक उमेदवाराचा तुला अल्पपरिचय करून देतें. त्यापैकीं तुला जो पसंत पडेल त्याला तूं माळ घाल.

**सगुणा**—तो तिकडे कोण रडत बसला आहे, तिथूनच सुरुवात कर.

**दासी**—जशी देवींची आज्ञा. सखे सगुणे, हा जो इथं रडत बसला आहे तो एक दुर्दैवी ब्रह्मचारी आहे. गेलीं चाळीस वर्षें हा असा सारखा रडत आहे. पण एकाहि स्त्रीला या अभागी जीवाबद्दल दया वाटली नाहीं. आतां तुला तरी ह्याच्याबद्दल कांहीं वाटत असल्यास—

**सगुणा**—शी शी ! जो चाळीस वर्षं रडला तो आणखी कांहीं वर्षं सहज रडेल. चल, पुढें चल.

**दासी**—आतां हा नंबर दोन पहा. हे दिसायला म्हातारे दिसत असले तरी अजून यांच्यांत बराच उत्साह आहे. विशेषतः सूर्यास्तानंतर ह्या म्हाताऱ्याला भलतंच अवसान चढतं.

**सगुणा**—इश्श ! मला असला नवरा नको.

**दासी**—आतां हा आणखी एक उमेदवार देवीनं पाहून ठेवावा. हा एक अन्नदार सनातनी आहे. एक पत्नी जिवंत असतांहि हा दुसरी करण्याची उमेद धरून आला ह्यावरून ह्याचं पौरुष—

**सगुणा**—शी शी ! सेविके, अश्लील बोलूं नकोस !

**दासी**—देवी, जरा इथं पहा. हा लष्करी बाण्याचा तरुण छाती पुढं काढून तुझ्याकडे आशेनं पहात आहे. हा उत्कृष्ट निशाणबाज आहे. अंधारांतसुद्धां ह्याचा अचूक नेम—

**सगुणा**—मला अंधारांतला वीर मुळींच आवडत नाहीं.

**दासी**—आतां ते पलीकडे साधुमहाराज बसले आहेत त्यांना प्रणाम कर.

**सगुणा**—अगबाई ! हे महाराजसुद्धां लग्नासाठीं आले आहेत कीं काय ?

**दासी**—नाहीं. त्यांना स्वतःला लग्न नको आहे. इथं कुणी तरी लग्न करील आणि मग ती बायको आपणांस अर्पण केली जाईल या अपेक्षेनं हा पुण्यात्मा इथं आला आहे.

**सगुणा**—देवा देवा ! माझ्या नशीबांत आहे तरी काय ?

**दासी**—आतां आणखी एका दणकट उमेदवाराची तुला मी ओळख करून देतें. हा बजरंग आखाड्यांतील एक नामांकित पेहलवान आहे. कुस्ती खेळण्यांत फार पटाईत आहे.

**सगुणा**—नको ग बाई ! माझं लुगडं फाटेल !

**दासी**—देवी, जरा इथं ये. लाजूं नकोस. इथं ये. हा आणखी एक उमेदवार पाहा. हा नळबाजारचा पानवाला आहे. ह्याची 'पलंगतोड' पानपट्टी फार प्रसिद्ध आहे !

**सगुणा**—जळला मेला ! अग, ह्या ठिकाणीं कोणी सभ्य माणूस नाहीं का ?

**दासी**—तुझ्या लग्नाला सभ्य माणूस कसा येणार ? तरीपण आहे. एक सभ्य माणूस आहे. हा पहा, महाराष्ट्रांतील अत्यंत सज्जन माणूस ! इतका सभ्य आणि सज्जन आहे कीं, स्वतःच्या स्त्रीलासुद्धां मातेसमान मानतो.

**सगुणा**—मला हा नवरा नको !

**दासी**—हा एक खाणावळवाला पाहा ! मोठ्या आशेनं इथं धांवत आला आहे. गिऱ्हाईकांना घरगुती जेवण मिळेल अशी ह्यानं नुकतीच जाहिरात दिली असल्यामुळं ह्याला लग्नाची तीव्र निकड आहे !

**सगुणा**—हा खाणावळवाला राहूं दे. तो कोण सांग मला अगोदर. अण्णासाहेब माईणकरांप्रमाणं वांकडी टोपी ठेवून मला खुणा करतो आहे—

**दासी**—तो एक मोटार ड्रायव्हर आहे. पण त्याची स्पीड भयंकर फास्ट आहे. केव्हां ॲक्सिडेंट करील याचा नेम नाहीं. अग तुला तो नको.

**सगुणा**—आतां मी करूं तरी काय ? एकहि माणूस माझ्या लायकीचा इथं दिसत नाहीं. अग, ते कुठं आहेत ?

**दासी**—ते कोण ?

**सगुणा**—अग ते !

**दासी**—सख्या हरी होय ? ते आत्तांच स्वयंवर मंडपांतून पळाले ! तूं जवळ येत आहेस असं पाहून त्यांनीं पळ काढला !

**सगुणा**—हाय रे देवा ! मग मी आतां कुणाला माळ घालूं ? सख्या हरी नाहीं तर स्वयंवर नाहीं ! ( मूर्छित पडते. मंडपांत एकच हलकल्लोळ उडतो. 'स्वयंवर मोडलं' आमच्या मनासारखं झालं !' अशा आनंदाच्या आरोळ्या ठोकीत सर्व उमेदवार निघून जातात. )

# जनावरांची....अपक्ष परिषद् !

**[ सध्यांच्या बिकट परिस्थितींतून हिंदुस्थानला मार्गदर्शन करण्यासाठीं गेल्या अमावास्येच्या रात्रीं मुंबईंतील सोनापुरांत जनावरांची एक अपक्ष परिषद भरली होती. परिषदेला गाढव, कुत्रा, बैल, रेडा, घोडा इत्यादि थोर थोर जनावरें उपस्थित होतीं.]**

**गाढव**—मित्रहो, आजच्या परिषदेचं अध्यक्षस्थान मला देऊन आपण जो माझा गौरव केला आहे त्याबद्दल मी अत्यंत आभारी आहे. वास्तविक माझ्यापेक्षां थोर थोर अशीं जनावरं आज याठिकाणीं उपस्थित असतांहि आपण मला गाढवालाच अध्यक्षपद बहाल करण्यांत काय मतलब साधला तें कळत नाहीं. कदाचित् आजच्या आणीबाणीच्या काळांत गाढवच जगाला योग्य मार्गदर्शन करूं शकेल, असा तुम्हांला भरंवसा वाटत असावा. किंवा माझे लांब कान दिल्लीपर्यंत पोंचूं शकतात म्हणून तुम्ही मला हा मान दिला असावा. मित्रहो, आंतरराष्ट्रीय परिस्थिति फार बिकट नि गुंतागुंतीची झाली आहे. हिंदी राजकारणाचा तर खेळखंडोबा झाला आहे. अशा प्रसंगीं जनावरांची ही अपक्ष परिषद कांहीं तरी विधायक कार्य करील अशी मी आशा बाळगतों. असो, आतां ज्यांना कांहीं ठराव मांडायचे असतील त्यांनीं ते मांडावे, अशी मी विनंति करतों.

**बैल**—बंधूनो आणि भगिनीनो, कोणत्याहि परिषदेचा पहिला ठराव मेलेल्या-गेलेल्यासंबंधीं दुःखप्रदर्शन करणारा असतो. म्हणून आपल्यामधील एक कर्तबगार जनावर ‘ बेटा पंजाबका घोडा ’ याच्या निधनाबद्दल दुःख प्रदर्शन करणारा ठराव मी पहिल्या प्रथम मांडतों.

**रेडा**—या ठरावाला मी दुजोरा देतों. तरीपण आजच्या सभेंत दुःखप्रदर्शनाचा एकच ठराव यावा याबद्दल मला वाईट वाटतें. पुढील परिषदेंत आम्ही असे जास्त ठराव आणूं शकूं, अशी मी उमेद बाळगतों.

**कुत्रा**—माझे मित्र श्रीयुत बैलोबा यांनीं मांडलेला पहिला ठराव पास झाला असें समजून मी आतां दुसरा ठराव मांडण्यासाठीं उभा राहतों. हा ठराव पुढील-प्रमाणें आहे—' व्हाइसरॉयांनीं आपल्या कार्यकारी मंडळांत किंवा हिंदी संरक्षण मंडळांत एकाहि जनावराचा समावेश केला नाहीं याबद्दल ही सभा तीव्र नापसंती व्यक्त करीत असून व्हाईसरायसाहेबांनीं फेरविचार करून अजूनहि कौन्सिल-विस्तार करावा, अशी या सभेची त्यांना सूचना आहे.'

**बोकड**—या ठरावाला माझा पाठिंबा आहे. श्रीयुत श्वानमहाशय यांनीं व्यक्त केलेली तक्रार अत्यंत रास्त आहे. मित्रहो, व्हाइसरॉयांच्या कौन्सिल-विस्तारांत जनावरांना प्रतिनिधित्व मिळूं नये हें दुर्दैव होय! हिंदुस्थानच्या संरक्षणाच्या दृष्टीनें निःशस्त्र हिंदी प्रजा आणि आम्ही जनावरं यांच्यांत काय फरक आहे तें तुम्हीच सांगा!

**बैल**—आणि व्हाइसरॉयसाहेबांची बैलावरची माया कुठे गेली? त्यांच्या कौन्सिलांत मी शोभलों नसतों का? मी जातिवंत बैल असल्यामुळें कोणत्याहि प्रकारचा विरोध न करतां सरकारला पाहिजे तें कार्य करून त्यांना मदत केली असती.

**कुत्रा**—पांच पांच हजार रुपये पगारांची बडी माणसं नेमलीं! मला कुत्र्यालाहि दोन चार तुकडे घातले असते तर सरकारचें काय नुकसान झालें असतें? आणि दोन तुकड्यासाठीं मी कितीतरी महत्त्वाचीं कामं केलीं असतीं. म्हटलंच आहे—' तें श्वान एक तुकड्यास्तव चार नाना—'

**बोकड**—आजच्या चर्चेत मी मनापासून भाग घेऊं शकत नाहीं, कारण माझी शेळी या सभेंत न आल्यामुळें माझें हृदय व्यथित झालें आहे. कॉंग्रेसच्या नादीं लागून माझ्या शेळीनें आमच्या अपक्ष परिषदेवर बहिष्कार घातला आहे हें मोठेंच दुर्दैव होय. तिचें हें कृत्य मूर्खपणाचं अन् अव्यवहार्य आहे.

**गाढव**—बोकडाच्या दुःखांत आम्ही सर्व जनावरं सहभागी आहोंत. त्यांच्या शेळीनें पक्षाभिनिवेश धरून आम्हां जनावरांच्या लौकिकाला बट्टा लावला ही गोष्ट अत्यंत

अनुचित होय ! वास्तविक आम्हा जनावरांना कोणताहि विशिष्ट असा पक्ष नसतो, आणि धर्मभेद तर मुळींच नसतो ! म्हणूनच अपक्ष परिषद भरविण्याचा हक्क माणसांपेक्षां आम्हां जनावरांना जास्त आहे. उदाहरणार्थ मी गाढव ! कुंभार, धोबी, हिंदू असो मुसलमान असो, कोणीहि माझ्यावर ओझें लादावें ! मी मुकाट्यानं सेवा वजावीत असतों. गाढव कधीं कुरकुर करायचा नाहीं. त्याचप्रमाणं इतर जनावरं ! आमच्यांत पक्षभेद जरासुद्धां नाहीं. ही म्हैसच पहा, हिंदूलाहि दूध देईल, मुसलमानालाहि दूध देईल, मवाळालाहि दूध देईल आणि जहालालाहि दूध देईल. असें असतांना श्रीयुत बोकड यांच्या मूर्ख शेळीनें या अपक्ष परिषदेवर बहिष्कार घालावा ही लाजिरवाणी गोष्ट होय.

**हत्ती**—गर्दभ महाशयाचे विद्वत्तापूर्ण भाषण मला पूर्णपणें पसंत आहे माझ्यापुरता थोडासा खुलासा करण्याची मी परवानगी घेतों. मी नेपाळचा हिंदू हत्ती आहे, अशी कांहींजण निष्कारण ओरड करतात. त्यांचा तो चुकीचा समज आहे. उद्यां जिना हिंदुस्थानचे बादशहा झाले तर त्यांच्या राजवाड्यांतहि मी डौलानं झुलत राहीन !

**गाढव**—शाबास ! गजराजाच्या निःपक्षपाती भाषणानं मला अत्यंत हर्ष होत आहे. जनावरांच्या अपक्ष परिषदेचा विजय असो !

**बैल**—आतां एक महत्त्वाचा ठराव मांडण्यासाठीं मी उभा आहे. हा ठराव हिंदुस्थानच्या राज्यघटनेसंबंधीं आहे.

**बोकड**—सबूर ! मग हा ठराव बैलानं न मांडता गाढवानं मांडावा अशी माझी सूचना आहे.

**घोडा**—हिंदी राजकारणांत सध्यां जो गाढवपणा चालला आहे तो लक्षांत घेतां हा ठराव गाढवानंच मांडणं उचित होईल.

( सर्व जनावरें ' गाढव गाढव ' म्हणून गिल्ला करतात. )

**गाढव**—शांत व्हा ! मंडळी शांत व्हा ! हा महत्वाचा राजकीय ठराव बैलालाच मांडू द्या. सध्यां राजकारणांत गाढवापेक्षां बैलालाच अधिक महत्व आहे, हें आपण विसरूं नका !

**बैल**—आतां हा ठराव मांडण्याची मी परवानगी देतों. हा ठराव असा—
' युद्धानंतर कांहीं विशिष्ट काळाच्या आंत हिंदुस्थानला वसाहतीचा दर्जा प्राप्त

होईल असं सरकारनं आश्वासन द्यावं आणि जर का या बाबतींत सरकार कुचराई करील तर जनावरांची ही अपक्ष परिषद् सरकारविरुद्ध कोणत्याहि प्रकारची चळवळ करणार नाहीं. ”

**कुत्रा**—शेम शेम ! हा काय ठराव झाला ? चळवळ करणार नाहीं म्हणजे काय ? सरकारनं आमच्या मागणीकडे दुर्लक्ष केलं तर आम्ही चळवळ करणारच. इन्किलाब झिंदाबाद !

**रेडा**—खरं आहे. आम्ही चळवळ करणारच.

**बैल**—म्हशीच्या प्राणनाथा, शांत हो ! चळवळ करायला ही कांहीं कॉंग्रेस-पक्षाची किंवा मुस्लीम लीगची परिषद नाहीं. ही अपक्ष परिषद आहे. आम्ही जनावरं काय चळवळ करणार ! सरकारकडे एक रडत रडत मागणी करायची आणि गप्प बसायचं एवढंच आपलं काम !

**गाढव**—बैलोबाचं म्हणणं अगदीं बाजवी आहे. लढ्याची भाषा आम्हा जनावरांच्या तोंडी शोभत नाहीं. सध्यांच्या बिकट राजकीय परिस्थितींत शांतपणें विचार-विनिमय करून, कांहींहि न करतां थंडपणें निघून जाण्यासाठीं आम्ही एकत्र जमलों आहोंत. आजच्या सभेंत हा आमचा उद्देश सफल झाला आहे. मंडळी, सभा खतम् !

# राम राम भाऊसाहेब !

राम राम भाऊसाहेब !

या वसा भाऊसाहेब !
आज असे भडक कां दिसतां तुम्ही भाऊसाहेब ?
होळीची नशा अद्याप उतरली नाहीं वाटतं ?
आणि तुमचा आवाज कसा पडला भाऊसाहेब ?
शिमग्यांत खूप ओरड केली वाटतं ?
पण हें बरं नाहीं भाऊसाहेब !
आतां लवकरच मामांची एकसष्टी आहे ना ?
त्यानिमित्त होणाऱ्या नाटकांत तुम्ही काम करणार आहांत ना ?
मग आवाज संभाळून ठेवायला नको का ?
होळीच्या धुळवडींतच जर तुम्हीं आवाजाचं खोबरं केलं तर—
तर एकसष्टीच्या नाटकांत तुम्हीं काम कसं करणार भाऊसाहेब ?
जरा विचार करा भाऊसाहेब !
मामांचा समारंभ झोकांत झाला पाहिजे—भाऊसाहेब !

*　　*　　*　　*

काय म्हणतां ? मीच नाटकांत काम करूं ?
अहो, पण आमचाहि आवाज कुठं धड आहे ?
तुमचा आवाज वर्षांतून एकदाच काय तो पडतो.
पण आमचा आवाज बायकोशीं भांडून बाराहि महिने पडेलला असतो.
आमची ही म्हणजे काय आहे, तुम्हाला सांगायला नकोच !

गांवांत धान्य मिळत नाहीं तरी पण हिची शक्ति मजबूत !
नाहींतर माझ्याकडे पहा भाऊसाहेब !
गहूं नसल्यापासून माझं वीस पौंड वजन घटलं भाऊसाहेब.
पण तिचं वजन वाढलं आहे भाऊसाहेब !
घरांत कांहीं नसलं तर ती कोळसासुद्धां खाते !
अहो, या बायकांचं काय सांगावं भाऊसाहेब !
तुम्ही लग्न कराच भाऊसाहेब !
म्हणजे तुम्हाला सारं कळेल भाऊसाहेब !

*　　*　　*　　*

पानसुपारी घ्या भाऊसाहेब !
कसं काय चाललंय् तुमचं ? ठीक आहे ना ?
शिमग्यांत तुम्हीं खूप चैन केली म्हणून ऐकतों.
त्या गोदावरी पुणेकरणीचा तुम्ही जलसा केला म्हणे !
अहो, जरा आम्हांलाहि कळवायचं कीं नाहीं ?
आम्ही म्हातारे झालों म्हणून काय झालं ?
आम्हांला हौस नाही कीं काय ?
यापुढं असे कांहीं गुपचूप कार्यक्रम असले तर आम्हांला बोलवीत चला.
डोळ्यानं नुसती खूण करा भाऊसाहेब.
आम्ही कोट टोपी घालून आलोंच.
नुसती खूणच करायची बरं कां भाऊसाहेब ?
आमच्या हिला कांहीं एक कळतां कामा नये.
नाहींतर मोठा कठीण प्रसंग गुदरायचा भाऊसाहेब !
एकदां मीं झोंपेंत एक अश्लील लावणी म्हटली.
आमच्या हिनं माझा अस्सा कान पकडला---
सकाळीं उठून रामरक्षास्तोत्र म्हटलं तेव्हां तिनं कान सोडला !
म्हणून म्हणतों, लग्न करूं नका भाऊसाहेब !
आणि केलेंत तरी बायको शेजारी झोंपूं नका भाऊसाहेब !

अहो, आम्हीं झोंपेंत वेडंवांकडं कांहींतरी वडबडणार !
तेव्हां ही नसती पीडा कशाला शेजारी !

*     *     *     *     *

तुम्हाला रेशनिंग कार्ड मिळालं का भाऊसाहेब ?
आम्हाला मिळालं भाऊसाहेब !
पण या रेशनींगमुळं घरांत भांडणं चालू आहेत भाऊसाहेब !
चार पायलीचा हिशोब तिला मान्य नाहीं.
आमची पत्नी जरा विशेष खादाड आहे.
तिला एकटीलाच आठ पायली धान्य लागतं !
अहो, ऐतिहासिक घराण्यांतील आहे ती !
दुसऱ्या बाजीरावाच्या काळांत हिच्या पूर्वजांनीं खूप पराक्रम गाजविले.
बसल्या बैठकींत शंभर शंभर लाडू फस्त करायचे ते !
आतां तुम्हींच सांगा, हिला कुठले चार पायली पुरणार !
तिची भूक मोठी विलक्षण आहे.
एखादे दिवशीं रेशनींग कार्डसुद्धां खाऊन टाकायची ती !

*     *     *     *

चहा घ्या भाऊसाहेब !
काय म्हणतां ? नको !
फार उकडतंयू ? थंड पाणी पाहिजे ?
तुम्ही गाढव आहांत भाऊसाहेब !
अहो, हा चहासुद्धां थंडच आहे !
आमच्या घरीं कधीं कुणाला गरम चहा मिळायचा नाहीं !
आमची ही फार चतुर !
मुद्दाम पाहुण्यासाठीं चहा करणार नाहीं. आंघोळीच्या गरम पाण्यांत थोडीशी पावडर टाकते !
झाला तिचा चहा तयार !
अहो, काय सांगू भाऊसाहेब !

पाहुणा परत कधीं तोंड दाखवीत नाहीं भाऊसाहेब !
तुमची गोष्ट वेगळी भाऊसाहेब !
तुम्ही आम्ही बालपणचे दोस्त !
तुम्हाला कशाची लाजलज्जा नाहीं !
कां उठलांत का भाऊसाहेब ?
काय म्हणतां ? जातां ?
चहानं मळमळायला लागलं ?
हॉटेलांत जाऊन तावडतोब दुसरा चहा घ्या भाऊसाहेब !
बरं, या भाऊसाहेब !
राम राम भाऊसाहेब !

# बायको, दार उघड !

बायको, दार उघड ! आहे का कुणी घरांत ? अगं ए, दार उघड. केव्हांपासून मी दरवाजा ठोठावतों आहें, केव्हांपासून मी बाहेर कोकलतों आहें, तरी तूं दार उघडत नाहींस म्हणजे काय ? अग केवढी रात्र झाली आहे ! तुझ्या नवऱ्याची तुला दया-माया आहे कीं नाहीं ? गाढ निद्रा लागली कीं काय तुला ? नवऱ्याला बाहेर तिष्ठत ठेवून तुला एकटीला आंत झोंप येते तरी कशी ? अग ए, दार उघड ! बायको आहेस कीं कोण आहेस ! अंधारांत बाहेर किती वेळ उभा राहूं ? घरीं येण्यास उशीर झाला म्हणून तुला राग आला कीं काय ? जरा कुठं बाहेर भटकण्यास गेलों तर तुझी ही कटकट ! तुझा नवरा झालों म्हणून आम्हीं कांहीं चैन करूं नये कीं काय ? अग ए, दार उघड ! दोन वाजून गेले ! दारावर टिचकी मारतो, धक्के मारतो, लाथ मारतो, तरी तुला ऐकूं येत नाहीं म्हणजे काय ? बोल, दार उघडतेस कीं जाऊं परत त्या रंगीच्या घरीं ?

*　　　*　　　*　　　*

**बायको, दार उघड !** माझे पाय लटपटत आहेत. जास्त अंत पाहूं नकोस अपरात्रीं नवऱ्याला असं बाहेर तिष्ठत ठेवणं पाप आहे. त्यांतून आज नशापणी जरा जास्त झाली आहे. गटारांत पडलों होतों, पण एका दयाळू पोलीसानं आणून घरीं सोडलं ! आणि तूं आतां दार उघडत नाहींस ! बायको आहेस कीं कोण आहेस ! अग, तूं आर्य स्त्री ना ! अपरात्रीं झिंगत आलेल्या नवऱ्याला हात धरून बिछान्यांत टाकावं हें तुला कसं कळत नाहीं ? रात्रभर गल्लीबोळांत भटकून थकून आलेल्या नवऱ्याला वारा घालीत बसावं हें तुला कसं कळत नाहीं ? अग ए, दार उघड ! चाळींतले लोक जागे होऊन तमाशा पहात आहेत. चटकन् दार उघड ! तरी पोलीस

म्हणत होता, रात्रभर चौकींत राहा आणि सकाळीं अन्नून घरीं जा ! पण मी त्याचं ऐकलं नाहीं. खरंच, या जगांत बायकोपेक्षां पोलीसच जास्त दयाळू ! गटारांत पडलेली माझी टोपी त्यानं शोधून दिली आणि तूं मला दारसुद्धां उघडत नाहींस !

*　　　*　　　*　　　*

**बायको, दार उघड** ! अडीच वाजले ! तीन वाजले ! तरीहि माझ्या ओरडण्याकडे तुझं लक्ष नाहीं ! आतां दुधवाला आल्यानंतरच तूं दार उघडणार कीं काय ? लाडके, प्लीज ! माझ्यावर दया कर ! तुला उद्यां सकाळीं दोन फॅन्सी पातळं—हो, ह्या महागाईतसुद्धां दोन पातळं विकत घेऊन देईन. तुझ्या गळ्याची शपथ—दार उघड—म्हणजे तुझ्या गळ्यावर हात मारून शपथ घेतों. अग, इतकी विनवणी करतों, तरी तुला दया कशी नाहीं ? नवरा-बायकोचं नातं राहूं द्या; तूं हिंदू, मी हिंदू ! म्हणून तरी या आपलेपणाच्या भावनेनं दार उघड ! काय म्हणतेस ? दार उघडणार नाहीं ? हें बघ. नवऱ्याला चिडवूं नकोस. माझा राग फार वाईट आहे. मवाळांचा राग जसा वाईट आहे, लोकशाही स्वराज्यपक्षाचा राग जसा वाईट आहे, हिंदुमहासभेचा राग जसा वाईट आहे, तसा माझा राग वाईट आहे. बायको दार उघड !

# जागा नाहीं... खालीं उतरा !...

[ दुर्दैवी माणसाला या जगांत कुठेच जागा नसते. ईश्वरा, स्वर्गांत तरी त्याला जागा आहे ना ? ]

**ट्राम कंडक्टर**

" जागा नाहीं. खालीं उतरा. गर्दी मत् करो. पीछे गाडीमें बैठो !"

*　　*　　*　　*

**बस कंडक्टर**

" जागा नाहीं म्हणून सांगतों ना? चलो, नीचे उतरो. ड्रायव्हर, गाडी चलाव ! "

*　　*　　*　　*

**सिनेमा थिएटर**

" जागा मुळींच नाहीं. सर्व तिकीटें खलास ! एक रुपया बारा आण्याचीं नाहींत ! सव्वा दोन रुपयांचींहि नाहींत ! जागा बिल्कूल नाहीं !"

*　　*　　*　　*

**घरवाला**

" जागा मुळींच नाहीं. सर्व भाडेकरू भरले आहेत. पहिल्या माळ्यावर नाहीं आणि दुसऱ्या माळ्यावरहि नाहीं. सिंगल रूम नाहीं आणि ब्लॉकहि नाहीं. जागा मुळींच नाहीं. "

*　　*　　*　　*

**मॅनेजर**

" आमच्या ऑफीसांत जागा नाहीं. ' नो व्हेकन्सी ' हा बोर्ड दिसत नाहीं का

तुम्हाला ? तुमच्या अर्जाचा मुळींच विचार करतां येत नाहीं. खरंच सांगतों आमच्याकडे नोकरी नाहीं."

*　　*　　*　　*

**खाणावळ**

"जागा नाहीं. जरा थांबा ! एवढी पंगत उठूं द्या. तोंपर्यंत जरा थांबा !"

*　　*　　*　　*

**स्वच्छ उपहार गृह**

"जागा नाहीं. उभ्यानं चहा घ्या. रागावूं नका शेठ ! सिनेमा आत्ताच सुटला ना !"

*　　*　　*　　*

**मारवाडी**

"तिजोरींत जागा नाहीं. हे पैसे बँकेंत भरून ये."

*　　*　　*　　*

**संपादक** (लेखकास)

"या अंकांत मुळींच जागा नाहीं. तुमचा लेख पुढील अंकांत छापतों."

*　　*　　*　　*

**कंपॉझिटर** (संपादकास)

"या जाहिरातीला मुळींच जागा नाहीं. तुमचा अग्रलेख काढून ठेवा, म्हणजे जाहिरात जाईल."

*　　*　　*　　*

**सार्वजानिक मुतारी**

"मुळींच जागा नाहीं. रांगेनं उभे रहा !"

*　　*　　*　　*

**आगगाडी**

"जागा मुळींच नाहीं. आतां एकमेकांच्या डोक्यावर बसा !"

*　　*　　*　　*

**धर्मार्थ इस्पितळ**

"जागा मुळींच नाहीं. रोग्याला सोनापुरांत घेऊन चला !"

* * *

**वेश्या**

"जागा नाहीं. खालीं उतरा. गिऱ्हाईकांची फारच गर्दी आहे."

* * * *

**दारूचा गुत्ता**

"मुळींच जागा नाहीं. बाटली घेऊन बाहेर जा."

* * .*

**लठ्ठ स्त्री** ( नवऱ्यास )

"पलंगावर मुळींच जागा नाहीं. खालीं झोंपा."

* * *

**पोलीस** ( कैद्यास )

"तुरुंगांत जागा नाहीं. आठ दिवस 'लॉक अप्' मध्येंच रहा !"

* * *

**चाळींतला नळ**

"जागा नाहीं. बायकांना धक्का लागेल ना ? लांब उभे रहा."

* * * *

**चौपाटी**

"बाकावर जागा नाहीं. वाळूंत बसा !"

* * * *

**हेअर कटिंग सलून**

"जागा नाहीं. अजून पांच दाढ्या बनवायच्या आहेत."

* * * *

**कुरूप कुमारी**

"माझ्या हृदयांत आतां मुळींच जागा नाहीं. अहो, किती जणांना वचन देत बसूं ?

* * * *

**सोनापूर**

"या ठिकाणीं सर्वांना जागा आहे. प्रत्येक जण या."

# टांगेवाला आणि घोडा

[ स्थळ : ठाकुरद्वार स्टँड. व्हिक्टोरियावाला झोंपा काढीत असून, त्याचा घोडाहि झोंपला आहे. कांहीं वेळानें व्हिक्टोरिया-वाला खडबडून जागा होतो आणि घोड्याला चाबूक मारतो. ]

**घोडा**—कां चाबूक मारलास मला ?

**टांगेवाला**—गिऱ्हाईक आलं आहे.

**घोडा**—कुठं जायचं आहे ?

**टांगेवाला**—बोरीबंदरला !

**घोडा**—काय भाडं ठरलं आहे ?

**टांगेवाला**—सव्वा रुपया !

**घोडा**—काय ? सव्वा रुपया ? इथून बोरीबंदरला जायला सव्वा रुपया ? गिऱ्हाईकाला लुबाडतोस ?

**टांगेवाला**—चूप ! तुला कशाला माझ्या भाड्याची पंचाईत ?

**घोडा**—पुन्हा चाबूक मारलास मला ? तुला संवयच झाली आहे ती !

**टांगेवाला**—तूं झपझप चाल पाहूं ! बोरीबंदरला जायचंय आपल्याला. गाडी चुकेल त्यांची !

**घोडा**—फारच छान होईल ! युद्धकार्याला तेवढीच मदत ! प्रवास करूं नका, असं रेल्वेचं म्हणणं आहे मुळीं !

**टांगेवाला**—फारच तारे तोडूं लागलास तूं ! घोडा आहेस कीं गाढव आहेस ? का रे ? हळुहळूं कां चालतोस ? दमलास ?

**धर्मार्थ इस्पितळ**

" जागा मुळींच नाहीं. रोग्याला सोनापुरांत घेऊन चला ! "

* * *

**वेश्या**

" जागा नाहीं. खालीं उतरा. गिऱ्हाईकांची फारच गर्दी आहे. "

* * * *

**दारूचा गुत्ता**

" मुळींच जागा नाहीं. बाटली घेऊन बाहेर जा. "

* * *

**लठ्ठ स्त्री** ( नवऱ्यास )

" पलंगावर मुळींच जागा नाहीं. खालीं झोंपा. "

* * *

**पोलीस** ( कैद्यास )

" तुरुंगांत जागा नाहीं. आठ दिवस ' लॉक अप् ' मध्येंच रहा ! "

* * *

**चाळींतला नळ**

" जागा नाहीं. बायकांना धक्का लागेल ना ? लांब उभे रहा. "

* * * *

**चौपाटी**

" बाकावर जागा नाहीं. वाळूंत बसा ! "

* * * *

**हेअर कटिंग सलून**

" जागा नाहीं. अजून पांच दाढ्या बनवायच्या आहेत. "

* * * *

**कुरूप कुमारी**

" माझ्या हृदयांत आतां मुळींच जागा नाहीं. अहो, किती जणांना वचन देत बसूं ?

* * * *

**सोनापूर**

" या ठिकाणीं सर्वांना जागा आहे. प्रत्येक जण या. "

# टांगेवाला आणि घोडा

[ स्थळ : ठाकुरद्वार स्टँड. व्हिक्टोरियावाला झोंपा काढीत असून, त्याचा घोडाहि झोंपला आहे. कांहीं वेळानें व्हिक्टोरियावाला खडबडून जागा होतो आणि घोड्याला चाबूक मारतो. ]

**घोडा**—कां चाबूक मारलास मला ?

**टांगेवाला**—गिऱ्हाईक आलं आहे.

**घोडा**—कुठं जायचं आहे ?

**टांगेवाला**—बोरीबंदरला !

**घोडा**—काय भाडं ठरलं आहे ?

**टांगेवाला**—सव्वा रुपया !

**घोडा**—काय ? सव्वा रुपया ? इथून बोरीबंदरला जायला सव्वा रुपया ? गिऱ्हाईकाला लुबाडतोस ?

**टांगेवाला**—चूप ! तुला कशाला माझ्या भाड्याची पंचाईत ?

**घोडा**—पुन्हा चाबूक मारलास मला ? तुला संवयच झाली आहे ती !

**टांगेवाला**—तूं झपझप चाल पाहूं ! बोरीबंदरला जायचंय आपल्याला. गाडी चुकेल त्यांची !

**घोडा**—फारच छान होईल ! युद्धकार्याला तेवढीच मदत ! प्रवास करूं नका, असं रेल्वेचं म्हणणं आहे मुळीं !

**टांगेवाला**—फारच तारे तोडूं लागलास तूं ! घोडा आहेस कीं गाढव आहेस ? का रे ? हळुहळू कां चालतोस ? दमलास ?

**घोडा**—मला फार वजन झालं आहे.

**टांगेवाला**—उगीच कुरकुर करूं नकोस. गाडींत तर सामान मुळींच नाहीं. फक्त एक बाई.

**घोडा**—पण ती बाई केवढी लठ्ठ आहे पाहिलीस ? दोन ट्रंकेंपेक्षां जास्त वजन आहे तिचं ?

**टांगेवाला**—तूं चल पाहूं आतां मुकाट्यानं ! गाडी चुकेल नाहींतर !

**घोडा**—तें पहा, मांजर आडवं गेलं ! मला वाटतं रस्त्यांत ॲक्सिडंट होईल—

**टांगेवाला**—तेवढं एक करूं नकोस. गाडींत बाईमाणूस आहे. आणि ती माहेरी चालली आहे पुण्याला !

**घोडा**—माझीहि बायको माहेरीं गेली आहे.

**टांगेवाला**—कुठें ?

**घोडा**—काठेवाडांत ! आमचं घराणं मोठं ऐतिहासिक बरं का ? माझा पणजोबा झांशीच्या राणीच्या दरबारांत होता.

**टांगेवाला**—तूं हिंदुसभावाल्यासारखा बोलूं लागला आहेस ! पूर्वजांची बढाई मारतोस, पण—

**घोडा**—तुम्हीं माणसांनींच पूर्वजांची बढाई मारावी ? आम्ही जनावरांनीं काय पाप केलं आहे ?

**टांगेवाला**—थांबलास कां मध्येंच ?

**घोडा**—पोलीसानं हात दाखवला, दिसत नाहीं का ?

**टांगेवाला**—अरेच्या ! माझ्या लक्षांतच नव्हतं !

**घोडा**—पण आम्हा घोड्यांचं लक्ष पोलीसांवर नेहमीं असतं. पोलीसाचा हात दिसताच आमचे पाय आपोआप थांबतात !

**टांगेवाला**—फार शहाणा आहेस तूं ! यापुढं तुला मी चाबूक मारणार नाहीं.

**घोडा**—खरं आहे. शहाण्याला शब्दाचा मार, चाबकाचा नव्हे.

**टांगेवाला**—हं, आतां पळ पाहूं जोरांत ! गाडीची वेळ झाली.

**घोडा**—रस्त्यांत कलिंगडाच्या साली आहेत. मला वाटतं, मी आतां घसरून पडणार !

**टांगेवाला**—तेवढं एक करूं नकोस. गिऱ्हाइकाला एकदां आपण सोडूं या! सव्वा रुपया मिळणार आहे मला!

( घोडा घसरून पडतो. गर्दी जमते. गर्दींत गाडींतील बाई नाहींशी होते! )

**घोडा**—मला उचला हो कुणी?

**टांगेवाला**—आतां मलाच कुणीतरी उचला. गिऱ्हाईक गेलं आणि सव्वा रुपयाहि गेला!

**घोडा**—मी म्हणत होतों बाईमाणसाला लुबाडूं नये!

---

# शिमग्यांतील पडसाद

## युद्धजन्य परिस्थिति!

युद्धजन्य परिस्थितीमुळें रंग महाग झाला असल्याकारणानें यंदा फक्त शेण आणि चिखल या देशी साधनांनींच आमच्या आळींत शिमगा साजरा करण्याचें ठरविलें आहे. तरी आमच्या शिमगाप्रेमी धर्मवीरांनीं आमच्या ह्या पवित्र कार्याला हातभार लावण्यासाठीं मोठ्या हौसेनें उत्सवांत भाग घ्यावा अशी विनंति आहे. उत्सवांत शेण, चिखल आणि माती फुकट पुरविण्यांत येईल. कळावें, आपला,

**धर्ममार्तंड टिल्लूशास्त्री**

* * * *

## शोचनीय निधन!

कळविण्यास अत्यंत वाईट वाटतें, कीं जुन्या पिढीतील एक प्रसिद्ध शिमगा शिरोमणी चिकटोपंत आगलावे हे काल रात्रीं छातीच्या विकारानें अचानक मरण पावले. छातीच्या दुखण्यानें मृत्यू येण्यास कारण, गेलीं पन्नास वर्षें ते होळींत सतत छाती फुटेपर्यंत ओरडत होते हेंच होय! होळीच्या सणांत त्यांच्याइतका तडाखेबंद ओरडणारा कर्तबगार हिंदुत्वनिष्ठ वीर गेल्या कित्येक वर्षांत जन्मला नाहीं. त्यांच्या मृत्यूनें होळींतील एक मोठा आवाज नाहींसा झाला! ईश्वर मृतात्म्यास शांति देवो!

* * * *

## आभार!

येथील 'गटार' साप्ताहिकाच्या सुविद्य संपादकानें आमच्या आळींतील होळीला देणगी म्हणून २० मण रद्दी दिली आहे! याबद्दल त्यांचे आम्ही फार ऋणी आहोंत.

त्यांच्या वृत्तपत्राला कोणी विचारीत नसलें, तरी धीर खचूं न देतां त्यांनीं धर्मकार्याकडे आपल्या २० मण अंकांचा विनियोग केला ही खरोखर अभिनंदनीय गोष्ट होय! वृत्तपत्र हें विशिष्ट कार्यासाठीं काढायचें असतें; आणि 'गटार' साप्ताहिक तर केवळ होळीच्या जळणकार्यासाठींच निघत आहे याबद्दल आम्ही त्याच्या संपादकाचें कौतुक करतों. पुढील होळीला आम्ही संपादकांकडून यापेक्षां अधिक मदतीची अपेक्षा करतों.

* * * *

## सेल! सेल!

होळीच्या मुहूर्तावर नवीनच प्रसिद्ध झालेला महान् ग्रंथ 'शिवीसंग्रह' आमच्या दुकानांत विक्रीस तयार आहे. या पुस्तकांत जुन्या आणि नव्या अशा एक लाख शिव्यांचा संग्रह असून फाल्गुनमास साजरा करण्यास हें पुस्तक आबालवृद्धांना अत्यंत उपयोगी पडणारें आहे. संपादक लोकांनाहि आपसांत वादविवाद करण्यास हें पुस्तक उपयुक्त आहे. खास शिमग्यानिमित्त पुस्तक सवलतीच्या दरानें देण्यांत येत आहे. तरी त्वरा करावी! कळावें,

पांचजन्य बुक डेपो,
पुणें शहर

* * * *

## फाल्गुन गुटिका

तुमची हीच तक्रार आहे ना?

या गुटिका सेवन केल्यानें शिमग्याच्या दिवसांत ओरडण्यास जास्त जोर व उत्साह येतो. अनेक सनातन्यांचीं शिफारसपत्रें आहेत. कितीहि ओरडलांत तरी आवाज बसत नाहीं. आवाज बसल्यास पैसे परत! एक वेळ खात्री करा.

गुपचूप औषधालय, पुणें.

* * *

## छुपी पिचकारी

पुण्याच्या एका संशोधकानें ही छुपी पिचकारी तयार केली आहे. या छुप्या पिचकारीनें तुम्ही शिमग्याच्या सणांत गुपचूप कुणावरहि रंग उडवूं शकतां! पत्ता लागणार नाहीं! हा अजब शोध लावल्याबद्दल सदरहू संशोधक अभिनंदनास पात्र आहेत. जगांतील महान् शास्त्रीय शोधांत या पिचकारी शोधाचें महत्त्व सनातन धर्माच्या दृष्टीनें फार मोठें आहे.

# मुंग्यांची दुर्दैवी रांग !

**[ पावसाळ्याची तरतूद म्हणून उन्हाळ्यांत धान्य सांठवून ठेवण्याची वृत्ति मुंग्यांमध्यें दिसून येते. अशा मुंग्यांच्या रांगाच्या रांगा आपापल्या 'गोडाऊन' मध्यें धान्य घेऊन जातांना आपण पाहतों. अशाच एका रांगेंत एक मुंगी आणि एक मुंगळा यांच्यामध्यें झालेला संवाद पुढें दिला आहे. ]**

**मुंगी**—कुणी मला धक्का दिला ?

**मुंगळा**—मी ! तुझा दोस्त मुंगळा !

**मुंगी**—शी ! लाज कशी वाटत नाहीं तुम्हाला ? लोक काय म्हणतील ? बायकांच्या रांगेंत तुम्ही कसे हो ?

**मुंगळा**—अरेच्या ! ही बायकांची रांग नाही का ? माझ्या लक्षांतच नाही.

**मुंगी**—बरेच उल्लू दिसतां तुम्ही ! चला, चालायला लागा ! माझ्या तोंडाकडे काय टकमका पाहतां ?

**मुंगळा**—तुझ्या तोंडांत काय आहे तें बघतो. साखरेचा कण कीं रवा—

**मुंगी**—डोकं फिरलं आहे तुमचं ! अहो, कसली साखर आणि कसला रवा ! आजकाल हे जिन्नस मिळतात का ? जवळ जवळ तीन महिने झाले मी गव्हाचा रवा पाहून—

**मुंगळा**—आणि मला चार महिने झाले साखरेचा कण पाहून—

**मुंगी**—संत तुकाराम म्हणतात, मुंगी होऊनि साखर खावी ! पण मुंग्यांना साखर कुठे मिळत आहे ?

**मुंगळा**—हो ! म्हणे 'लहानपण दे गा देवा, मुंगी साखरेचा रवा !'

**मुंगी**—कशाला हें लहानपण! उलट श्रीमंत लोकांनाच साखर आणि रवा मिळतो आज!

**मुंगळा**—रडूं नकोस! हा बाजरीचा दाणा घे.

**मुंगी**—मला पचत नाहीं. मला गहूच पाहिजे.

**मुंगळा**—अग, पण आणायचं कुठून आतां तो माल!

**मुंगी**—ऑस्ट्रेलियाहून गहूं येणार होता, त्याचं काय झालं?

**मुंगळा**—अग, तो गहूं माणसांनीं खाऊन टाकला! मुंग्यांना कसा मिळेल?

**मुंगी**—आतां काय करावं बाई! पावसाळा जवळ आला. आणि घरांत एक चिमूट धान्य नाहीं. चला आपण सरकारी धान्याच्या दुकानावर जाऊं!

**मुंगळा**—नको. अग, तिकडे माणसांची रांग लागली आहे; तिथं मुंग्यांचा कसा टिकाव लागणार! काल त्या सरकारी दुकानांत पांच हजार मुंग्यांची एक रांग माणसांच्या रांगेखालीं चिरडून ठार झाली! काय सांगूं तुला मुंगीताई!

**मुंगी**—इश्य! मला ताई म्हणतां आणि मला डोळाहि घालता? तुमचं आणि माझं नातं काय हेंहि मला कळेनासं झालं आहे!

**मुंगळा**—आम्ही पुरुष असेच! एखादीला ताई म्हणतों आणि डोळाहि घालतों.

**मुंगी**—निर्लज्जच तुम्ही! आम्हा बायकांना धान्याची चिंता, तर तुम्ही आपले रोमान्सच करीत बसतां! चला, आपण गावांत जरा भटकून धान्य सांठवून ठेवूं!

**मुंगळा**—नको. धान्य सांठविणं हा गुन्हा आहे.

**मुंगी**—काय गुन्हा?

**मुंगळा**—होय! आजकाल माणसांमध्यें धान्य सांठविणाऱ्याला कडक शिक्षा केली जाते. आम्ही मुंग्यांनीहि धान्य सांठवितां कामा नये.

**मुंगी**—मग खायचं काय आम्ही?

**मुंगळा**—आपण माणसांप्रमाणं—शिधापद्धति अंमलांत आणूं! सर्व मुंग्यांची एक सभा भरवून रेशनिंग कार्डांची योजना केली पाहिजे. म्हणजे धान्याची सारख्या प्रमाणांत वांटणी होईल. प्रत्येक मुंगीला दर आठवड्याला दोन युनिट—

**मुंगळा**—युनिट म्हणजे काय?

**मुंगी**—युनिट म्हणजे काय ?

**मुंगळा**—तुला अक्कल नाहीं ! अग, युनिट म्हणजे युनिट ! प्रत्येक मुंगीला दर आठवड्याला एक कण साखर आणि एक कण तांदूळ, एवढं धान्य मिळेल. तुला पसंत आहे ही योजना ?

**मुंगी**—होय ! एकदम पसंत आहे. चला, आपण आत्ताच्या आत्तां सर्व मुंग्यांची सभा भरवूं !

( मुंग्यांची सभा भरते. धान्याच्या वांटणीसंबंधीं चर्चा चालूं असतांच पावसाची एक जोरदार सर येते आणि सर्व सभा पाण्यांत बुडून, मुंग्यांच्या प्रेतांची रांग वाहत जाते. )

---

# राम राम भाऊसाहेब !

राम राम भाऊसाहेब !
या बसा भाऊसाहेब !
अरेच्या ! हें काय ?
आज काय झालं तुम्हाला लंगडायला ?
पायाला मार बसला ?
काय म्हणता ? फूटपाथवर घसरून पडलांत ?
केळीच्या सालीवरून ?
अहो, जरा बघून चलायचं कीं नाहीं ?
इतक्या घाईनें कुठें चालला होता ?
काय म्हणता ? मामांच्या एकसष्टी—समारंभाला ?
तरीच ! तरीच !
अहो, पण जरा काळजीपूर्वक चालायचं कीं नाहीं ?
बघा, किती मार लागला तुम्हांला ?
आतां म्हणाल, मामांचा पायगुण !

तुम्ही लोक असेच !
स्वतः गाफील राहतां, आणि नांव ठेवतां मामांना !

* * * *

असे जवळ या भाऊसाहेब !
अमृतांजन चोळतो पायाला तुमच्या !
अहो, तुम्ही आम्ही बालपणचे दोस्त !
तुमचा पाय दुखला तर आम्हांला वेदना व्हायच्या !
त्यांतून तुम्हाला नाहीं बायको !
कोण चोळणार तुम्हाला अमृतांजन !
आम्ही मित्रांनीं तुमची काळजी घ्यायची नाहीं तर कुणी ?
आतां पडा जरा इथेंच !
काय म्हणता ? एकसष्टीला जाणार ?
अहो, असे लंगडत काय समारंभाला जाणार ?
गाढव आहांत तुम्ही भाऊसाहेब !
मूर्ख आहांत तुम्ही भाऊसाहेब !
अहो, पडा जरा इथेंच !
आपल्या नशीबांतच समारंभ नाहीं असें समजा !
बसा, आपण इथूनच करूं मामांना दंडवत !

* * * *

पानसुपारी घ्या भाऊसाहेब !
आपण आज घरींच कांहींतरी कार्यक्रम करूं !
बरी आठवण झाली !
थापा मारण्याची चढाओढ करूं आपण !
बघू ! कोण जास्त थापा मारतो तें !
काल रात्रीं माझा आणि माझ्या हिचा हाच कार्यक्रम झाला !
रात्रीं तीन वाजले !
पण आमची ही वस्ताद !
अखेर मीच हरलों !

तिच्या थापा मारण्याच्या कला अजब आहेत !
अहो, लग्नापूर्वी तिनं तीन पुरुषांजवळ थापा मारल्या ?
पण अखेर लग्न केलं माझ्याशींच !
बाकी जे तिच्या तडाख्यांतून सुटले तेच भाग्यवान !
मी मात्र सांपडलों हिच्या मुठींत !
असें हसता काय भाऊसाहेब !
आमच्या दुःखाचं तुम्हाला कांहींच वाटत नाहीं का भाऊसाहेब !

* * * *

विडी ओढा भाऊसाहेब !
अहो, तुम्ही आम्ही मामांचे शिष्य !
आजच्या दिवशीं विडी ओढलीच पाहिजे.
हं, ती काड्याची पेटी खिशांत टाकूं नका !
माझी आहे ती पेटी भाऊसाहेब !
विडी ओढणाऱ्या लोकांना ही संवयच आहे !
दुसऱ्याची काड्यांची पेटी स्वतःच्या खिशांत घालायची !
पण मामा असें करीत नाहींत भाऊसाहेब !
ज्याची पेटी त्याला आठवणीनें परत करतात भाऊसाहेब !
मामांच्या सबंध चारित्र्यांत हा एकच गुण मला आवडला !
पण आम्ही लोक मामांचे सद्गुण उचलीत नाहीं !
त्यांचे दुर्गुण तेवढे घेतों !
हें बरं नाहीं भाऊसाहेब !
काड्याची पेटी परत द्या भाऊसाहेब !
तुम्ही आम्ही बालपणाचे दोस्त असलों तरी व्यवहाराला चोख असलं पाहिजे भाऊसाहेब !

* * * *

आतां तुमचा पाय दुखायचा कसा काय आहे ?
बरं वाटतं ना जरा ?

काय म्हणतां ? नाहीं ?
बिलकुल गुण नाहीं ?
उलट डोकंहि ठणकायला लागलं ?
आणि छातीला कळा येतात ?
आपण हा मामांचा विषयच वदलूं भाऊसाहेब !
मामांचा विषय काढला कीं कांहीं लोकांना हें असं होतं !
अहो, आमचंच पहा ना !
आज मामांचा सण म्हणून आम्हीं सकाळीं ठरवलं श्रीखंड करायचं !
पण बघतों तर काय ?
सारा बेत फिसकटला !
अहो, स्पष्ट काय सांगूं ?
तिनें घेतली चार दिवसाची रजा !
खाणावळींतून डबा मागविण्याचा प्रसंग आला !
अहो, आमच्या नशीबांतच नाहीं, मग काय ?
कीं तिनें ढोंग केलं आहे कुणास ठावूक !

* * * *

तुमचं वय किती भाऊसाहेब ?
काय म्हणतां चाळीस ?
म्हणजे तुमच्या एकसष्टीला अजून वीस वर्षं वाकी आहेत !
आम्ही तुमची एकसष्टी करणार भाऊसाहेब !
करणार म्हणजे काय, कीं करणारच भाऊसाहेब !
पण आत्तापासूनच वय जरा जास्त सांगत जा भाऊसाहेब
म्हणजे लवकरच एकसष्टी करण्याचा सुयोग येईल.
मी माझ्या पत्नीचीहि एकसष्टी करणार भाऊसाहेब !
होय भाऊसाहेब !
आतापर्यंत फक्त पुरुषांच्याच एकसष्ट्या होतात.
आणि स्त्रियांची होऊं नये म्हणजे काय ?
मामा स्त्रियांचे कैवारी म्हणवितात.

स्त्रियांची एकसष्टी झाली पाहिजे भाऊसाहेब.
मी माझ्या हिची एकसष्टी करणार भाऊसाहेब !

*　　　　*　　　　*　　　　*

पण मी तोपर्यंत जगून राहीन का ?
आणि जर मी कां मेलों तर—
तर माझ्या बायकोची एकसष्टी तुम्हीच करा भाऊसाहेब !
नाहीं म्हणूं नका भाऊसाहेब !
तुम्ही आम्ही बालपणचे दोस्त !
माझ्या पत्नीची एकसष्टी तुम्ही करायची नाहीं तर कुणी ?
असे एकदम उठलांत का भाऊसाहेब ?
काय म्हणतां जायचं आहे ?
पाय बरा झाला ?
बघा, आमच्या पत्नीचा विषय काढतांच तुमचा पाय बरा झाला ?
अहो, तिचा पायगुण फारच चांगला !
बरं या भाऊसाहेब !
गरीबाची आठवण ठेवा भाऊसाहेब.
राम राम भाऊसाहेब !

काय म्हणतां ? नाहीं ?
बिलकुल गुण नाहीं ?
उलट डोकंहि ठणकायला लागलं ?
आणि छातीला कळा येतात ?
आपण हा मामांचा विषयच वदलूं भाऊसाहेब !
मामांचा विषय काढला कीं कांहीं लोकांना हें असं होतं !
अहो, आमचंच पहा ना !
आज मामांचा सण म्हणून आम्हीं सकाळीं ठरवलं श्रीखंड करायचं !
पण बघतों तर काय ?
सारा बेत फिसकटला !
अहो, स्पष्ट काय सांगूं ?
तिनें घेतली चार दिवसाची रजा !
खाणावळींतून डबा मागविण्याचा प्रसंग आला !
अहो, आमच्या नशीबांतच नाहीं, मग काय ?
कीं तिनें ढोंग केलं आहे कुणास ठावूक !

* * * *

तुमचं वय किती भाऊसाहेब ?
काय म्हणतां चाळीस ?
म्हणजे तुमच्या एकसष्टीला अजून वीस वर्षं बाकी आहेत !
आम्ही तुमची एकसष्टी करणार भाऊसाहेब !
करणार म्हणजे काय, कीं करणारच भाऊसाहेब !
पण आत्तापासूनच वय जरा जास्त सांगत जा भाऊसाहेब
म्हणजे लवकरच एकसष्टी करण्याचा सुयोग येईल.
मी माझ्या पत्नीचीहि एकसष्टी करणार भाऊसाहेब !
होय भाऊसाहेब !
आतापर्यंत फक्त पुरुषांच्याच एकसष्ट्या होतात.
आणि स्त्रियांची होऊं नये म्हणजे काय ?
मामा स्त्रियांचे कैवारी म्हणवितात.

स्त्रियांची एकसष्टी झाली पाहिजे भाऊसाहेब.
मी माझ्या हिची एकसष्टी करणार भाऊसाहेब !

*　　*　　*　　*

पण मी तोपर्यंत जगून राहीन का ?
आणि जर मी कां मेलों तर—
तर माझ्या बायकोची एकसष्टी तुम्हीच करा भाऊसाहेब !
नाहीं म्हणूं नका भाऊसाहेब !
तुम्ही आम्ही बालपणचे दोस्त !
माझ्या पत्नीची एकसष्टी तुम्ही करायची नाहीं तर कुणी ?
असे एकदम उठलांत का भाऊसाहेब ?
काय म्हणतां जायचं आहे ?
पाय बरा झाला ?
बघा, आमच्या पत्नीचा विषय काढतांच तुमचा पाय बरा झाला ?
अहो, तिचा पायगुण फारच चांगला !
बरं या भाऊसाहेब !
गरीबाची आठवण ठेवा भाऊसाहेब.
राम राम भाऊसाहेब !

# शिमगा १९४२

## शंखनाद भाग १

पहिली माझी बॉंब, ठणाणा ठणाणा
पडला उताणा–उमेदवार ॥
दुसरी माझी बॉंब, फुटून जाई ऊर
किल्ला सिंगापूर–ढासळला ॥
तिसरी माझी बॉंब, तिसरी माझी आपटी
जळो चित्रसृष्टी–वैतागलों ॥
चवथी माझी बॉंब, हाय अश्रू गाळी
ब्रह्मचर्य पाळी-वायुपुत्र ॥
पांचवी माझी बॉंब होळी आली होळी
वाढ पुरणपोळी-शेजारणी ॥

* * * *

## शंखनाद भाग २

सहावी माझी बॉंब, संपादकांसाठीं
कागद ललाटीं–नाहीं नाहीं ॥
सातवी माझी बॉंब, देशभक्तांसाठीं
पेट्रोल ललाटीं–नाहीं नाहीं ॥
आठवी माझी बॉंब, आठवा श्रीहरी
युद्ध आलें दारीं–भारताच्या ॥

नववी माझी बोंब, चर्चिलांच्या कानीं
स्वराज्याची वाणी—बोल आतां ॥
दहावी माझी बोंब, दशकंठ मेला
विश्वाचा हो पेला—परनार ॥

* * * *

## शंखनाद भाग ३

अकरावी माझी बोंब, अकारण नाही
शत्रू ठायीं ठायीं—उपटला ॥
बारावी माझी बोंब, आतां झालें फार
आणखी माघार नको—नको ॥
तेरावी माझी बोंब, आला हा वसंत
रशियाला उसंत—नाहीं नाहीं ॥
चवदावी माझी बोंब, गर्जून गर्जून
माझा हिंदुस्थान मुक्त होवो ॥
पंधरावी माझी बोंब, होळीची ही रात
वाढ केशरीभात—शेजारणी ॥

* * * *

## शंखनाद भाग ४

सोळावी माझी बोंब, पुण्याची चक्कर
म्हशीला टक्कर—सायकलीची ॥
सतरावी माझी बोंब, गायकवाडवाडा
लाडू आणि चिवडा—ध्येय त्यांचें ॥
अठरावी माझी बोंब, भोजनाची घाई
गेली पेशवाई—खाण्यामध्यें ॥
एकोणिसावी माझी बोंब, पगडी जरतारी
देवा तूंच तारी—महाराष्ट्र ॥
विसावी माझी बोंब, विसाव्या शतकांत
प्राचीन वेदान्त—काय करी ॥

* * * *

शंखनाद भाग ५

एकविसावी माझी बोंब, अहो माझ्या देवा
ब्रह्मचारी मेवा–खाऊं नका ॥
बावीसावी माझी बोंब, पेन्शनरकाका
मदनमस्त पाका–सेवूं नका ॥
तेवीसावी माझी बोंब, अहो पुण्यश्लोका
झोका आणि ठोका–करूं नका ॥
चोविसावी माझी बोंब, माडीवरल्या बाई
भिकाऱ्याला नाहीं–म्हणूं नका ॥
पंचविसावी माझी बोंब, आलों तुझ्या दारीं
वाढ शिरापुरी–शेजारणी ॥

*                *                *                *

शंखनाद भाग ६

सव्वीसावी माझी बोंब, होळीचा हा सण
फेडूं कसें ऋण–पठाणाचें ॥
सत्ताविसावी माझी बोंब, होळीचा हा सण
कंठीं आले प्राण–ओरडून ॥
अठ्ठाविसावी माझी बोंब, घसा गेला पार
आवाजाला जोर–उरला नाहीं ॥
एकोणतिसावी माझी बोंब, होळीचा हा सण
आणिलें जळण–जाळावया ॥
तिसावी माझी बोंब, होळी आली होळी
घे ग साडी चोळी–शेजारणी ॥

*                *                *                *

शंखनाद भाग ७

एकतिसावी माझी बोंब, साहित्यिक थोर
फूटपाथावर–ग्रंथ त्यांचे ॥

बत्तिसावी माझी बोंब, कविराज थोर
दिडकीला शेर-काव्य त्याचें ॥
तेहतिसावी माझी बोंब, डायरेक्टर थोर
रिकामें थिएटर-सर्वकाळ ॥
चौतिसावी माझी बोंब, संपादक थोर
लिखाण भिकार-सदा त्याचें ॥
पस्तीसावी माझी बोंब, हिंदूवीर थोर
निवडणुकींत पार-आपटला ॥

* * * *

## शंखनाद भाग ८

छत्तीसावी माझी बोंब, होळीचा हा सण
रंग आणि शेण-टाका टाका ॥
सदतिसावी माझी बोंब, होळीसाठीं खड्डा
आळीमध्यें अड्डा-अश्लीलांचा ॥
अडतिसावी माझी बोंब, माडीवरल्या बाई
शिवीगाळ कांहीं-करा आज ॥
एकुणचाळीसावी माझी बोंब, शिमगा सनातनी
अमंगळ वाणी-होवो आज ॥
चाळीसावी माझी बोंब, टाकू अंगावरी
रंग पिचकारी-शेजारणी ॥

* * * *

## शंखनाद भाग ९

एकेचाळीसावी माझी बोंब, फार लागे भूक
वाणी झाली मूक-हळू हळू ॥
बेचाळीसावी माझी बोंब, पुरे आतां धिंड
होळी झाली थंड-हळू हळू ॥

त्रेचाळीसावी माझी बोंब, नाहीं आतां जोर
ओरडाया फार—गात्रामध्यें ॥
चव्वेचाळीसावी माझी बोंब, होळीचा हा सण
माती आणि शेण—नशीबांत ॥
पंचेचाळीसावी माझी बोंब, होळीची ही मस्ती
तुझी माझी दोस्ती—शेजारणी ॥

---

# शिमगा १९४३

## शंखनाद भाग १

पहिली माझी बोंब, ठणाणा ठणाणा,
बाजरीचा दाणा—मिळो देवा ।
दुसरी माझी बोंब, धान्याच्या दुकानीं,
उभा चक्रपाणी—रांगेमध्यें ।
तिसरी माझी बोंब, खावी काय माती,
गव्हाची चपाती—नाहीं नाहीं ।
चवथी माझी बोंब, आलें रेशनींग,
कायदा धटिंग—खाऊं घाली ।
पांचवी माझी बोंब, होळी आली होळी,
करूं नको पोळी—शेजारणी ॥

*    *    *    *

## शंखनाद भाग २

सहावी माझी बोंब, भिकाऱ्यांच्या साठीं,
तांब्याचा ललाटी—पैसा नाहीं ।
सातवी माझी बोंब, तांब्याच्या नाण्याला,
संकट वाण्याला—दुकानांत ।

आठवी माझी बोंब, दुर्मिळ हो कैसा,
भोकाचाहि पैसा-जगामध्यें ।
नववी माझी बोंब, इराण्याच्या दारी,
बिस्कीटहि खारी-नाहीं नाहीं ।
दहावी माझी बोंब, स्लेस आणि मस्का,
घशाला तो ठसका-जळो पाव ।

* * * *

## शंखनाद भाग ३

अकरावी माझी बोंब, संपादकासाठीं,
कागद ललाटी-नाहीं नाहीं ।
बारावी माझी बोंब, छापा दिसे मळका,
कारण की जळका-कागद तो ।
तेरावी माझी बोंब, वृत्तपत्री रड,
किंमतींत वाढ-दुप्पटीनें ।
चौदावी माझी बोंब, कपडा झाला महाग,
बायकोचा राग-घरामध्यें ।
पंधरावी माझी बोंब, होळी आली होळी,
शिवूं कशी चोळी-बायकोला ।

* * * *

## शंखनाद भाग ४

सोळावी माझी बोंब, कमाल गांधींची,
नोकरी अण्यांची-गेली वृथा ।
सतरावी माझी बोंब, भलतीच शोभा,
पुढाऱ्यांची सभा-मुंबईत ।
अठरावी माझी बोंब, गेली सारी नीती,
जाहली फजीति-राजाजींची ।

एकोणीसावी माझी बोंब, इडली आणि डोसा,
राजाजींना ठोसा—जिथें तिथें ।
वीसावी माझी बोंब, होळी आली होळी,
आज रात्रपाळी—शेजारणी ।

* * * *

## शंखनाद भाग ५

एकवीसावी माझी बोंब, आला हा वसंत,
नवऱ्याला पसंत—नोवरी ती ।
बावीसावी माझी बोंब, आला हा उन्हाळा,
गळ्यामध्यें गळा—घालूं नका ।
तेविसावी माझी बोंब, थंडा लिंबू सोडा,
उन्हाळ्यांत झोडा—आइस्क्रीम ।
चोवीसावी माझी बोंब, अहो माझ्या अक्का,
रस्त्यामध्यें धक्का—देऊं नका ।
पंचवीसावी माझी बोंब, आला हा उन्हाळा,
लावूं नको ळळा—शेजारणी ।

* * * *

## शंखनाद भाग ६

सव्वीसावी माझी बोंब, अहो शांतारामा,
लागा आतां कामा—शूटिंगाच्या ।
सत्तावीसावी माझी बोंब, नटीच्चीया कानीं,
भरा आतां पाणी—शाकुंतली ।
अठ्ठावीसावी माझी बोंब, मामांची एकसष्टी,
झाले लोक कष्टी—चिंतातूर ।
एकोणतिसावी माझी बोंब, कुलवधूसाठीं,
प्रेक्षकांची दाटी—थिएटरांत ।

तिसावी माझी बोंब, होळी आली होळी,
वाढ पुरणपोळी--शेजारणी ।

*          *          *          *          *

## शंखनाद भाग ७

एकतीसावी माझी बोंब, ' लोकयुद्धा 'साठीं,
नाहीं कोण भेटी–गिऱ्हाईक ।

बत्तीसावी माझी बोंब, चाले माझी ताई,
मागें तीन भाई–बोडकेच ।

तेहतीसावी माझी बोंब, माझा हिंदुराव,
करी हावभाव–सभेमध्यें ।

चौतीसावी माझी बोंब, पुणेरी ती पगडी,
राजकीय फुगडी–नादानांची ।

पस्तीसावी माझी बोंब, माडीवरल्या नारी,
रंगपिचकारी–मारूं नको ।

# डावा डोळा पाण्यानें माझा–

सख्याहरी, माझा डावा डोळा पाण्यानें भरला आहे. तुझ्याशीं मी आतां मुळींच बोलणार नाहीं. ‘ बहुत दिन नच भेटलों सुंदरीला ’ हें पद म्हणत तूं मला भेटण्यासाठीं मुंबईत वाऱ्याच्या वेगानें धांवत आलास आणि घारीच्या वेगानें परत पुण्याला पळालास. हें रे काय? हा काय माणूसधर्म झाला ? ओठाशीं आलेला–पेला नव्हें—ओठाशीं आलेलें चुंबन अशा रीतीनें हुसकावलं जावं यापेक्षां रमणीच्या आयुष्यांत दुर्दैवाची गोष्ट ती कोणती ? सख्याहरी, पुण्यांत असं आहे तरी काय, म्हणून तूं परत परत तिथं पळतोस ! मुंबईतल्या हिरकणीपेक्षां पुण्यांतील बावनखाणी तुला अधिक प्रिय व्हावी ना ! मुंबईतल्या सुंदरीपेक्षां पुण्यांतील चिचुंदरी तुला अधिक प्यार वाटावी ना ! अरे, तूं अगदींच गाढव कसा ? शी शी ! मेली पुरुषाची जातच अशी. दिला हातावर हात-केला विश्वासघात-अशी बेमान जात... सख्याहरी, तुला मी आणखी काय सांगू ?

* * *

माझ्या राया, रागावूं नकोस. तुझ्याशीं माझं लवकरच लग्न होणार असल्यामुळें तुला आतांपासूनच शिव्या देण्यास मला शिकलं पाहिजे. तुझा मला फार राग आला आहे. तुझ्यासाठीं किती आवडीनें पानपट्टी तयार करून मी पोलक्याच्या खिशांत लपवून ठेवली होती ! पण तूं पुण्यांत निघून गेलास असं कळतांच पानपट्टी विसकटली, मनांतले बेत फिसकटले, हातपाय लटपटले ! पदर गळाला, चेहऱ्यावरची पावडर गळाली आणि वेणींतलें फूलहि गळालं !

* * * *

काँग्रेस पुढारी युद्धविरोधी घोषणा करतात, त्याप्रमाणें तूं पुण्यांत जाऊन माझ्या संबंधी लग्नविरोधी घोषणा केलीस म्हणें ! इतकंच नव्हें तर गेस्ट हाऊसमध्यें ओल्या नारळाची करंजी खाऊन लग्न मोडल्याचा समारंभहि साजरा केलास म्हणें. सख्याहरी, काय हा बेशरमपणा ! लग्न जमल्यापेक्षां लग्न मोडल्याचाच तुला जास्त आनंद ! या अपराधाबद्दल तुला मी कैद करून मुंबईंत आणलं आहे. आतां तुला कडक शासन केल्याशिवाय मी रहाणार नाहीं. माझ्या रंगमहालांत बंदिस्त करून तुला मी ' अ ' वर्ग बहाल करते. तूं देशभक्त असल्यामुळें तुला थोड्याशा सवलतीहि द्याव्या असं मला वाटतं. नेसायला खादी, झोपायला गादी आणि सोबतीला मादी, इतक्या सवलती तुला दिल्या तर माझ्या राया, या तुरुंगवासांत तुझ्या कांहीं तक्रारी नाहींत ना ? सख्याहरी, चल चल, माझ्या घरी चल. रुकना तेरा काम नहीं, चलना तेरी शान। चल चल रे नौजवान।

*　　　*　　　*　　　*

छांदिष्ट वल्लभा, तूं अखेर मुंबईला आलास याबद्दल मला फार फार धन्यता वाटत आहे. वनवासांतून श्रीरामचंद्र अयोध्येस परत यावा त्याप्रमाणें मुंबानगरींतील तुझ्या असंख्य मित्र–मैत्रिणींना आनंद होत आहे. तूं मुंबईला आलास म्हणून सूर्यनारायण आज अधिक तेजानें तळपत आहे. मंद शीतल वारा जास्तच खुशीनें माझ्या पदराशी खेळत आहे. कुंडींतील फुलझाडांना विशेषच रंग नी टवटवी आली आहे. माझा पिंजऱ्यांतला पोपट आज निराळाच सूर काढून गात आहे. तूं आलास म्हणून आज मुंबईतल्या म्हशीनी जास्त दूध दिलं. तूं आलास म्हणून व्हिक्टोरीयाचें घोडें जास्तच वेगानें दौडत आहेत. तूं आलास म्हणून आज आमच्या चाळींतल्या मुलींनीं गर्बा डान्स केला आणि रात्रीं आकाशांत तारकाहि फुगड्या घालणार आहेत. सर्वत्र उत्साह, चैतन्य नी आनंदीआनंद पसरला आहे. आजचा चहा मला फारच गोड लागला. मी आरशांत हळूच डोकावून पाहिलं आणि काय सांगूं सख्याहरी, आज मी नेहमींपेक्षां विशेषच सुंदर दिसत आहे ! देवा देवा ! मला कुणाची दृष्ट तर लागणार नाहीं !

*　　　*　　　*　　　*

प्रीतिवल्लभा, तुझ्यासारख्या जवानमर्द रंगेल गड्याला मुंबई हेच स्थान योग्य आहे. मुंबईशिवाय तुला तरणोपाय नाहीं आणि तुझ्याशिवाय मुंबईला शोभा नाहीं. चुकला फकीर मशिदींत त्याप्रमाणें चुकला सख्याहरी अखेर मुंबईंतच सांपडायचा. मुंबई

हीच तुझीं जन्मभूमि, कर्मभूमि, धर्मभूमि, लग्नभूमि आणि मरणभूमि. मुंबई हेच तुझें पवित्र क्षेत्र, मंगल निवास नी अक्षय शांतीचे निधान आहे. अलम दुनियेंतील कोणत्याही स्थानाला मुंबईची सर यावयाची नाहीं. चंद्रभागेच्या वाळवंटापेक्षां चौपाटीचं वाळवंट हे अधिक पुण्यवान आहे. नेपाळच्या हत्तीपेक्षां इंपीरियल सिनेमाजवळचे दोन हत्ती हें केव्हाहि श्रेष्ठ आहेत. अरबस्तानच्या घोड्यापेक्षां मुंबईतील काळा घोडा अधिक प्रेक्षणीय आहे. पुण्याच्या तुळशीबागेपेक्षां मुंबईतील सुपारीबाग किंवा ताराबाग केव्हाहि थोर आहे. टिळकतलावापेक्षां धोबीतलाव, लकडीपुलापेक्षां फ्रेंच पूल जास्त शोभादायक नाहीं असें कोण म्हणेल? सोन्यामारुतीपेक्षां कांदेवाडींतील मारुति केव्हांहि जास्त वंदनीय! केदारच्या बद्रीनाथापेक्षां मुंबईचा बाबुलनाथ जास्त रमणीय. म्हणून म्हणते सख्याहरी, इंद्रपुरीहून श्रेष्ठ अशी ही मुंबापुरी सोडून तूं कुठेंही जाऊं नकोस.

* * * *

माझ्या गुलाबाच्या फुला, तुला मृत्यु सुद्धां या मुंबईतच येवो अशी परमेश्वराजवळ माझी प्रार्थना आहे. लोकमान्य टिळक या परमपावन मुंबईतच दिवंगत झाले. मुंबईत चैन करण्यासच नव्हें तर मुंबईत भीक मागण्यास सुद्धां भाग्य लागतं. मुंबईत उपाशी राहण्यांत सुद्धां एक प्रकारची मौज असतें. पुण्यांत प्रेम जमण्यापेक्षां मुंबईत प्रेमभंग होणें शतपटीनें सुखदायक आहे. सदाशिव पेठेंत आरामशीर इमल्यांत लोळण्यापेक्षां मुंबईत फूटपाथवर झोपणें जास्त सभ्यपणाचें आहे. पुण्यांतील मास्तर कृष्णरावापेक्षां मुंबईतील कल्हईवाला जास्त जोरदार ताना मारूं शकतो. म्हणून म्हणते सख्याहरी, लग्न मोडलं, संकटं कोसळलीं, आभाळ फाटलं, मृत्यु आला, तरी तूं मुंबई सोडून जाऊं नकोस.

# आमंत्रण पत्रिका !

कागदाच्या महागाईमुळें एका गृहस्थानें लग्नाच्या आमंत्रणपत्रिका केळीच्या पानांवर लिहून पाठविल्याची अद्‌भुतरम्य वातमी नुकतीच प्रसिद्ध झाली आहे. केळीच्या पानावर लिहिलेल्या ह्या आमंत्रणपत्रिका गाईनें किंवा म्हशीनें मधल्यामधें खाऊन टाकल्या, तर पाहुण्यांची गर्दी आपोआपच कमी होऊन लग्न समारंभाच्या खर्चांत आणखी बचत होण्यासारखी आहे. माझे मित्र गट्टूलाल हे तर आपल्या लग्नाची आमंत्रणपात्रिका पिंपळाच्या पानावर लिहिणार असल्याची गुणगुण मला लागली आहे. माझ्या शेजारचे एक पेन्शनर गृहस्थ ह्या उतारवयांत तिसऱ्यांदा लग्न करणार असल्यामुळें, त्यांनी आपली लग्न-पत्रिका पिकलेल्या पानावर लिहून पाठविण्याची नमुनेदार योजना आंखली आहे !

## पिंपळाच्या पानांवर !

पण सध्याच्या परिस्थितींत एवढीच काटकसर करून भागणार नाहीं. लग्नाचें निमंत्रण पाठवितांना यांपेक्षां जास्त अक्कल वापरणें क्रमप्राप्तच आहे. ५० माणसांपेक्षां जास्त जणांना भोजन समारंभांत भाग घेतां येत नाहीं, हा नवा कायदा लक्षांत घेऊनच लग्न-समारंभ पार पाडला पाहिजे. ही एकंदर परिस्थिति लक्षांत घेऊन माझे एक मित्र घोट्टराम यांनीं आमंत्रण-पत्रिकेचा मसुदा पुढीलप्रमाणें तयार केला आहे—

**श्री म्हाळसादेवी प्रसन्न**

कृ. सा. न. वि. वि.

आमचें येथें श्रीकृपेंकरून आमची कन्या चि. सौ. कां. चिंगीबाई हिचा विवाह

मि॥ × × शके १८६४ रोजीं गोरज मुहूर्तावर श्री. बंडूनाना तिडके यांजबरोबर करण्याचें योजिलें आहे. तरी या शुभप्रसंगीं आपण येऊन कार्यशोभा करावी.

सूचनाः—सहकुटुंब सहपरिवार येऊं नये. एकटेच यावे. कारण ५० असामीपेक्षां जास्त जणांना भोजन घालतां येणें अशक्य आहे.

सूचना नं. २ः—तांदळाची दुर्मिळता लक्षांत घेऊन आपण वधुवरावर अक्षता टाकण्यासाठीं स्वतः तांदूळ आणावेत.

* * * *

**गहूं येणार !**

येणार ! येणार !
ऑस्ट्रेलियाहून गहूं येणार !
चूल पेटवून ठेवा !
शेगडी जळत ठेवा !
तवा घालून ठेवा !
वनीला चार पोळ्या !
बाळ्याला आठ पोळ्या !
मामाला शिरापुरी !
मामीला बोलवा घरीं !
पाट मांडून ठेवा !
ताट मांडून ठेवा !
येणार येणार !
ऑस्ट्रेलियाहून गहूं येणार !

* * * *

**कापड येणार !**

येणार ! येणार !
स्टँडर्ड क्लाथ येणार !
गरीबांचे कापड येणार !
बनीला परकर !

वाळ्याला हाफ शर्ट !
बेबीला झबलं !
बायकोला पोलका !
मामाला बंडी !
मामीला वाजते थंडी !
शिंप्याला बोलवा !
माप काढून ठेवा !
ऑर्डर देऊन ठेवा !
येणार ! येणार !
गरीबांचे कापड येणार !

# ‘ लोकयुद्ध ’ विकत घ्या !

या हो, घ्या हो । घ्या हो कुणी माझा ।
अंक ताजा—घ्या हो ॥

रस्तोरस्तीं जमले भाई
भाईमध्यें शोभे ताई

‘ लोकयुद्ध ’ घ्या घ्या म्हणती ।
जन सारे भिऊनी पळती ।

*　　*　　*　　*

ह्या चवलीचं काय म्हणणं आहे ? ‘ लोकयुद्ध ’ विकत घ्या ‘ लोकयुद्ध ! ’ अहो, हें काय ? आम्हांला पाहतांच लोक असे लांब लांब कां पळतात ? गिरगांवचे लोक ग्रँटरोडला पळाले, ग्रँटरोडवरचे लोक प्लेहाऊसला पळाले आणि प्लेहाऊसवरचे लोक दोन टाकीवर पळाले ! जनहो, थांबा ! ‘ लोकयुद्ध ’ विकत घ्या ‘ लोकयुद्ध ! ’ अहो, असे पळता कां ? जरा थांबा ! ‘ लोकयुद्धा ’चा एकच अंक विकत घ्या ! एवढा घसा फोडून, जीव तोडून, इराण्याच्या हॉटेलांत चहा झोडून, आणि कॉंग्रेसच्या नांवानें बोटं मोडून आम्ही टाहो फोडतों, तरी एकाहि माणसाला दया येत नाहीं म्हणजे काय ? अरेरे ! काय चमत्कारिक जग पहा ! ह्या जगांत कुरूप वेश्येला गिऱ्हाईक आहे, गलिच्छ चहाला गिऱ्हाईक आहे, घाणेरड्या पातळ भाजीला गिऱ्हाईक आहे, शिळया भजीला गिऱ्हाईक आहे, नासक्या पावला गिऱ्हाईक आहे आणि कुजक्या अंड्यालाहि गिऱ्हाईक आहे ! पण ‘ लोकयुद्धा ’ ला गिऱ्हाईक नाहीं. या जगांत रद्दी चित्रपटाला गिऱ्हाईक आहे, बेसूर गायिकेला गिऱ्हाईक आहे, लठ्ठ नटीला गिऱ्हाईक आहे, पडेल नाटकाला

गिऱ्हाईक आहे, पण 'लोकयुद्धा 'ला गिऱ्हाईक नाहीं! कम्युनिस्टांच्या या पराक्रमी मुखपत्राला गिऱ्हाईक नाहीं. लोकशाही स्वराज्य पक्षावरहि ताण करणाऱ्या कम्युनिस्टांच्या जहाल राजकारणाची जनतेला कदर नाहीं! म्हणूनच ही चवली आज ऊर बडवून आकांत करीत आहे कीं, 'लोकयुद्धा 'चा एक तरी अंक विकत घ्या!

*　　*　　*　　*

या चवलीचं आणखी कांहीं म्हणणं नाहीं. 'लोकयुद्धा 'चा एकच अंक विकत घ्या! पुन्हा गाणं म्हणूं का? पुन्हा संगीतांत तुम्हांला विनंति करूं का?—

छे! तुम्हांला हें पटायचं नाहीं! 'लोकयुद्धा' चं हें लढाऊ गाणं तुम्हांला आवडणार नाहीं. प्रभात फेरींतलं 'उठा बंधूनो उठा भगिनींनो' हें मिळमिळीत गाणं तुम्ही उत्सुकतेनं श्रवण कराल. 'झंडा ऊंचा रहे हमारा' हें देशद्रोही गीत ऐकण्यासाठीं तुम्ही गर्दी कराल! 'चरखा चला चलाके' हें नादान पद ऐकण्यासाठीं तुम्ही धांवत याल! पण आमच्या 'लोकयुद्धा 'चं जोरदार लढाऊ संगीत तुम्हांला आवडणार नाहीं! कसें मूर्ख जग पहा! आम्ही इराणी हॉटेलांत पुडींग खाऊन लिहिलेल्या 'लोकयुद्धा' ला कोणी दोन आणे देत नाहींत, पण गांधींनीं खजूर खाऊन लिहिलेल्या 'हरीजन 'ला मात्र हे चार चार आणे देतील!

# : एक्स्ट्रा नटीचे अभंग :

असो द्यावा धीर, सदा सर्वकाळ,
आहे चंदुलाल जवळीच ।
सकल नटींचा, करितो संभाळ,
तुज मोकलील ऐसे नाहीं ॥
पागनीस दाते, सैगल वासंती,
हजारांनीं ओती रोप्यमुद्रा ॥
रजतं सृष्टीचा, महान कुबेर,
करील अव्हेर कैसा तुझा ॥

*  *  *  *

मऊ मेणाहुनी, आम्हीं रम्य नारी,
कठीण तिजोरी फोडू ऐसी ।
भले तरी देऊ, गोड एक पापा,
नाहींतर लाफा श्रीमुखांत ॥
आले तर देऊं, चहा कप एक,
आणि घेऊं चेक हजाराचा ।
नटी म्हणे करूं, प्रेमळासी प्रेम,
नाहींतर घाम काढूं पुरा ॥

*  *  *  *

नको नको मना, गुंतू मायाजाळीं,
हिरो आला जवळीं ग्रासावया ।

नको नको मना, फोडूं तूं किंकाळी,
आहे रात्रपाळी म्हणूनीया ॥
नाहीं मज नांव, नाहीं पब्लिशिटी,
व्यर्थ एक्स्ट्रा नटी जन्म तिचा ।
तळमळे मन, केव्हां मी होईन,
मुख्य हिरोईन देवा सांग ॥

* * * *

गोड तुझें रूप, गोड तुझें नाम,
धन्य शांताराम दिग्दर्शक ।
खळी गालावर, हंसे वरवर,
नजर भिरभिर चोहींकडे ॥
झोंकदार गडी, बादशाही ऐट,
कलावंत धीट मर्द खरा ।
देतील ते जरी, मज कांहीं चान्स,
करीन मी डान्स शाकुंतली ।

* * * *

बाबूराव पैना, दंडवत माझा,
सिनेमांत राजा तुरेवाला ।
काल खजीनदार, आज जमीनदार,
गल्लाभरू वीर त्रिखंडांत ॥
पंजाबनें केला, मराठी भ्रतार,
कीर्तिवंत थोर झाला जगीं ।
नटी ह्मणें ठेवा, ओळख हो माझी,
करीन मी राजी केव्हांतरी ।'

* * * *

जन हे अवघे, आंबट शोकीन,
सोडतात प्राण नटीवरी ।

काय सांगू तुम्हा, स्टुडीओच्या गमती,
मालकहि नमती नटीपुढें ॥
काय सांगू तुम्हा, स्टुडीओच्या मौजा,
आषकांच्या फौजा नटीमागे ।
नटी म्हणे सारा, मूर्खांचा बाजार,
जीवाला बेजार झाला बहु ॥

* * * *

सिनेमासृष्टीची, नटी मी गुणाची,
मुंबई पुण्याची फेरी करी ।
पुण्याचे सोयरे, येती मुंबईला,
मला भेटायाला उत्कंठेनें ॥
मुंबईचे मित्र, येती ते पुण्यास,
सांगू मी कुणास दुःख माझें ।
नटी म्हणे झाल्या, ओळखी या फार
नाजूक मी नार काय करू ॥

* * * *

रस्त्यामध्यें कोणी, भेटतो पाहुणा,
माझाच मेहुणा ओळखीचा ।
रस्त्यामध्यें कोणी, भेटतो मैतर,
चोरून नजर लावी मेला ॥
आग्रहानें कोणी, नेई हॉटेलांत
नको तो एकांत गर्दीमधें ।
नटी म्हणे जळो, जळो या ओळखी,
तोंडाला काळोखी लागे माझ्या ।

* * * *

काय सांगू तुम्हा, मुंबई शहर,
जाहला कहर—उन्हाळ्यांत ।

चैत्र महिन्याचा, प्रखर उन्हाळा,
सुकतसे गळा क्षणोक्षणी ॥

नटी सुकुमार, चालते उन्हांत,
येऊ द्या मनांत दया थोडी ।
नटी म्हणे पहा, तापली ही धरा,
मोटारींत थारा द्या हो मला ।

*　　*　　*　　*

जिथें जावें तेथें, आहे फार गर्दी,
सिनेमाचे दर्दी थिएटरांत ।
गर्दीमध्यें हाल, होती बायकांचे,
हृदय कुणाचे कोणी चोरी ॥
कोणी देई धक्के, कोणी घेई चिमटा,
एखादा भामटा डोळा घाली ।
नटी म्हणे कोणी, ओढीतो पदर,
लावितो अधर अंधारांत ॥

# मुंबईतील रात्रि-रहस्य !

अठरा पगड जातीच्या व लाखो लोकांच्या वस्तीनें गजबजलेल्या मुंबई शहरांत रात्रींचे काय काय प्रकार घडत असतील? किती गूढ आणि अजब रहस्यें मुंबईच्या रात्रींत भरलेलीं आहेत ? कोणकोणतीं कारस्थानें व काय काय रंगढंग मुंबईत रात्रीं चालत असतात ? मुंबईचे लोक रात्रीं झोंपत नाहींत का ? परमेश्वरानें रात्र ही विश्रांतीसाठीं निर्माण केलेली आहे का ? निदान मुंबई शहरांत तरी रात्रीचा व विश्रांतीचा संबंध नसलेला दिसून येईल. उलट हजार धंदे व उपद्व्याप मुंबईत रात्रीचे सुरू होतात. रात्रीचें वर्णन करतांना ' जिकडे तिकडे शांतता पसरली होती ' असें लिहिण्याचा लेखकांचा सराव आहे. पण मुंबईत मध्यरात्रीं प्लेहौसच्या रस्त्यावरून एक फेरफटका मारला तर, दिवसापेक्षां जास्त गडबड चाललेली आढळून येईल.

जेव्हां मुंबईच्या इतर भागांत शांततेचें साम्राज्य पसरलेलें असतें, तेव्हां कॉर्नर ग्रँटरोड, फॉरस रोड, डंकन रोड, कामाठीपुरा व गोलपीठा या भागांत निशाचरांची बेसुमार वर्दळ चाललेली असते. हे सर्व रस्ते हजारों खुशालचेंडू माणसांनीं फुलून गेलेले असतात. या सर्व लोकांत अनेक जातीची, अनेक पेशाची माणसें असतात. या निशाचरांत हिंदु असतात, मुसलमान असतात, ख्रिश्चन असतात, पठाण असतात, पारशी असतात, ज्यू असतात व युरोपीयनही असतात. या निशाचरांत मवाली असतात, सज्जन असतात, बदमाष असतात, प्रतिष्ठित असतात, सभ्य असतात, असभ्य असतात, श्रीमंत असतात, पाटीवाले असतात, चोर असतात व त्यांच्या पाळतीवर पोलीसही असतात !

ही एवढी मोठी जत्रा मुंबईत दर रात्रीं वर सांगितलेल्या ठिकाणीं भरत असते. मुंबईच्या खुशालचेंडू, विलासी व त्याच बरोबर मवाली लोकांनीं रात्रीं त्या ठिकाणीं एकत्र जमण्याचा आज कित्येक वर्षांपासून शिरस्ता ठेवला आहे. हे सर्व लोक तिथें

कां जमतात ? अशी कोणती प्रबळ आकर्षक शक्ति आहे कीं जी या सर्व लोकांना एक ठिकाणीं ओढून आणते ? रात्रीं बाहेर भटकणाऱ्या या लोकांना घरदार नसते का ?

मुंबईंत घरदार नसलेले जसे हजारों लोक आहेत तसेच घरदार असूनही ते विसरणारे तितकेच लोक आहेत. मुंबई ही मोहमयी नगरी आहे. विलासी लोकांना चैन करायला हिंदुस्थानांत मुंबई इतके सोयीस्कर दुसरें स्थळ नाहीं. मवाल्यांना डल्ला मारायला मुंबईसारखें फायदेशीर दुसरें ठिकाण नाहीं. खिसेकापूंना खिसे कापायला मुंबईइतकी गर्दी अन्य ठिकाणीं सांपडत नाहीं. विविध प्रकृतीचे लोक विविध हेतूनें मुंबई शहरांत एकवटलेले असतात. आणि जेव्हां सारे लोक आपआपल्या उद्योग-धंद्याला मुंबई शहरच पसंत करतात तेव्हां, तनुविक्रय करणाऱ्या वारांगनाच तेवढ्या कशा मागें राहतील ?

सौंदर्याच्या बाजारपेठेंत देहाचें दुकान मांडून बसलेल्या हजारों वेश्या मुंबईच्या कितीतरी भागांत आढळून येतात. पण मुंबईच्या या ठराविक भागांत मात्र त्यांचें अस्तित्व प्रामुख्यानें व मोठ्या प्रमाणांत नजरेस पडतें. डंकन रोडपासून गोलपिठ्या-पर्यंत व कामाठीपुऱ्यापासून फॉरसरोडपर्यंत पसरलेल्या लांबच लांब विस्तीर्ण रस्त्यांच्या दुतर्फा असलेल्या टोलेजंग इमारतीच्या खिडक्याखिडक्यांतून, रंगीबेरंगी वेशभूषेंत खुलून दिसणाऱ्या वारांगनांची तोंडें विजेच्या लखलखाटांत तळपत अस-तात. रस्त्यानें जाणाऱ्या वाटसरूंचें लक्ष आपल्याकडे खेंचून घेण्याची जणूं त्यांच्यांत चढाओढच चाललेली असते. कोणी नजरेनें खुणा करतात, कोणी हातवारे करतात, कोणी अचकट विचकट गाणीं म्हणतात तर कोणी ' एऽऽ कारभारी ' म्हणून सलगीनें हांक मारतात. या असंख्य बाजारबसव्यांत अनेक जातीच्या, अनेक पंथांच्या, अनेक धर्मांच्या व अनेक देशांच्या बाया आहेत. लांड्या परकरांच्या किरिस्तांवणी, बसक्या नाकाच्या चिनी, घाटावरच्या यल्लम्मा, व उत्तर हिंदुस्थानच्या नूरजहान अशा विविध प्रकारच्या मालमसाल्यांची या ठिकाणीं अपूर्व भेसळ झालेली आढळून येते. मुंबई पुण्याकडील विविध जातीच्या स्त्रिया व गुजराथ काठेवाड बाजूच्या उच्चनीच जातीच्या बायाही या रामरगड्यांत मोठ्या दिमाखानें वावरून अस्पृश्योद्धारांचा प्रश्न सोडवीत असतात. बाजार बसव्याच्या या बाजारपेठेंत जाति-भेद नाहीं किंवा स्पृश्यास्पृश्य भेद नाहीं. वारांगनांकडे जाणाऱ्या गिऱ्हाईकांची जात

एकच असते. वासनातृप्तीसाठीं गल्लीगल्लींतून भटकणारे निशाचर भोग्यवस्तूच्या ज्ञातीपेक्षां तिच्या सौंदर्या-कडेच विशेष बघत असतात. कामांधाला जशी लज्जा किंवा भीति नाहीं, त्याप्राणें जातिभेदही नाहीं !

म्हणूनच जिवाची मुंबई करण्यासाठीं मुंबईतले असंख्य जीव प्लेहौसच्या आस-पास रात्रीं रेंगळत असतात. चैन, विलास व मौज करण्यासाठीं निशाचरांची ही इतकी गर्दी या ठिकाणीं जमलेली असते. विविध प्रकृतींच्या व विविध अभिरु-चीच्या माणसांना, आपल्या विविध वासना विविध प्रकारें तृप्त करून घेण्याला हेंच स्थान विशेष सोयीचें व मजेचें वाटतें.

बारमध्यें दारुड्यांची मजलस चालते तशी आसपासच्या उपहार गृहांतूनही कपाळ उठविणारी ओरड अखंडित चालू असते. ‘ एक इसम दोन आणे ’ म्हणून माणसाची किंमत ठरविणाऱ्या विश्रांति गृहांचा अस्सल भपका व डामडौल प्लेहौसच्या नाक्यावरच पहावयास सांपडतो. विजेच्या झगझगीत प्रकाशांत खाद्य-पदार्थांचें मांडलेलें प्रदर्शन नुसतें प्रेक्षणीयच नसून भक्षणीयही असतें. या हॉटेलांत माणसांचा कोलाहाल, पोऱ्यांचा कलकलाट व रेडोयोचा कर्कश सूर यामुळें त्याला मच्छीबाजाराचें स्वरूप प्राप्त झालेलें दिसून येतें ! या भागांत भटकणाऱ्या खुशाल-चेंडू निशाचरांनीं उदार आश्रय दिल्यामुळें हॉटेलचे मालकही गब्बर झालेले असतात. हिंदूंच्या सोयीसाठीं हिंदु उपहार गृहें आहेत, त्याचप्रमाणें मुसलमानांच्यर सोयीसाठीं इस्लामी गुलजार हॉटेल्स आहेत.

मुसलमान लोक हिंदूपेक्षां जास्त रंगेल व शोकीन असल्यामुळें इस्लामी हॉटेलांची सजावट जरा भडकच असते. रंगीबेरंगी कागदी पताकांची रमणीय आरास व चंद्र छापाचे हिरवे तांबडे बावटे यांनीं तें हॉटेल शृंगारलेलें असतें. हॉटेलच्या बाहेर फूटपाथच्या कडेला खुर्च्या व बांकें ठेवलेलीं असतात. हॉटेलच्या आंत शिरून व्यवस्थित बसण्यापेक्षां कांहींजण बाहेरच बसून खाद्यपेय मागविण्यांत विशेष समा-धान मानतात ! बरेच बांधव हॉटेलांतच खाऊन जगणारे असतात, त्यामुळें मुर्गी, बैदा, बिर्याणी वगैरे पदार्थांच्या प्लेट्स टेबलावर आपटलेल्या या हॉटेलांतून दिसून येतात. अशा प्लेट्सवर ताव मारतां मारतां ग्रामोफोनवर चाललेल्या गझल कवालीचे सूर ऐकण्यांत मुसल्मान गिऱ्हाईक तहानभूक विसरून जातात.

लेहौसच्या आसपास 'बार' व हॉटेल्स जसे आहेत तसेंच नाटक व सिनेमागृहें आहेत. व्हिक्टोरीया, रिपन, वालीवाला, एलफिन्स्टन, रॉयल, ग्लोब, बॉम्बे व आणखी कांहीं थिएटर्स या विभागांत आहेत. करमणुकीचीं हीं अनेक गृहें एकाच ठिकाणीं एकवटलीं गेलीं असल्यामुळें त्या बाजूला प्रेक्षकांची झुंबड उडत असल्यास नवल नाहीं! उर्दू, गुजराथी व मराठी नाटकें या ठिकाणीं होतात, इंग्रजी व हिंदी दंगलीचे व मारामारीचे चित्रपट या भागांतील थिएटर्समध्यें दाखविले जातात, या भागांत रात्रीं दीड वाजेपर्यंत तमाशे व पंचरंगी बहार चालू असतात. पंजाबी व मुसलमान गायिकांच्या बैठकी याच भागांत होतात. करमणुकीचे हे विविध प्रकार निरनिराळ्या अभिरुचीच्या व दर्जाच्या लोकांना परवडत असल्यामुळें बकाली मुंबईंतील निशाचरांचें जणूं संमेलनच रात्रीं प्लेहौसवर भरत असतें!

---

# प्रेमभंगी परिषद्!

अखिल भारतीय प्रेमभंगी परिषद भरविण्याची कल्पना मुंबई शहरांतील एक प्रसिद्ध प्रेमवेडा काळूराम पागल यांच्या डोक्यांत प्रथम आली आणि त्या कल्पनेला बसवण्णा नांवाच्या मद्रासी इसमानें दुजोरा दिला.

कारण काळूराम आणि बसवण्णा हे दोघेहि समदुःखी आणि जानी दोस्त होते. पहिल्यानें ते एकमेकांचे शत्रू होते. कारण दोघेहि एकाच मुलीवर आषक्त होते. पण त्या मुलीनें दोघांनाहि तोंडघशी पाडून जेव्हां तिसऱ्याच इसमाशीं लग्न केलें तेव्हां काळूराम आणि बसवण्णा दोघेहि जिवलग मित्र बनले. एकाच मुलीकडून चपराक खाऊन प्रेमभंग पावलेले हे दोन दुःखी कष्टी जीव स्त्रीजातीच्या बेईमानपणाबद्दल तासन्तास चर्चा करूं लागले. हळुहळू या दोन प्रेमभंग्यांना आणखी प्रेमभंगी येऊन मिळाले. अशा रीतीनें या प्रेमभंगी संघाच्या सभासदांची संख्या वाढूं लागली.

अखिल भारतीय प्रेमभंगी परिषद भरविण्याची कल्पना जेव्हां काळूराम यांनीं सुचविली तेव्हां बसवण्णाला आनंद झालाच, पण इतर प्रेमभंगीहि ही परिषद यशस्वी करण्याचा चंग बांधून तयार झाले, आणि त्याप्रमाणें सारेजण कार्यास लागले.

शहराच्या बाहेर एका निर्जन वाटेवरील भुताटकीचा पडका वाडा संमेलनासाठीं

निवडण्यांत आला. संमेलनाला दूर दूर ठिकाणांहून आलेले बरेच प्रतिनिधि हजर राहिले. गोसावडे, बैरागी, वेडे, कवि, लेखक इत्यादि अनेक प्रकारच्या दर्दी प्रेमभंग्यांनीं संमेलनाला गर्दी करून सोडली. भग्नहृदयी जीवांचा हा दुःखी कष्टी मेळावा मोठा प्रेक्षणीय होता. सभामंडपाला एक प्रकारची भयाण अवकळा प्राप्त झाली होती. उसासे, सुस्कारे, विरहगीत इत्यादि प्रेमभंग्यांना शोभतील असे चाळे मंडपांत सुरू होते. कांहीं वेडपीर शून्य दृष्टीनें आकाशाकडे पाहत हातवारे करीत होते, कांहींजण दाढी वाढवून सुतकी चेहरा करून आपल्या हृदयदेवतेचें चिंतन करीत होते, कांहींजण वेदना असह्य होऊन क्षणाक्षणाला मूर्च्छा येऊन पडत होते. सारेच जण दुःखी कष्टी व बेभान असल्यामुळें, सभेचें काम वेळेवर सुरू होण्यास विलंब झाला.

सुप्रसिद्ध नागरिक चिंतूअण्णा रेडके यांची अध्यक्षाच्या जागीं योजना केली होती. पण सभेच्या कामाला सुरुवात होण्यापूर्वीच अध्यक्षांची हृदयक्रिया बंद पडली आणि अध्यक्षीय भाषण करण्यापूर्वीच व्यासपीठावर ते गतप्राण होऊन पडले.

सभेच्या प्रारंभीच जबरदस्त विघ्न आलेलें पाहून मंडळींना धीर देण्यासाठीं काळूराम आवेशानें व्यासपीठावर आरूढ झाले आणि त्यांनीं भाषण करण्यास सुरुवात केली.

ते म्हणाले, "माझ्या प्रेमभंगी बंधूनों, आपले अध्यक्ष अचानक खतम झाले म्हणून धीर सोडूं नका. आज या ठिकाणीं मृत्यू येण्याचें भाग्य लाभून त्यांना सद्‌गति मिळाली आहे. त्यांची तब्येत गेल्या कित्येक वर्षांपासून ढांसळलीच होती आणि ते केव्हां राम म्हणतील याचा नेम नव्हता. गेल्या वीस वर्षांत त्यांचा अनेक वेळां प्रेमभंग झाला आणि त्यामुळेंच त्यांच्या प्रकृतीवर चिंताजनक परिणाम झाला. प्रेमापायीं दोनदां त्यांनीं आत्महत्या करण्याचाहि प्रयत्न केला होता. पण अखेर त्यांना आज या भरल्या सभेंत मृत्यू आला हा एक चांगला योगच म्हटला पाहिजे. कारण अनायासें त्यांच्या प्रेतयात्रेला आज चिकार मंडळी मिळाली.

"बंधूनों, वास्तविक अध्यक्षाचा परिचय करून देण्याचं काम आज माझ्याकडे होते. पण स्पष्ट आणि सत्य बोलून त्यांचा खरा परिचय करून देणें मला शक्य नव्हते. पण आतां अध्यक्ष जिवंत नसल्यामुळें, निर्भीडपणें आणि निर्भयपणें मला त्यांचा परिचय करून देण्याची संधि मिळाली आहे.

" माझ्या प्रिय प्रेमभंग्यांनो, आपल्या परलोकवासी अध्यक्षांची थोरवी मी तुम्हांला काय सांगू ? आजच्या प्रसंगीं त्यांच्यासारखा लायक अध्यक्ष आम्हाला मिळणें शक्यच नाहीं. प्रेमापायी त्यांनीं केवढा त्याग केला ! वयाच्या सोळाव्या वर्षींच एका पोरीच्या नादी लागून त्यांनीं शाळा सोडली आणि त्यानंतर अन्नहि सोडली. "

" पण दुःखाची गोष्ट ही कीं, स्त्रीजातीनें आपल्या अध्यक्षाची कदर केली नाहीं. आयुष्यांत एकामागून एक त्यांचा प्रेमभंग होतच गेला. आतां तुम्हींच सांगा, एकदाच प्रेमभंग झाला तर तुमचा आमचा जीव केवढा कासावीस होतो ! मग डझन दोन डझन वेळां प्रेमभंग होणें म्हणजे केवढा अनर्थ !

" मित्रहो, अध्यक्षमहाशयाचं गुणवर्णन मी आणखी काय करूं ? आयुष्यांत त्यांनीं कधीं धीर सोडला नाहीं किंवा आपल्या कार्यांत अंतर पडूं दिलं नाहीं. त्यांची चिकाटी भयंकर दांडगी. एके ठिकाणीं प्रेमभंग झाला म्हणून निराश न होता दुसऱ्या ठिकाणीं जुळविण्याची तत्परता ते ठेवीत. आतां या कार्यांत एक दोनदां त्यांना चपलाचाहि प्रसाद मिळाला ही गोष्ट वेगळी. असो. सांगण्याचं तात्पर्य काय कीं, आज प्रेमभंगी परिषदेला एक मार्गदर्शक अध्यक्ष लाभला होता पण आमच्या दुर्दैवानें भाषण करण्यापूर्वीच ते दिवंगत झाले ही मोठ्या खेदाची गोष्ट होय. "

काळूराम आणखी कितीतरी वेळ बोलणार होते. पण त्यांचं भाषण अर्ध्यावरच थांबवून श्रीयुत बसवण्णा व्यासपीठावर चढले, आणि त्यांनीं आपल्या भाषणास सुरुवात केली,

" बंधूनो, मी मध्येंच बोलतो याबदल क्षमा करा. माझी अशी सूचना आहे कीं अध्यक्षाची प्रेतयात्रा आपण पहिल्यानें काढावी आणि नंतर सभेच्या कामाला लागावें. आपल्यापैकीं कित्येक जण माथेफिरू आणि बेअकली आहेत ही गोष्ट खरी असली तरी व्यासपीठावर अध्यक्षाचं प्रेत ठेवून आपण व्याख्यान झोडीत बसणं इष्ट नाहीं. तरी पहिल्यानें अध्यक्षाचा अंत्य संस्कार करूं-या ! त्यापूर्वी सभेला माझी आणखी एक सूचना आहे. आणखी कुणाला या ठिकाणीं मरायचें असेल तर त्यांनीं याच वेळीं आपलें कार्य उरकून घ्यावें. आपल्यापैकीं बऱ्याच जणांना प्रेमभंगामुळें जीव नकोसा झाला आहे. हे ओळखून येथील एक

प्रतिष्ठित व्यापारी शेठ वाटमारे यांनीं आमच्या संमेलनाला देणगी म्हणून दहा तोळे अफू पाठविली आहे. तरी या संधीचा लाभ घेऊन ज्यांना आत्महत्या करावयाची असेल त्यांनीं त्वरा करावी. म्हणजे अध्यक्षाबरोबरच त्यांचीहि आम्हांला सामुदायिक प्रेतयात्रा काढतां येऊन आजच्या सभेनें कांहीं तरी भरीव कार्य केलें असें आम्हांला जगाला दाखवितां येईल. ”

वसवण्णाचं भाषण चालूं असतांच व्यासपीठावर मरून पडलेलें अध्यक्ष खडबडून उठून बसले. त्यांची हृदयक्रिया बंद पडली नव्हती. ते शांतपणें झोंपीं गेले होते. गाढ निद्रेंतून ते सावध झाले.

अध्यक्ष जिवंत झालेले पाहतांच सभामंडपांत एकच हलकल्लोळ माजला. अध्यक्षाच्या स्पष्ट आणि निर्भीड परिचय करून देणारे काळूराम त्या गडबडींत बेपत्ता झाले!

REFBK-0006376

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
दा. क्र. 6236